
मंगळवार, ११ एप्रिल २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -२१८
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक



● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ● TUESDAY 11 APRIL 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-218 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-14 ● PRICE-5

## बगळ्यांची शाळा...



वडोदबाजार (ता. फुलंब्री) येथील कोल्हापुरी बंधाऱ्यातील पाणी आटले असून अल्पशा पाण्यात असलेले मासे खाण्यासाठी बगळ्यांची जणू शाळाच भरली आहे. छायाचित्र : रमेश धनके

# भाजपचा खरा चेहरा जनतेसमोर आणण्याचा संकल्प

## नाना पटोले : प्रदेश काँग्रेस कमिटीच्या विस्तारित कार्यकारिणीची बैठक ठाण्यात

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : राहुल गांधी यांच्यावर भाजपा सरकारने राजकीय सुडबुद्धीने कारवाई केली हे सर्वश्रुत आहे. यामागचा घटनाक्रम पाहिला तर ते सर्व स्पष्ट होते. राहुल गांधी यांची खासदारकी रद्द करण्याचे भाजपाचे प्रयत्न सुरु होते पण जुनी खोटी केस उकरून कारवाई केली गेली. देशात लोकशाही व्यवस्था व संविधान राहिलेले नाही. काँग्रेसला जनतेचा पाठिंबा वाढत आहे, त्याचा पक्षाला फायदा होणार आहे यासाठी भाजपाचा खोटारडा चेहरा जनतेसमोर आणण्याचा संकल्प आजच्या प्रदेश कार्यकारिणीच्या बैठकीत केलेला आहे, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी स्पष्ट केले.**

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या विस्तारित कार्यकारिणीची बैठक प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या अध्यक्षतेखाली राम गणेश गडकरी रंगायतन, ठाणे येथे पार पडली. या बैठकीला विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात, माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण, AICC चे सचिव सहप्रभारी आशिष दुआ, संपतकुमार, खा. कुमार केतकर, माजी मंत्री विश्वजित कदम, माजी खासदार, हुसेन दलवाई, डॉ. भालचंद्र मुणगेकर, महिला काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्ष संध्या सव्वालाखे, अल्पसंख्याक विभागाचे अध्यक्ष आ. वजाहत मिर्झा, सेवादलाचे प्रदेश उपाध्यक्ष मोहन जोशी, वरिष्ठ नेते उल्हास पवार, मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे, सरचिटणीस प्रमोद मोरे, देवानंद पवार, ठाणे शहर प्रभारी शरद आहेर, ठाणे शहर जिल्हाध्यक्ष विक्रांत चव्हाण, दयानंद चोरगे यांच्यासह राज्यातील प्रमुख नेते व पदाधिकारी उपस्थित होते.

विधिमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात यावेळी म्हणाले की, राज्यातील यापुढचा कालखंड निवडणुकीचा असून त्यादृष्टीने अत्यंत महत्वाचा आहे. राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखालील भारत जोडो यात्रा ऐतिहासिक ठरली. यात ज्वलंत मुद्यांना आवाज उठवला गेला. त्यानंतर राहुल गांधी यांनी संसदेत केलेले मोदी-अदानी संबंध काय असा प्रश्न विचारला. पण त्यानंतर मोदी सरकारने राहुल गांधी यांना संसदेत बोलूच दिले नाही, त्यांची मुस्कटदाबी केली. राहुल गांधींच्या वाढत्या लोकप्रियतेची भाजपाला भिती वाटते म्हणूनच ही मुस्कटदाबी करण्यात येत आहे. राहुल गांधी यांच्यावर झालेला अन्याय लोकांपर्यंत जाऊन सांगा. काँग्रेसला चांगले दिवस आहेत पुन्हा पक्षाला सोनियाचे दिवस येतील. माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यावेळी म्हणाले




की, राहुल गांधी यांनी संसदेत अदानी घोटाळ्यासंदर्भात काही प्रश्न उपस्थित केले आणि मोदी अदानी संबंध काय असा प्रश्न विचारताच मोदी सरकारने राहुल गांधींवर आकसाने कारवाई केली. हा प्रश्न एकट्या राहुल गांधी यांचा नाही तर सरकारच्या विरोधात बोलणाऱ्या प्रत्येकाचा प्रश्न आहे. देशातील आजची परिस्थिती पाहता भाजपा सरकारने लोकशाहीचा खून केला असे म्हटले तर त योग्यच आहेत. राहुल गांधींना दोषी ठरवण्यामागचा घटनाक्रम नीट पहा, हे सर्व जाणीवपूर्वक, सुडबुद्धीने केलेले षडयंत्र आहे हे दिसते.

# अमित शाहांच्या अरुणाचल प्रदेश दौऱ्यावर चीनचा आक्षेप


आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी अरुणाचल प्रदेशचा दौरा केल्यानंतर चीनने या भेटीवर आक्षेप घेतला आहे. अमित शाह यांनी या भागाला भेट देणे हे आमच्या प्रादेशिक सार्वभौमत्वाचे उल्लंघन आहे, असा दावा चीनने केला आहे. विशेष म्हणजे काही दिवसांपूर्वीच चीनने अरुणाचल प्रदेशमधील या भागावर आपला दावा करत त्याचं नाव बदलले होते. चीनच्या परराष्ट्र खात्याचे प्रवक्ते वांग वेंबिन म्हणाले, अमित शाह यांच्या अरुणाचल आणि आसामच्या दौऱ्यात चीनच्या प्रादेशिक सार्वभौमत्वाचे उल्लंघन झाले आहे. हे सीमावर्ती भागातील शांततेसाठी चांगले नाही. चीनने रविवारी (९ एप्रिल) अरुणाचल प्रदेशमधील ११ ठिकाणांची नावे बदलली. तसेच ही सर्व ठिकाणं चीनची असल्याचाही दावा केला. हे सर्व ठिकाण तिबेटच्या दक्षिण क्षेत्राचा भाग असल्याचा चीनचा दावा आहे. चीनने दोन भूभाग, दोन रहिवासी भाग, पाच शिखरं आणि दोन नद्यांचा समावेश असलेली यादी जाहीर केली आहे. ही चीनने जाहीर केलेली तिसरी यादी आहे. याआधी २०१७ मध्ये चीनने अरुणाचल प्रदेशमधील ६ भागांचा समावेश असलेली पहिली यादी जाहीर केली होती. २०२१ मध्ये १५ ठिकाणांचा समावेश असलेली दुसरी यादी जाहीर करण्यात आली होती आणि आता तिसरी यादी जाही करण्यात आली आहे. याआधी २०१७ मध्ये चीनने अरुणाचल प्रदेशमधील ६ भागांचा समावेश असलेली पहिली यादी जाहीर केली होती.



## उगवतीचे रंग



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


# अजिंठ्याच्या लेण्यांतून घडणारे बुद्ध दर्शन



आधुनिक केसरी

पण त्याच्या नकारामुळे शुद्धोधन राजा दुःखी होतो. त्याचे हे दुःख जगाचे दुःख समजून घेण्याची क्षमता असलेल्या सिद्धार्थाच्या हृदयाला विद्ध करते आणि तो त्या मुलीच्या वडिलांना तिच्या विवाहासाठी स्वयंवर आयोजित करण्याचे सांगून त्यात भाग घेतो. त्या स्वयंवरात भाग घेण्यासाठी जे राजपुत्र, सरदारपुत्र जमलेले असतात, त्या सर्वांचा पराभव सिद्धार्थ आपल्या उपजत कौशल्याने करतो. त्याचे हे रूप सगळ्यांसाठीच नवीन असते. सगळे आश्चर्यचकित होतात आणि अत्यंत सुस्वरूप अशा यशोधरेशी त्याचा विवाह होतो. अजिंठ्याच्या लेण्यांतून जी भित्तिचित्रे आणि गौतम बुद्धांची विविध रूपे असलेली शिल्पे आपल्याला दृष्टीस पडतात, त्या प्रत्येकाच्या मागे काही इतिहास किंवा काही कथा दडलेली आहे. या चित्रांचे किंवा शिल्पांचे अर्थ गौतम बुद्धांचे जीवन, बुद्ध वांङ्मयातील जातक कथा इ. समजून घेतल्याशिवाय आपल्या लक्षात येत नाही. आज या लेण्यातील चित्रे आणि शिल्पे काळानुसार त्यांचे मूळ रूप आणि सौंदर्य काही प्रमाणात गमावून बसली असली तरी एकेकाळच्या संस्कृतीच्या वैभवाच्या हा काळावर उमटवलेला अमीट असा ठसा आहे. गौतम बुद्ध, त्यांचे अजरामर असे तत्वज्ञान हा आपला वैभवशाली वारसा तर आहेच पण ही भारताने जगाला दिलेली एक अमूल्य अशी देणगी आहे. आपण बुद्धांचे जीवन आणि ही अजिंठ्याची लेणी अशा दोन गोष्टी एकत्र लक्षात घेत गेलो, तर या लेण्यातील चित्रे आणि शिल्पे यावर प्रकाश पडतो. त्यानिमित्ताने जेव्हा बुद्धांच्या चरित्रातील घटना आपण पाहू लागतो, तेव्हा मनोरम असे बुद्ध दर्शन घडते. हे घडणारे बुद्ध दर्शन लेण्यातील शिल्प आणि चित्र यांच्यापलीकडचेही असते. म्हणूनच लेण्यात न दिसणारे पण त्यांच्या चरित्राचा अविभाज्य भाग असणारे काही प्रसंग या ठिकाणी मी विस्ताराने सांगतो आहे. पहिल्या भागात आपण पाहिले की बुद्ध होण्यापूर्वी बुद्धांचे अनेक जन्म झाले. या पूर्वजन्मांमध्यें त्यांना ' बोधिसत्व ' म्हणजे भावी काळात संबोधी प्राप्त करून घेणारा असे म्हणत असत.

## आनंदी पहाट



# गुणसमुच्चयामुळे क्रियाशीलता वाढते

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

प्रत्येक व्यक्तीच्या स्वतःच्या जीवनाकडे बघण्याच्या संकल्पना भिन्न असतात. प्रत्येक व्यक्तीचा पिंड निराळे व्यक्तिमत्व घडवत असतो. ज्या वातावरणांत व्यक्ती वावरत असते, लहानाची मोठी होते, त्याच वातावरणाचा पगडा त्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्वावर असल्याचे दिसून येत असते. जगात काही व्यक्तींना सज्ञान, तर काहींना अज्ञान ठरवले जात असते. सज्ञान होणे म्हणजे केवळ शारीरिक वय वाढणे नाही. व्यक्तीच्या व्यक्तिमत्वातील वैविध्यपूर्ण गुणसमुच्चय ज्ञानप्राप्ती करण्यासाठी सतत अंतर्मनाला उपकृत करत असतील आणि त्याचा प्रभाव त्यांच्या विचार, वर्तन आणि व्यवहार ह्यांवर सदोदित दिसत असेल, तरच त्या व्यक्तीला सज्ञान म्हणता येऊ शकते. अन्यथा त्या व्यक्तीला अज्ञानाची उपाधी लागणे स्वाभाविक असते. प्रज्ञावंत होण्यासाठी सामान्यज्ञान आणि प्रगल्भ ज्ञान जसे महत्त्वाचे; तसेच त्या ज्ञानाचा योग्य विनियोग, योग्य समज, उपयोजन आणि व्यवस्थापनही होणे तितकेच महत्त्वाचे असते. ही प्रक्रिया राबवण्यासाठी नियमित आत्मचिंतन गरजेचे असते. केवळ एखादी गोष्ट ज्ञात असल्याने आपण शहाणे, हुशार, प्रज्ञावंत ठरत नसतो, ह्याची सतत जाणीव ठेवणे जरुरीचे असते. आपल्या विचारांत आणि कृतीत तादात्म्य असणे गरजेचे असते. अनुभवांच्या संख्येपेक्षा त्या अनुभवांतून मिळालेली अथवा स्वतःहून मिळवलेली शिकवण किती गुणाढय आहे, समृद्ध आहे ह्यावर ते अवलंबून असते, हे प्रत्येकाने सर्वप्रथम ध्यानांत घेतले पाहिजे. म्हणजे केवळ वय आणि बुद्ध्यांक आपल्याला प्रगल्भ बनवतात, आपला स्वर, संवाद, देहबोली, दृष्टिकोन, भावना आणि त्यांचे प्रकटीकरण, हेतू, धोरण, विचारधारा, आचार, कार्यपद्धती योग्य प्रमाणात नियंत्रित ठेवून, स्वतःच्या तसेच इतरांच्या मानसिकतेचा स्वीकार आणि आदर ठेवून, सहअनुभूतीने, सक्रियपणे, वस्तुनिष्ठपणे, जाणतेपणाने आणि डोळसपणे आपला कार्यभार सांभाळणारे, पुढे नेणारे, नात्यातील भूमिका बजावणारे आणि त्यातील विशेषता, वैविध्य जपणारे, स्वीकारणारे तेच खरे 'प्रज्ञावंत' असतात.



आधुनिक केसरी

**शांती समाधाना | वान नाही ||**
चित्त शुद्ध ठेव | धावू नको मना ||
हरिच्या चरणा | स्थिर होय ||१||
क्षणोक्षणी काळ | आवळतो फास ||
याचे भान खास | ठेव जरा ||२||
प्रारब्धाचे भोग | भोगोनिया झाले ||
समत्व साधले | सुख-दुःखा ||३||
संसाराचे खूळ | व्यवहारी सोडावे ||
परमार्थी जोडावे | शुद्ध भावे ||४||
हरिचरणाशी | लीन होता मना ||
शांती समाधाना | वान नाही ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

विशुद्धं मानसं मेऽस्तु
संलग्नं तव पादयोः |
साम्राज्यं मेऽस्तु मातः
सकलहितहेतवे || ४ ||
माझे मन विशुद्ध आणि तुझ्या पायी संलग्न असावे. सर्वांच्या हितासाठी माझे साम्राज्य असावे.

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

धीरज अचल सुमेरु सम, विघ्न आय फिर जाय ।
डीगे धीर न तील भर, धीर अगम गम पाय
।।१६।।(स्वर्वेद तृतीय मण्डल दशम अध्याय)
०३/१०/१६

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**
धैर्यवान पुरूष सुमेरु पर्वतासमान अचल, दृढ असतात ज्यामुळे विघ्नं येऊन परत जातात. ते तीळमात्रही आपलं पद आणि सिद्धांत ज्ञानापासून विचलीत होत नाहीत. त्याप्रमाणेच अध्यात्म-मार्गात धीर संत आपल्या प्रकृतीपार आणि अनुभवगम्य मार्गावर अग्रेसर होऊन आपलं लक्ष्य गाठतात. अनेक विघ्न-बाधा आल्यावरही आपल्या सद्गुरु मार्ग आणि सिध्दांतापासून किंचितही विचलीत होत नाहीत.

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

## श्रवणनिरूपण

आधुनिक केसरी


समर्थांच्या विचारांचा प्रभाव समाजमनावर येवढा आहे की कितीही वाचलं श्रवण केलं तरी त्याचे रसपान परत परत करावेसे वाटणे आपणही अजून कुठे कमी आहोत काय केलं पाहिजे ?आपल्यात काय सुधारणा केल्या पाहिजेत हे समजतं. समर्थांच्या साहित्यात समाजातील प्रत्येक जीवाला आपल्या जडणघडणीत बदल करून आपलं आयुष्य सालंकृत करण्याचं सामर्थ्य आहे. मात्र एक पथ्य त्यासाठी पाळलं पाहिजे. ते म्हणजे समर्थांच्या विचारसरणीवर आपणं सगळ्यांनी चाललं पहिजे ज्ञानमार्ग भक्तिमार्गाची वाट कधीच विसरू नका. 48 व्या ओवी ते 60 व्या ओवीपर्यन्त समर्थ काय उपदेश करतात ते पाहूया. मंदीरात मुर्तीकडे आवडीने भक्तिने पहाणारा त्याची परमेश्वराप्रती आस्था त्याच्या डोळ्यात दिसते. गायन कलेत पारंगत असलेला गायक तालाच्या ज्ञानाकडे आवडीने पहातो,गायन कलेतील ताना, अलाप, मींड, खटके आवडीने पहातो योगाचे ज्ञान असणाऱ्या योग्याला शरीरातील रचनेची आवड असते. तत्वज्ञान जाणणारे लोक कोणताही विषय असुदे तो शब्दशः पारखतो. वैद्याला नाडी परिक्षणाची आवड असते औषधांच्या किती मात्र दयायच्या हे तोच अचूक सांगू शकेल. कायवासना, चेटूक, जारणमारण अशा अनेक प्रकारच्या लोकांचा त्या त्या विषयात सखोल अभ्यास असतो. टवाळा आवडे विनोद असं म्हणतात पण सगळ्या कला माणसाला यायला पाहिजेत.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# संगतीचे जीवनात अतिशय महत्त्व आहे

आधुनिक केसरी



आयुष्यात संगतीला फार महत्त्व असते. संगतीचा परिणाम विनासायास आणि बराचसा न कळत होत असतो. संतसंगती लाभणे ही अत्यंत भाग्याची गोष्ट आहे. ती पूर्वपुण्याईमुळेच लाभते. ज्याच्याशी आपण संगत करावी, त्याचे गुणधर्म आपल्याला येऊन चिकटतात हे आपण पाहतो. समजा, काही लोकांनी इथे यायचे ठरविले. एकाने विचार केला की आपण पायीच जाऊ, दुसरा बैलगाडीने निघाला, तिसऱ्याने आगगाडीने प्रवास केला, तर चौथा मोटारने आला. सर्वजण जर एकाच ठिकाणाहून निघाले तर साहजिकच मोटारीने येणारा सर्वात लवकर पोहोचेल; म्हणजे ज्याच्याशी संगत केली त्या वाहनाचे गुणधर्म त्याला विनासायास लाभले. संगतीची दुसरी गंमत अशी की, ज्याच्या संगतीत आपण जातो त्याच्यापुढे आपले कर्तृत्व लोप पावते. इथून पुष्कळ मुले शिक्षण घेऊन पुढे कुणी वकील झाले, तर कुणी डॉक्टर झाले. परत इथे आल्यावर त्यांनी इथल्या मुलींशी लग्ने केली. त्या मुली फारशा शिकलेल्या नसतील; परंतु वकिलाशी लग्न केलेली वकिलीणबाई झाली, डॉक्टरशी लग्न केलेली डॉक्टरीण झाली. असे जर देहाच्या संगतीने सामान्य माणसाचेही गुणधर्म आपल्यात येतात, तर सत्संगतीचा परिणाम किती होत असला पाहिजे ! आपण तिकीट काढून गाडीत बसतो. आपल्या शेजारी कोण येऊन बसेल ते आपल्या हाती नसते. तो विडी ओढणारा असला आणि आपल्याला धूर सहन होत नसला तरी नाइलाजाने तिथेच बसावे लागते. व्यसनी किंवा विषयी माणसाची संगत ही अशी तापदायक, घातक असते. उलट सत्पुरुषाची संगत ही उत्तम, लाभदायी ठरते. सत्संगतीपासून सद्वासना आणि सद्विचार प्राप्त होतात.

एखादा साधू बैरागी असेल, झाडाखाली बसला असेल. तो स्वतः उपाशी असेल तर त्याच्याकडे येणारी मंडळीही उपाशी राहतील. समर्थांकडे कुणी गेला तर ते म्हणतील, "मी भिक्षेची झोळी घेतो, तूही घे; दोघेही भिक्षा मागून आणू, आणि जे मिळेल ते शिजवून खाऊ. पण संत गृहस्थाश्रमी असेल तर आपल्याकडे येणाराला तो वाटेल ते करून खायला घालील. अन्नानुसार वासना बनते, म्हणून संताघरचे अन्न मागून घेऊन खावे. संताची देहाने संगती लाभणे सुलभ नाही. तो राहात असेल तिथून आपण लांब राहात असू; आणि जवळ राहात असलो तरी प्रपंच-कामधंद्यामुळे चोवीस तासांत त्याच्या सान्निध्यात कितीसे राहता येणार ? मग देहसंगतीचा लाभ कितीसा मिळेल ? तेव्हा नामाची संगत हीच सर्वांना सदासर्वकाळ लाभण्यासारखी उत्तम सत्संगत होय.
**आजचे बोधवचन आहे - परमार्थ साधण्यास सत्संगती फारच उपयोगी पडते.**

## तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

तुका म्हणे त्यागें । विण चुकीजेना भोगें ॥३॥
व्याल्याविण करी शोभनतांतडी । चार ते गधडी करीतसे ॥१॥
कासया पाल्हाळ आणिकांचे देखी ।
सांगतां नव्हे सुखी साखरेसि ॥ध्रु.॥

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
मंगळवार, ११ एप्रिल २०२३
adhunikkesari.com | Adhunik Kesari

# वसंत मुंडे राज्यातील पत्रकारांचे 'कार्यसम्राट' नेतृत्व !

## मंत्रालय विधिमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष प्रमोद डोईफोडे यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** ग्रामीण पत्रकारांचे प्रश्न समजून घेऊन शासन स्तरावर पाठपुरावा करणारे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे हे महाराष्ट्रातील पत्रकारांचे कार्यसम्राट नेतृत्व आहे, असे प्रतिपादन मंत्रालय आणि विधीमंडळ वार्ताहर संघाचे नुतन अध्यक्ष प्रमोद डोईफोडे यांनी केले. ग्रामीण भागातील पत्रकारांना अर्थीक पातळीवर सक्षम करण्यासाठी यापुढे मंत्रालय विधिमंडळ वार्ताहर संघही राज्य पत्रकार संघाबरोबर समन्वयाने काम करेल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय कार्यालयात मंत्रालय विधीमंडळ वार्ताहर संघाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल प्रमोद डोईफोडे यांचा संपादक धनंजय लांबे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे होते. तर मंत्रालयातील जेष्ठ पत्रकार चंदन शिरवाळे, विभागीय अध्यक्ष वैभव स्वामी, संभाजीनगर जिल्हाध्यक्ष प्रभू गोरे, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य बाबा श्रीहरी देशमाने, यांची प्रमुख उपस्थिती होती. सत्काराला उत्तर देताना प्रमोद डोईफोडे म्हणाले, शहरी आणि ग्रामीण भागातील पत्रकारांचे प्रश्न वेगवेगळे आहेत. ग्रामीण पत्रकारांचे प्रश्न समजून घेऊन मंत्रालय स्तरावर प्रश्नांचा पाठलाग करणारे वसंत मुंडे महाराष्ट्रातील पत्रकारांचे सक्षम कार्यसम्राट नेतृत्व आहे. व्यापक जनसंपर्क आणि कोणताही प्रश्न हाती घेतला तर तडीस लावण्याची वृत्ती त्यांच्या अंगी आहे. ग्रामीण भागातील पत्रकारांमुळेच सर्वसामान्य माणसाच्या समस्या शासन दरबारी पोहोचतात. त्यामुळे ग्रामीण भागातील पत्रकार आर्थिक पातळीवर सक्षम असला पाहिजे यासाठी यापुढे मंत्रालय विधिमंडळ वार्ताहर संघ राज्य पत्रकार संघाबरोबर समन्वयाने काम करून राज्यातील पत्रकारांना न्याय मिळवून देण्यासाठी पुढाकार घेईल.

प्रसंगी न्याय मागण्यासाठी आंदोलन उभे करू, अशीही ग्वाही ही प्रमोद फोईफोडे यांनी दिली. तर संपादक धनंजय लांबे यांनी ग्रामीण भागातील पत्रकारांच्या समस्या शासन दरबारी सोडवण्यासाठी मंत्रालय वार्ताहर संघाची साथ महत्वपूर्ण राहील. वृत्तपत्रांचे अर्थकारण आणि पत्रकारांच्या समस्या यावर राज्यभर अधिवेशन घेऊन शासन दरबारी आणि सामाजिक पातळीवर या विषयाला वाचा फोडण्याचे काम वसंत मुंडे यांनी केले आहे. त्यांच्या भूमिकेमुळे वृत्तपत्र क्षेत्रात काम करणाऱ्यांमध्ये सकारात्मक वातावरण निर्माण झाल्याचे मतही लांबे यांनी व्यक्त केले. प्रस्तावित डॉ. प्रभू गोरे यांनी केले. मराठवाडा विभागातील पदाधिकारी, पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### मंत्रालय विधीमंडळ वार्ताहर संघ ग्रामीण पत्रकारांच्या पाठीशी : चंदन शिरवाळे

यावेळी मंत्रालय विधीमंडळ वार्ताहर संघाचे माजी अध्यक्ष चंदन शिरवाळे म्हणाले, वसंत मुंडे यांच्या रूपाने महाराष्ट्राला खराखुरा पत्रकारांचा नेता मिळाला आहे. कुशल संघटक आणि धडाडीने काम करण्याची वृत्ती मुंडे यांच्या ठायी आहे. पत्रकारांच्या वैयक्तिक, सार्वजनिक प्रश्नांवर तळमळीने काम करतात. दहा वर्षांपासून मी त्यांना जवळून अनुभवले आहे, त्यांच्यात प्रश्न सोडण्याची व माणसे जोडून ठेवण्याची अद्‌भूत कला आहे. आता पत्रकारांच्या घरांसाठी मुंडे यांनी भविष्यात महाराष्ट्रव्यापी काम उभे करावे, त्यांच्या हातून पत्रकारांचे कल्याण व्हावे, मंत्रालय विधीमंडळ वार्ताहर संघ ग्रामीण पत्रकारांच्या पाठीशी भक्कमपणे उभा आहे, अशी ग्वाही शिरवाळे यांनी दिली.

# दूधपुरीच्या शेतकरी पुत्राने बनवले अपघात झाल्यावर अलर्ट किट

## संबंधितांना जाणार मेसेज, कॉल व जागेचे लोकेशन

आधुनिक केसरी न्यूज

**रामदास पटेकर**

**अंबड :** सध्याच्या काळात अपघाताचे प्रमाण खूपच वाढले असून अपघातातील बळींची संख्याही वाढली आहे. कुणाचा कधी अपघात होईल तसेच सकाळी वाहन घेवून घराबाहेर पडलेला विना अपघात घरी परत येईल हे ठामपणे सांगताच येत नाही. वास्तविक कोणाचाच अपघात होवू नये, पण वेळ-काळ ही सांगून येत नसल्याने खबरदारी घेणेच महत्वाचे आहे.अपघात झाल्यावर जखमींना लगेच मदत मिळाली तर त्यांचा जीव वाचण्यास मदत होवून जिवीतहानी टळू शकते. याच कल्पनेतून दुधपुरी ( ता. अंबड ) येथील एका शेतकऱ्याच्या पोरानं 'अक्सिडेंट अलर्ट सिस्टीम' किट तयार केली असून या किटमुळे अपघातग्रस्तांना तात्काळ मदत मिळणे सोपे होणार आहे. मत्स्योदरी कॉलेजमध्ये बीए प्रथम वर्षात शिक्षण घेत असलेल्या दुधपुरी ( ता.अंबड ) येथील राजेंद्र आबाजी पाचफुले या विद्यार्थ्याने ही किट बनवली असून त्याने या किटची यशस्वी चाचणीही पूर्ण केली आहे.त्याला गावाहून शिक्षणासाठी दररोज दुचाकीवरून यावं लागायचे.रोजच्या 15 किमीच्या प्रवासादरम्यान त्याने अनेकदा अपघात झालेले बघितले. अपघातानंतर जखमींना वेळीच मदत होत नसल्याने बऱ्याचदा जखमींचा उपचाराअभावी जीव जातो. यासाठी काहीतरी केलं पाहिजे, असा विचार राजेंद्रच्या मनात आला. अपघातानंतर तात्काळ त्याची माहिती रुग्णवाहिका, पोलीस तसेच नातेवाईकांना मिळाली तर संबंधितांना मदत करणे सोपे होईल अशी कल्पना त्याच्या डोक्यात आली आणि या कल्पनेतूनच त्याने 'ॲक्सिडेंट अलर्ट सिस्टीम' बनवली. ही किट ज्या वाहनात बसवलेली असेल त्या वाहनाचा अपघात झाल्यास तात्काळ पोलीस यंत्रणा, रुग्णवाहिका तसेच नातेवाईकांना मेसेज व कॉल जाईल विशेष म्हणजे अपघात झालेल्या ठिकाणाचं लाईव्ह लोकेशन देखील. राजेंद्र पाचफुले हा शेतकरी कुटुंबातील असून त्याची घरची परिस्थीती जेमतेमच आहे. त्याच्याकडे 3 एकर शेती असून आई- वडील शेती करतात. अशा परिस्थितीत त्यांनी राजेंद्र आणि त्याच्या लहान भावाला शिकवलं. राजेंद्रने स्वतःजवळ साठवलेल्या 5 हजार रुपयांत आपल्या कल्पकतेने 'ॲक्सिडेंट अलर्ट सिस्टीम' बनवले आणि ते बाईकला बसवून त्याची यशस्वी चाचणीही पूर्ण केली आहे.या किटद्वारे अपघातानंतर वेळीच माहिती मिळाल्याने निश्चितच अनेक जखमींचा जीव वाचवण्यासाठी ती खूप महत्वाची ठरणार आहे.





### वाहन चोरी गेल्यास ट्रॅक करण्यासही किटची मदत

राजेंद्र पाचफुले याने बनवलेल्या या 'ॲक्सिडेंट अलर्ट सिस्टीम' कीटचं नातलग, मित्रपरिवारासह इंजिनिअर, उद्योजक अशा सर्वच क्षेत्रातील लोकांकडून कौतुक होतंय . या किटमुळे वाहनाचा अपघात होताच त्याची माहिती तात्काळ मिळण्यासाठी मदत होणार आहे . याशिवाय वाहन चोरी गेल्यास ते ट्रॅक करण्यासाठी देखील या किटची मदत होईल असा दावा राजेंद्रने केला आहे . ही एक किट बनवण्यासाठी त्याला 5 हजार रुपये खर्च आला परंतु मोठ्या प्रमाणावर किट बनवण्यासाठी कमी खर्च येईल त्यामुळे ती सर्वसामान्यांना वापरता येईल असे देखील राजेंद्रने यावेळी सांगितले .

### अपघात घडवून केली किटची यशस्वी चाचणी

राजेंद्र पाचफुले याने ही 'ॲक्सिडेंट अलर्ट सिस्टीम' बनवतांना ग्लोबल कम्युनिकेशम आणि ग्लोबल पोजिसिंग सिस्टीमच्या तंत्राचा वापर केला . जीपीएस,अँड्रॉइड,जीएसएम आणि कोडिंग सॉफ्टवेअरसह सेन्सर्सचा वापर करून त्याने ही सिस्टीम डेव्हलप केली . ही किट दुचाकीला बसवून त्याने 55 ते 60 किमी प्रतितास वेगाने दुचाकीचा अपघात घडून आणला आणि या सिस्टीमची चाचणी यशस्वीपणे पूर्ण केली . या चाचणीदरम्यान दुचाकीला अपघात होताच सिस्टीमधील व्हायब्रेट सेंसर ॲक्टिव्ह झाले . त्यानंतर अँड्रॉइड आरडीओ सिस्टीम ॲक्टिव्ह होऊन जीपीएस सिस्टीमला आणि जीपीएस सिस्टीमने जीएसएम सिस्टीमला ॲक्टिव्ह केले . यानंतर त्याच्या मोबाईलवर टेक्स्ट मॅसेज, कॉल आणि अपघाताचे लाईव्ह लोकेशनही मिळाले .

# अर्ध्या तिकीटामुळे महिलांना माहेरची ओढ

## पैठण आगारातून दीड लाख महिलांनी केला आजपर्यंत प्रवास

आधुनिक केसरी न्यूज

**दादासाहेब घोडके**

**पैठण :** राज्य सरकारने एसटी प्रवासात महिलांना 50 टक्क्यांची सूट दिली आणि राज्यातील एसटीमध्ये महिला प्रवासी संख्या झपाट्याने वाढली. अमंलबजावणी झाल्यापासून पैठण आगारातुन १ लाख ३६ हजार महीला भगिनींनी आजपर्यंत अर्ध्या तिकिटावर प्रवास केला आहे. राज्यभरातील अनेक बस स्थानकावर आणि बसमध्येही महिला प्रवाशांची गर्दी मोठ्या प्रमाणात वाढली. ताई, माई, अक्का, काकू, मावशी आणि आजी सगळ्या प्रवासाला निघाल्या. कुणी देवस्थानाला कोणी जात आहे तर कुणी वास्तुशांतीसाठी जातेय. कुणी पर्यटनाला निघाले तर कोणी रोजच्या प्रवासा मुळे होणाऱ्या वैयक्तिक खर्चात कपात करण्यासाठी निघालेय. कुणी रुग्णालयात तर कुणी बाजारला निघालेय. साधी बस असो की शिवशाही या गाडीमध्ये अर्धे तिकीट आकारले जात असल्यामुळे महिला प्रवाशाची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे.



शासनाने सुरु केलेल्या महिलांना अर्धे टिकिट योजनेमुळे पैठण आगारातून दररोज महिलांचा बस प्रवास वाढला आसल्याचे चित्र आहे . महिलांसाठी उत्कृष्ट योजना असून चांगला प्रतिसाद मिळत आहे . त्यामुळे आगराचे उत्पादन वाढले आहे . आतापर्यंत एक लाख 36 हजार महिलांनी प्रवास केला आहे .

**गजानन मडके, आगर प्रमुख, पैठण**



# वाघांची संख्या वाढली

आधुनिक केसरी

गेल्या चार वर्षांमध्ये वाघांची संख्या २००ने वाढली असून, सध्या देशामध्ये ३,१६७ वाघ आहेत,' अशी माहिती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी जाहीर केली. वाघांच्या गणनेबाबतचा अहवाल मोदी यांनी प्रसिद्ध केला. सन २००६मध्ये १,४११, २०१०मध्ये १,७०६, २०१४मध्ये २,२२६, २०१८मध्ये २९६७ तर २०२२मध्ये देशात ३,१६७ वाघांची नोंद झाली आहे. 'प्रोजेक्ट टायगर'च्या ५०व्या वर्षपूर्तीनिमित्त आयोजित कार्यक्रमामध्ये मोदी यांनी 'इंटरनॅशनल बिग कॅट अलायन्स'ची सुरुवात केली आणि 'अमृत काल का टायगर व्हिजन' हे माहिती पुस्तक प्रसिद्ध केले. तसेच यावेळी व्याघ्रसंवर्धनाचे पुढील २५ वर्षांचे नियोजनही मांडण्यात आले. वन्यप्राण्यांचे जतन आणि संवर्धन हा जागतिक प्रश्न असून, 'इंटरनॅशनल बिग कॅट अलायन्स'च्या माध्यमातून भारत आपले प्रयत्न करत आहे. 'दशकांपूर्वी चित्ते भारतातून नामशेष झाले होते. मात्र, नामिबिया आणि दक्षिण आफ्रिकेतून चित्ते पुन्हा भारतात आणून त्यांच्या जतन, संवर्धनाची पुन्हा एकदा सुरुवात करण्यात आली आहे. स्थलांतर करून आणलेल्या चित्त्यांचे पुनर्वसन करण्याचा प्रयत्न यशस्वी झाला आहे', असे मोदी यांनी सांगितले. पर्यावरणाच्या भरभराटीसाठी वन्यजीवनातील समृद्धी महत्त्वाची आहे. भारतात आता हे घडत आहे. निसर्गाचे रक्षण करणे हा भारतीय संस्कृतीचा भाग आहे. पर्यावरण की अर्थव्यवस्था या संघर्षावर आमचा विश्वास नाही. दोघांच्याही अस्तित्वाला समान स्थान असल्याने एकत्र विकासावर आमचा भर आहे', असे त्यांनी नमूद केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी सकाळी बंदिपूर व्याघ्र प्रकल्पाला भेट देऊन तेथे जंगल सफारीचा आनंद लुटला. खुल्या जीपमधील २० किमीच्या सफारीतून त्यांनी निसर्गाचे रूप न्याहाळले. सफारीसाठी योग्य कपडे, जॅकेट आणि टोपी घालून त्यांनी दुर्बिण आणि कॅमेरातून जंगलातील वैविध्य समजून घेतले आणि टिपलेही. सकाळी हेलिकॉप्टरने मेलुकामा नाहाल्ली येथे आल्यानंतर रस्तेमार्गे प्रवास करत ते बंदिपूर येथे पोहोचले. त्यानंतर खुल्या जीपमधून सफारी केली. मोदींनी त्यांच्या सफारीची छायाचित्रे त्यांच्या ट्विटरवर शेअर केली आहेत. हत्ती, वानर, हरीण आणि गवे यावेळी दिसल्याचे त्यांनी म्हटले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी डोंगराळ निलगिरी जिल्ह्यातील मुदुमलाई येथील थेप्पाक्कडू हत्ती कॅम्पला भेट दिली आणि ऑस्कर विजेत्या माहितीपटातील हत्तींची काळजी घेणारे बेली आणि बोमन यांच्याशी संवाद साधला. हत्तींची देखभाल करणाऱ्या या जोडप्याला भेटून पंतप्रधानांनी आनंद व्यक्त केला. 'द एलिफंट व्हिस्परर्स' या माहितीपटाच्या माध्यमातून बेल्ली आणि बोम्मन यांचे हत्तींसह जगणे मांडण्यात आले आहे. 'बोम्मी आणि रघू (हत्तीची पिल्ले) यांच्यासह बोमन आणि बेली यांना भेटून खूप आनंद झाला', असे ट्वीट मोदी यांनी केले.

# महात्मा फुलेंची प्रासंगिकता...



कपिल महानंदा
संपर्क क्र. : 8329522441

आधुनिक केसरी

**महात्मा जोतिबा फुलेंना निव्वळ भटशाहीवर हल्याचे हत्यार बनवने हा त्यांच्या विचार-कृतीशी केलेला द्रोह... भारतातील उत्पादनसंबंध हे केवळ वर्गीय नाही तर तो जात-वर्गीय आहे. परिणामी युरोपसारखा वर्गसंघर्ष हा भारतीय मुक्तिसमस्येची सोडवणूक करु शकत नाही. जात ही उत्पादनसंबंध असल्यामुळे आणि जात ही श्रेणीबद्ध असल्यामुळे या देशातल्या मुक्तीचवळीला जात ही इमला संबोधून दुर्लक्षिता येत नाही. जात ही मूलतः विभाजक असल्यामुळे भारतात वर्गसंघर्षाला एकजिनसी रुप येण्यात जात मोठा गतिरोध निर्माण करते हा गेल्या शतकाचा अनुभव आहे.**

आधुनिक भांडवली उत्पादनपध्दतीमुळे जाती-जातींत निर्माण होणारे वर्गस्तर हे जात्यन्ताच्या शक्यता घेवून जन्माला येत असले तरी जात्यन्तक वर्गभानाशिवाय क्रांतिकारी संघर्ष यशस्वी होणार नाहीत. परंतु भटमुक्त भारत हा कार्यक्रम मांडणारे नेहमीच आपल्या प्रेरणास्त्रोतांमध्ये तथागत गौतम बुध्द आणि जोतिबा फुल्यांचे नाव अग्रक्रमाने घेतात. महात्मा फुलेंचे नाव तर अशा आवेशात घेतले जाते की, भटमुक्त भारत हा कार्यक्रम जणू त्यांनीच दिलेला आहे. परंतु एका जातीला वा वर्णाला टार्गेट करण्याचा आततायीपणा ना बुध्दाने केला ना जोतिबाने केला ही वस्तु आहे.

दुय्यम शेतकरी जातीतून आलेल्या महात्मा फुलेंचा बहुजनवाद हा शुद्रातिशूद्र आणि स्त्रियांबद्दल प्रचंड कळवळा असणारा होता. शेटजी. भटजी, जमीनदार या शोषकांचा शूद्रातिशूद्र या शोषित-पीडितांशी असणारा जातीय उत्पादन संबंध नष्ट करणे ही फुल्यांच्या बहुजनवादाची आद्यप्रेरणा होती. सर्वसाक्षी जगतपती त्याला नकोच मध्यस्थी' अशी गर्जना करणा-या जोतिबा फुलेंनी ईश्वर व भक्त यांच्यात मध्यस्थ बनून शोषण करणारा भटजी हा धार्मिक संबंध नष्ट व्हावा म्हणून ब्राह्मणशाहीवर घणाघाती हल्ला चढवला. याचाच अर्थ त्यांचा बहुजनवाद हा जात्यन्तक क्रांतीला चालना देणारा होता. परंतु त्याचे वैशिष्ट्य हे की, तो जातीच्या पायावर उभा नव्हता तर वर्गीय पायावर उभा होता. समाजाला वर्गीय दृष्टी देण्याचे अथवा वर्गजाणीव देण्याचे काम सर्वात प्रथम महात्मा फुले यांनी केले, असे डॉ. रावसाहेब कसबेंनी जवळपास चाळीस वर्षांपूर्वीच दाखवले होते. सत्यशोधक चळवळीचे रुपांतर ब्राह्मणेतर चळवळीत झाल्यावर भटजींवरील हल्ल्याला आणखी धार चढलेली दिसते. याचे कारण ब्राह्मणेतर चळवळ ही वरचढ शेतकरी जातींच्या हातात एकवटलेली होती. वरचढ शेतकरी जातींचा जमीनदारांशी असणारा हितसंबंध आणि ब्राह्मणांशी असणारे उतरंडीचे वैर यांमुळे ब्राह्मणेतर चळवळीचा पाया जातीय बनला. सत्यशोधक चळवळीचा पाया वर्गीय होता हे विसरता कामा नये, गेली हजारो वर्षे ब्राह्मणांनी सांस्कृतिक प्रभुत्वाव्दारे दलित व बहुजनांची अखंड पिळवणूक केली यात वाद नाही. पितृसत्ताक वर्णजाती-विरुद्धचे सारे उठाव ब्राह्मणशाहीने अत्यंत निर्दयतेने मोडीत काढण्याची हजारो वर्षांची परंपरा आहे. त्यात दलित व बहुजनांच्या हजारो नायक-नायिकांचा बळी गेलेला आहे. हा रक्तरंजित इतिहास दलित व बहुजनांच्या नेणिवेतून गर्ततेत खोलवर दफन झालेला आहे. भारतीय जनता जाणिवेत पितृसत्ताक वर्ण-जातीसमर्थक असली तरी नेणिवेत मात्र पितृसत्ताक वर्णजातीविरोधक आहे, हे कॉ. शरद पाटील यांचे निदान अचूक असल्याचा निर्वाळा मौखिक व लोकसांस्कृतिक परंपरांमधून मिळतो.

पितृसत्ताक वर्ण-जातविरोधी प्रबोधनाने व संघर्षाने शूद्रातिशूद्रांतील सुप्त अब्राह्मणी नेणीव प्रवाहित होते आणि ब्राह्मणी- अब्राह्मणी या सांस्कृतिक संघर्षाचे आत्मभान निर्माण होताच ही अब्राह्मणी नेणीव ब्राह्मणेतरवादाकडे घेवून जाते. त्यातून ब्राह्मण ही जात हीच आपल्या समग्र दुःखाचे कारण असून ब्राह्मण हेच आपले दुश्मन आहेत या स्वरुपात ब्राह्मणेतरवाद उदयाला येतो. हा ब्राह्मणेतरी बहुजनवाद ब्राह्मणांची जात ही जन्माधिष्ठित मानीत असल्याने व ब्राह्मणेतरांतील ब्राह्मण्याकडे साफ दुर्लक्ष करीत असल्यामुळे त्याचे शत्रू व मित्र ठरवण्याचे निकष हे अंतिमतः ब्राह्मणीच ठरतात. एकोणिसाव्या शतकातील महात्मा जोतिबा फुले यांची सत्यशोधक चळवळ व विसाव्या शतकातील आंबेडकरी चळवळ या दोन्ही चळवळींची अंतःप्रेरणा म्हणजे आपली चळवळ या जातीच्या कोषात अडकू नये यासाठीची प्रयत्नशीलता. जोतिबांनी आपली समतेची कल्पना अखिल मानव समाजाच्या मुक्तीशी जोडलेली होती. जगभरातील सर्व प्रकारच्या विषमतेविरुद्ध मानवी स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेशी जोडलेली होती. त्यांची समतेची कल्पना स्त्री व पुरुष यांना समान मानणारी होती. माणसाचे माणसाकडून होणारे शोषण नाकारणारी होती. म्हणुनच त्यांनी त्यांचा गुलामगिरी हा ग्रंथ अमेरिकेतील कृष्णवर्णीय ब्लॅक गुलामांना दास्यत्वातून मुक्त करणा-या सदाचारी लोकांना अर्पण केलेला होता. महात्मा जोतिबा फुले यांची ही विश्वमानवमुक्तीची प्रेरणा दुर्लक्षित करुन फुले म्हणजे भटमुक्त भारत या कार्यक्रमाचे उदगाते या आवेशात फुलेंना सादर करणे म्हणजे त्यांचे विकृतीकरण करणे होय. 'बुडती हे जन देखवे ना डोळा, मनी कळवळा, म्हणोनिया म्हणणा-या तुकारामांप्रमाणेच महात्मा फुले मध्ये मानवी दुःखाबाबत प्रचंड संवेदनशालता होती. त्यामुळेच लैंगिक शोषणास बळी पडलेल्या व त्यातून गर्भवती राहिलेल्या ब्राह्मण विधवा महिला आत्महत्या करतांना पाहून व्यथित झालेल्या महात्मा फुल्यांनी स्वतःच्या घरात अशा महिलांसाठी बाळंत होण्याची व्यवस्था केली. हवे असेल तर मूल घेवून जावे, नसेल तर इथेच ठेवून जावे असा पर्यायही त्या ब्राह्मण महिलांसमोर त्यांनी ठेवला. भारतातील डाव्या चळवळी जातीच्या कोषात अडकलेल्या नसल्या तरी त्या कर्मठ वर्गवादामुळे जात्यन्तकही नाहीत याउलट दलित चळवळ व ब्राह्मणेतर चळवळ वर्गीय पायावर उभ्या नसल्या तरी त्या जातीच्या कोषात अडकून पडलेल्या असल्यामुळे त्याही जात्यन्तक नाहीत! या देशातील सर्व प्रकारच्या परिवर्तनवादी चळवळींनी जातीच्या कोषातून बाहेर पडणे किती महत्वाचे आहे याबाबत डॉ .रावसाहेब कसबे यांनी अत्यंत मूलभूत मार्गदर्शन केलेले आहे ते म्हणतात, 'कोणत्याही चळवळीला जर सौध्दान्तिक पाया नसेल, वैचारिक दृष्टी नसेल, गतेतिहासाकडे बघण्याचा वास्तववादी दृष्टिकोन नसेल आणि सामाजातील अंतःप्रवाहांचे भान नसेल तर अशी चळवळ जातीच्या कोषातून बाहेर पडण्याची शक्यता नसते. चळवळ कितीही विद्रोही असो, विज्ञाननिष्ठेचा ती कितीही डांगोरा पिटो, तिचे महत्व आणि मोठेपण तिच्यातील जातीच्या कोषातून बाहेर पडण्याच्या क्षमतेवर अवलंबून आहे.' आज फुले-आंबेडकरांचा वारस सांगणा-यानी त्यांच्या संघटना जातीय कोषात अडकणार नाहीत याची खबरदारी घेतल्याशिवाय जात्यन्तक क्रांतीला चालना मिळणार नाही. महात्मा फुले यांच्या जात्यन्तक सत्यशोधकीय चळवळीला ब्राह्मणेतरी ठरवून डाव्यांनी प्रेरणाच घेण्याचे टाळल्याचे दिसुन येते. याबाबत डॉ.रावसाहेब कसबे बिनतोड शब्दात सांगतात की, भारतात खरा पिळला गेलेला जनसमुदाय कोणता या प्रश्नाचे उत्तर कम्युनिस्टांना सापडू शकले नाही. म्हणून शेतमजुरांच्या संघटनांकडे, स्त्रियांच्या चळवळीकडे आणि जातिसंस्थेतून होणा-या पिळवणुकीकडे कम्युनिस्ट लक्ष देवू शकले नाहीत. स्त्रियांना शिक्षणाची दारे मोकळी करणारा, शेतमजूर आणि शेतक-यांना जातीपातीची बंधने झुगारुन एकत्र आणणा-या महात्मा फुलें यांच्यापासून कम्युनिस्टांनी प्रेरणा घेतल्या असत्या तर चळवळीतल्या चुका टाळता आल्या असत्या अशी माझी नम्र समजूत आहे. फुल्यांच्या प्रासंगिकता महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडरांनी ओळखली म्हणूच त्यांनी जोतिबा फुले यांना आपले गुरू मानले, महात्मा फुलेंनी लोकभाषेत शेटजी व भटजी हे शत्रू सांगितले तर महामानव डॉ. आंबेडकरांनी याच संघर्षाचे विकसित मॉडेल देताना समाजशास्त्रीय, अर्थशास्त्रीय भाषेत भंडवलशाही आणि ब्राह्मणशाही या प्रमुख दोन शत्रूंवर शिक्कामोर्तब केले. महात्मा फुले निर्मिक मानत असले तरी ते पूर्णतः इहवादी होते, निर्मिकाचा उल्लेख ते सर्वांना निर्मिकाने निर्माण केलेले असल्याने सर्व समान आहेत. कुणी उच्च नाही वा कुणी कनिष्ठ नाही हा समताविचार सांगण्यासाठी करीत, याउपर निर्मिकाला त्यांच्या विचारांत जास्त किंमत नाही. फुल्यांचा इहवाद त्यांना आधुनिक भौतिकवादाच्या जवळ नेणारा आहे. कॉ. शरद पाटील फुल्यांच्या इहवादाचे समीकरण युरोपियन प्रबोधन युगातल्या रुसोच्या यांत्रीक भैतिकवादाशी करतात. जोतिबा फुलेंनी भारतीय प्रबोधन युगाचा पाया रचला, आणि क्रांतिकारी प्रबोधन हे पितृसत्ताक जातिव्यवस्थेविरुद्ध असले पाहिजे हे लोकभाषेत, लोकशैलीत आणि लोकजीवन परंपरेचा आधार घेवून सांगितले. बळीराजाचे मिथक व त्याची वास्तवता उलगडून या देशात हजारो वर्षापासून ब्राह्मणी- अब्राह्मणी संघर्ष सुरू असल्याचे निदान सर्वप्रथम केले. 2014 च्या लोकसभा निवडणुकिनंतर जे निकाल आले आणि त्यानंतर ब्राह्मणी धर्म- संस्कृतीने मांडलेले वर्चस्ववादाचे उघड प्रदर्शन पाहुन काही डाव्यांनी भारतातील ब्राह्मणी- अब्राह्मणी या ऐतिहासिक सांस्कृतिक अंतविरोधाची दखल घ्यायला सुरवात केलेली दिसते, हे आशादायी चित्र आहे. व्दंव्दात्मक भौतिकवादासारखे तत्त्वज्ञानातले दादा सिद्धांत नसले तरी शोषित-पीडित जनतेबाबतचा प्रचंड कळवळा, समता तत्त्वांशी असणारी अव्यभिचारी निष्ठा यामुळे महात्मा फुल्यांची चळवळ जात वर्ग वास्तवाला भिडण्याचे सामर्थ्य बाळगून होती. म्हणूनच कॉ. शरद पाटील सार्थ शब्दात सांगतात. ' फुलेंनी भारतीय मुक्तिसतस्येचे उत्तर दिले नाही, त्या काळी ते शक्यही नव्हते. पण त्यांनी मुक्तिसमस्या अशा रीतीने उभी केली की, तिचे अचूक उत्तर शोधणे शक्य व्हावे. फुलेवादाची महत्ता ही आहे. फुलेवादाचे पुनरुत्थान म्हणूनच झाले आहे. महात्मा फुल्यांचा सत्यशोधकीय बहुजनवादी संघर्ष पुरोहित ब्राह्मणांकडून शूद्रातिशूद्रांवर लादल्या जाणा- या सांस्कृतिक धार्मिक दास्याविरुध्द जसा होता तसाच तो सावकार- जमीनदारांकडून शूद्रातिशूद्र कष्टक- यांच्या केल्या जाणा-या आर्थिक पिळवणुकीविरुद्ध सुध्दा होता. त्यामुळेच महात्मा फुल्यांची चळवळ ही या देशातील पहिली मुक्ती चळवळ ठरते. जिला जात व वर्ग वास्तवाचे भान होते. हे भान असल्यामुळेच गुलामगिरी व ब्राह्मणांचे कसब लिहून जबरदस्त सांस्कृतिक विद्रोह उभा करणारे जोतिबा शेतक-यांचा आसूड सुद्धा लिहितात. मुलींसाठी, अस्पृश्यांसाठी शाळा सुरू करीत असतांनाच नारायण मेघाजी लोखंडे यांच्या माध्यमातून या देशातील पहिली कामगार युनियन स्थापन करतात. धार्मिक-सांस्कृतिक दास्याला नकार देत असतानाच सार्वजनिक सत्यधर्मात नव्या समतावादी मुल्यांची, विश्वमानव मुक्तीची सजक चर्चाही करतात. त्यामुळे या देशातील सर्व समाजक्रांतीचे बाळंतपण जोतिबा फुले यांनी केलेले आहे हे फुल्यांचे चरित्रकार पंढरीनाथ पाटील यांचे विधान सार्थ वाटते. भारतात लोकशाही क्रांती यशस्वी करण्यासाठी जातिअंतक सांस्कृतिक क्रांतीच ऐलान करावे लागेल. आणि ही जात्यन्तक सांस्कृतिक क्रांती फुले आंबेडकरांच्या खांद्यावर उभे राहूनच पुढे जाणार आहे. भारतीय प्रबोधन युग जोवर लोकशाही क्रांती पाहत नाही, तोवर महात्मा फुले प्रासंगिक आहेत हे ठामपणे म्हणता येईल. भटमुक्त भारताच्या घोषणा देणा-यांना केवळ भटशाहीवर हल्लाबोल करण्यासाठी फुले हवे आहेत. परंतु माझ्या पिढीच्या जात्यन्तक क्रांतीच्या शिलेदारांना फुल्यांची प्रासंगिकता आणि सामर्थ्य लक्षात येऊ लागलेले आहे.

# आता महाराष्ट्रात सततचा पाऊस नैसर्गिक आपत्ती ठरणार...

आधुनिक केसरी

**अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचं अतोनात नुकसान झालं आहे. हातातोंडाशी आलेलं पिक पाण्यात वाहून गेलं आहे. त्यामुळे आता अवकाळी पावसामुळे होणारे नुकसान हे आता नैसर्गिक आपत्ती म्हणून निश्चित केले जाणार असल्याचा महत्त्वाचा निर्णय महाराष्ट्र सरकारने घेतला आहे राज्य सरकारच्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत चर्चा झाली. दरम्यान, या बैठकीत अवकाळी पावसामुळे होणारे नुकसान हे आता नैसर्गिक आपत्ती म्हणून निश्चित केले जाणार असल्याचा महत्त्वाचा निर्णय सरकारने घेतला.**

राज्यात गेल्या दोन वर्षात झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेली पिके पाण्यात वाहून गेली. गेल्या महिन्यातही झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे पुन्हा अतोनात नुकसान झाले. त्यामुळे शेतकऱ्यांवर वारंवार येणाऱ्या या संकटावर मत करण्यासाठी आता अवकाळी पावसामुळे होणारे नुकसान हे आता नैसर्गिक आपत्ती म्हणून निश्चित करण्यासंदर्भातील महत्त्वपूर्ण निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. यापूर्वी शेतकऱ्यांना अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई करताना अडचण निर्माण होत होती. त्यामुळे अवकाळी पाऊस हा आता नैसर्गिक आपत्ती म्हणून गृहीत धरला जाणार आहे. या निर्णयामुळे शेतकऱ्यांना थेट आर्थिक मदत करणे आता शक्य होणार आहे. राज्यामध्ये गारपीट आणि अवकाळी पाऊस झाल्याने कडधान्य, फळपीके, भाजीपाला, गहू, हरभरा, कांदा, द्राक्ष, स्ट्रॉबेरी, संत्रा, मका इत्यादी पिकांचे नुकसान झाले आहे सरकारने घेतलेला निर्णय हा निर्णय निश्चितच शेतकऱ्यांच्या हिताचा आहे मात्र पात्र लाभार्थींना आणि पिकांचे पंचनामे योग्य करुन भरपाई दिली पाहिजे तरचं या निर्णयाचा हेतू सफल होईल हे मात्र नक्की !!

**राजू जाधव, मांगूर जि. बेळगाव**



हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मित्र



किरण डोंगरदिवे
संपर्क 7588565576

आधुनिक केसरी

**बाबासाहेब आंबेडकर यांनी निर्जीव पण ज्ञानदात्या ग्रंथांना आपले मित्र मानले. मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्याला जीवनध्येय मानून त्यांच्या चळवळीचा आणि जीवनाचा भाग झालेले लोक बाबासाहेबांच्या सोबत होते. रक्ताच्या नात्यापेक्षाही मैत्रीचे नाते मोलाचे म्हंटले जाते. मग सामाजिक जाणिवेतून बाबासाहेबांच्या सोबत असणारे बाबासाहेबांचे अनुयायी किंवा मित्रच होते असे म्हणणे मला चांगले वाटते. दादासाहेब गायकवाड यांचे नातू यांनी सांगितलेला एक प्रसंग म्हणजे दलितांची मंदिर प्रवेशासाठी बाबासाहेब आंबेडकर यांनी २ मार्च १९३० रोजी काळाराम मंदिरात प्रवेश करण्याचा निर्धार केला. पुढे त्यासंदर्भात जागोजागी बैठकी सुरू झाल्या. प्रवेश कसा करायचा, होणारा विरोध कसा असेल, कोण साथ देईल ह्याबाबत विचारविमर्श सुरू झाला.**

दलितांचा मंदिरप्रवेश म्हणजे अघटित घडणार धर्माविरुद्ध कार्य म्हणून प्रस्थापितांनी दंड थोपटले. दादासाहेब गायकवाड ह्यांनी मंदिराच्या पहाऱ्यासाठी भय्ये ठेवले जाणार अशी माहिती पत्राव्दारे बाबासाहेबाना दिली. दादासाहेब म्हणजे बाबासाहेबांची जणू सावली होते. प्रत्यक्ष आंदोलनाचा दिवस उजेडला. पोलिस बंदोबस्त मोठ्या प्रमाणात होता. दलित मंदिरप्रवेश करीत असताना अचानक विरोधकांनी मंदिराच्या कानाकोपऱ्यातून दगडांचा वर्षाव सुरू झाला. त्यातील एक दगड बाबासाहेबांच्या डोक्याला लागला. बाबासाहेबांना दगड लागल्याचे दिसताच बाबासाहेबांच्या जवळच उभ्या असलेल्या दादासाहेबांनी बाबासाहेबांना घट्ट मिठी मारली व बाबासाहेबांवरचा दगडांचा वर्षाव स्वतःच्या पाठीवर झेलला. दादासाहेबांची पाठ रक्तबंबाळ झाली, जखमा झाल्या. मात्र दादासाहेबांनी बाबासाहेबांची मिठी सोडली नाही. अशी बाबासाहेब आणि दादासाहेब म्हणजेच कृष्णाराव गायकवाड यांच्या नात्यांची वीण घट्ट होती.

बाबासाहेब आंबेडकर यांना मिलिंद कॉलेजची स्थापना करायचे वेळी दादासाहेब आघाडीवर होते अगदी मेनरोडवर असलेला वाडा विकून बाबासाहेबांना ७५ हजार रुपयांची रक्कम त्यांनी कॉलेजच्या उभारणीसाठी दिली. बाबासाहेब जेव्हा नाशिकला येत, तेव्हा ते दादासाहेबांच्या घरीच थांबत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर गोलमेज परिषदेला गेले असताना दादासाहेबांनी मुखेडचा सत्याग्रह केला. तो यशस्वी करून त्याचा इतिवृत्त पेपरमधील बातम्यांची कात्रणे त्यांनी बाबासाहेबांना पाठविली. चळवळीतील दोन महापुरुषांच्या मैत्रीचे एक दिलखुलास उदाहरण म्हणजे बाबासाहेब आंबेडकर आणि दादासाहेब गायकवाड ह्यांचा स्नेह होय. उच्चशिक्षणासाठी न्यूयॉर्क येथे बाबासाहेबांना लाला लजपतराय हया नेत्यांसह नवल भथेना नावाच्या विद्यार्थ्यांशी मैत्री झाली. लिव्हिंग्स्टन हॉल येथे गेल्यावर नवल भथेना हा गुजराथ मधील पारसी धनाढ्य विदयार्थी त्यांच्यासोबत राहत होता. बाबासाहेबांची जिद्द आणि ज्ञानासक्ती ह्यामुळे प्रभावित झालेल्या भथेना ह्यांनी पुढे शेवटपर्यंत बाबासाहेबांना मित्र म्हणून साथ दिली व मदतही केली. मूकनायक चालवताना आर्थिक अडचणी वाढल्याप्रसंगी मूकनायक बंद करावे लागते की काय असे चिन्ह दिसत असताना बाबासाहेब आणि भथेना यांच्यामध्ये पत्रव्यवहार झाला. त्या पत्रव्यवहारात उद्योगपती गोदरेज ह्या कंपनीचा उल्लेख सापडतो. ह्या गोदरेजसारख्या नामांकित कंपनीची जाहीरात मूकनायक सारख्या दलित पाक्षिकाला मिळण्यामध्ये भथेनांचाच मोठा वाटा होता भथेनांनी मूकनायकांच्या आठ अंकात गोदरेजची जाहीरात मिळवून दिली. अर्थतज्ज्ञ असलेल्या बाबासाहेब आंबेडकर ह्यांनी जेंव्हा शेअर्स संबंधी सल्ला देणारी कंपनी काढली. बाबासाहेबांचा अभ्यास इतका होता की त्यांच्या मार्गदर्शनामुळे लोकाना फायदा होऊ लागला मात्र त्याच्या जातीचा उल्लेख होऊन अर्थतज्ञ असलेल्या बाबासाहेबांचा व्यवसाय बुडाला तेंव्हा पुन्हा नवल भथेना धावून आले आणि त्यांच्या ओळखीने बाबासाहेबांना एका धनिक पारशी गृहस्थाचा हिशेव व पत्रव्यवहार करण्याचे काम मिळाले. 1923 मध्ये लंडनहुन परत आल्यावर बाबासाहेब वकिलीचा अर्धवट सोडलेला अभ्यासक्रम कसा पुर्ण करता येईला याच्या विचार करत होते वकिली सुरू करण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयात नोंदणी करणे आवश्यक होते, सनद आणण्यासाठीसुद्धा बाबासाहेबांच्या जवळ पैसे नव्हते अश्यावेळी 500 रुपये सनद मिळवून देण्यासाठी सुद्धा भथेना यांनी मदत केली. 1920 मध्ये पुन्हा विदेशात जाण्याची गरज पडली तेव्हा बाबासाहेबांनी नवल भनेथा कडुन रु.5000 रु कर्ज घेतले होते. जवळपास 100 वर्षांपूर्वीचे 5000 म्हणजे किती मोठी रक्कम होती ह्याचा आपण विचार करू शकतो महत्वाचे म्हणजे बाबासाहेबांना खरेतर सामाजिक परिस्थिती आणि जातीयवाद ह्यामुळे विद्धता असूनही यश मिळत नाही, ह्यांची जाणीव असून, पैसा कसा परत मिळेल ह्याबाबत निश्चित काहीही शाश्वतीचा विचार न करता नवल भनेथा ह्यांनी बाबासाहेबांना सातत्याने आर्थिक मदत उपलब्ध करून दिली. बाबासाहेबांना आर्थिक पाठबळ पुरवणाऱ्या मध्ये जिथे राजश्री शाहू महाराज आणि महाराजा सयाजीराव गायकवाड ह्यांचा मोठा वाटा आहे त्याचप्रमाणे नवल भनेथा हे सुद्धा अग्रक्रमाने येणारे एक नाव आहे असे असले तरी दुर्दैवाने बाबासाहेबांच्या मागे



भीमजयंती विचारमाला
भाग : दोन

खंबीरपणे उभे असलेल्या ह्या मित्रा बद्दल जास्त माहिती उपलब्ध नाही बाळ गंगाधर टिळक ह्याचें पुत्र श्रीधर टिळक ह्यांच्याशी असलेली बाबासाहेबांची मैत्री म्हणजे मैत्रीच्या नात्यात जातपात, धर्मभेद, उच्चनीच असा भेद तर नसतोच शिवाय मन जुळले की कोणताही पूर्वग्रह मनात न ठेवता निकोप मैत्री जपता येते ह्याचे उदाहरण होय. देशाचे दुष्मन ह्या पुस्तकात जेधे जवळकर ह्यांनी बाळ गंगाधर टिळकांचा अपमान केला म्हणून कोर्टात केस दाखल केल्यावर जेधें आणि जवळकर ह्यांचे वकील म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकर होते ही बाब विसरून बाबासाहेबांच्या विचारांनी प्रेरित होत श्रीधर टिळक बाबासाहेबांचे मित्र झाले. तसेच श्रीधर टिळक हे प्रचंड ब्राम्हण्याभिमान असलेल्या नेत्यांचे चिरंजीव आहेत हे मनात न ठेवता बाबासाहेबांनी श्रीधररावानां मित्र म्हणून स्वीकारले ह्यात ह्या दोन्ही मित्रांच्या मनाचा मोठेपणा दिसून येतो. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वात 4 सप्टेंबर 1927 रोजी दलित आणि दलितेत्तर जातीतील सुधारणावादी तरूणांनी परिवर्तनाच्या दिशेने अग्रेसर होत समाज समता संघाची स्थापना केली. समता नावाचे एक पाक्षिकही या परिवर्तनवादी तरुणांनी चालविले. श्रीधर टिळक ह्यांनी समता समाज संघाच्या आंतरजातीय विवाह आणि सहभोजनाचे समर्थन तर केलेच होते. शिवाय 8 एप्रिल 1928 रोजी समता समाज संघाची पुण्याची शाखा श्रीधर पंतांनी स्वतःच्या वाड्यात सुरू केली होती आणि उदघाटना साठी स्वतः बाबासाहेब त्या ठिकाणी हजर राहिले. विरोधकांनी हा कार्यक्रम सुरू असताना वीज बंद केली असता गोड्या तेलाचे दिवे लावून मंडळींनी बाबासाहेबांच्या सोबत सहभोजनाचा कार्यक्रम केला. श्रीधरराव पुणे शाखेच्या समता समाज शाखेचे उपाध्यक्ष झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाड येथे चवदार तळ्याचा सत्याग्रह केला होता त्यावेळी श्रीधर पंतांनी सत्याग्रहात आपला सक्रिय सहभाग नोंदविला. मुंबईला आल्यावर श्रीधरराव बाबासाहेबांना भेटल्याशिवाय जात नसत आणि बाबासाहेब पुण्यात आल्यावर त्यांनी आपल्या वाड्यात यावे म्हणून आग्रह धरत. 25 मे 1928 रोजी रेल्वेखाली आत्महत्या करण्यापूर्वी श्रीधरपंत ह्यांनी 3 चिठ्ठया लिहिल्या त्यातील एक चिट्ठी बाबासाहेबांना लिहिली होती श्रीधर टिळक ह्यांना मृत्यूसमयी सुद्धा बाबसाहेबांची आठवण राहावी आणि ज्या बाबासाहेबांनी बाळ गंगाधर टिळक ह्यांच्या मृत्यूबद्दल अगदी छोटीशी बातमी देत दखल घेतली होती त्याच बाबासाहेबांनी श्रीधर टिळक ह्यांच्या मृत्यूने व्यथित होऊन दुनिया या साप्ताहिकात श्रीधरपंत विषयी भरभरून लिहिले. बाबासाहेबांच्या बहुआयामी आणि अनन्यसाधारण व्यक्तिमत्वात त्यांनी जपलेले मैत्रीचे नाते खरं तर आपण दुर्लक्षित करतो असे मला वाटते.

# वणी परिसरातील अपघातांची मालिका केव्हा खंडित होणार

आधुनिक केसरी न्यूज

**बंडू खडांगळे**

**लखमापूर :** दिंडोरी तालुक्यातील वणी परिसरातील रस्ते सध्या अपघाताचे माहेर घर बनल्याने प्रवासी वर्ग भयभीत झाला आहे. नेमके अपघात होण्याचे कारण काय ? यावर संबंधित विभागाने परिक्षण करणे गरजेचे बनले आहे.

वणी परिसरातील रस्त्यावर सध्या अपघात हा नित्यनेमाचा विषय बनला असल्याने एकप्रकारे प्रवासी, परिसरातील ग्रामस्थ यामध्ये वेगवेगळ्या चर्चा ऐकायला मिळत आहे. एक दोन वर्षांपूर्वी वणी सापुतारा हा रस्ता अत्यंत खराब अवस्थेत होता. त्यामुळे हा रस्ता खराबी कारणांमुळे एकप्रकारे प्रवासी वर्गाची डोकेदुखी बनला होता. परंतु हा रस्ता सध्या चांगल्या प्रतिचा बनला असल्याने वाहन चालवितांना वाहनधारकांना गाडी जोरात चालविण्यांचा मोह आवरत नसल्याने अपघाताचे सत्र दिवसेंदिवस वाढत आहे. असे नागरिकांमधून बोलले जात आहे. वणी ते सापुतारा हा रस्ता दळणवळणांच्या दृष्टीने महाराष्ट्र व गुजरात राज्यांला महत्त्वाचा मानला जातो.यारस्त्याने मोठ्या प्रमाणावर वाहनांची वर्दळ नेहमी जास्त पाहायला मिळते. त्यामुळे या रस्त्यावर वाहनांच्या तासी वेगावर बंधन येण्याची गरज बनली आहे. जर वाहन वेग मर्यादा अटोक्यात आली तर या रस्त्यावरील अपघात मालिका खंडित होईल. व प्रवासी वर्गाच्या जीवीतास होणारा धोका टळले. असेही नागरिकांमधून सूर निघत आहे.

एकदंर या वर्षातील या रस्त्यावरील अपघातांची संख्या ही दिवसेंदिवस वाढत असून मुत्यू चे व जखमीची संख्या ऐकून अनेकांना एकप्रकारे हादराच बसतो. या तीन महिन्यांच्या काळात या रस्त्यावर जवळपास अंदाजे दहाच्या वर मुत्यूची संख्या गेली आहे. तर जखमीच्या संख्येत सुध्दा लहान मोठ्या अपघाताने दिवसेंदिवस वाढ होत आहे.

गेल्या आठवड्यातील सहा मार्चची एक घटना तर काळजांला धडक देणारी ठरली आहे.ती म्हणजे एका आई वडीलांना वणी पिंपळगाव रस्त्यावर आपल्या दोन लहान चिमुकल्यांना अपघातात गमवावे लागल्याने परिसरातील नागरिकांचे मन हेलावणारी घटना ठरली.

त्यामुळे पिंपळगाव ,वणी,सापुतारा हा रस्ता अजून किती जणांचा बळी घेणार अशी म्हणण्याची वेळ आली आहे.



जर रस्ते खराब असले तर नागरिक निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधीनां दोष देतात . तर आता रस्ते चांगले झाले असल्याने दिवसेंदिवस होणाऱ्या अपघातास कोण जबाबदार हे समीकरण सोडविणे म्हणजे एकप्रकारे डोकेदुखीचा विषय होऊन बसला आहे . पिंपळगाव( बसवंत ) वणी, सापुतारा हा रस्ता जवळजवळ ६१ किलोमीटर आंतरांचा आहे . त्यामध्ये या रस्त्यावर संबंधित विभागाने ज्याठिकाणी वळणरस्ता, दाट झाडी, लहान मोठे घाट रस्ते, पुल अशा ठिकाणच्या काही आंतरावर वाहनधारकांना कळण्यासाठी रेडियम पट्टे, झेब्रा पट्टा, दिशादर्शक फलक,अथवा विद्युतदर्शक फलक यांची उभारणी करणे गरजेचे आहे . तसेच या रस्त्यावरून जेजे मोठाली अवजड वाहने प्रवास करतात त्यांची वेग मर्यादेवर मर्यादा आणणे गरजेचे आहे . तेव्हाच ख–या अर्थाने या रस्त्यावरील अपघातांला आळा बसू शकेल .

संतोष रेहरे,
( माजी सरपंच अंबानेर, ता .दिंडोरी

महाराष्ट्र Business Katta

तिरुपती मंडप डेकोरेटर्स
Generator, Lighting, Mandap, Open Mandap, DJ Sound, Stage, Chairs & Garden Decorate
Baiju Anna
8623904312
Abhijeet Shukla
9765826252
DARZI BAZAR, CANTONMENT, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR

EPFO
EPS-1995
Option Form
Before 01.09.2014
After 01.09.2014
ऑनलाईन फॉर्म आमच्याकडे भरुन मिळेल
कागदपत्र–पी.पी.ओ.नंबर, यु.ए.एन.नंबर, आधार कार्ड ( मोबाईल लिंक असणे गरजे ), ई–मेल आय., बँक पासबुक.
AADHAAR
आधार सेवा केंद्र
• जन्म तारिख • नावात बदल
• मोबाईल नंबर • पत्यात बदल
• मेल आय.डी. • लग्नानंतरचे नाव
आधार काढून १०वर्ष झाली असेल तर अपडेट करुन मिळेल.
अधिक माहितीसाठी संपर्क संचालक-दत्ता जाधव
महा ई-सेवा केंद्र
आपले सरकार सेवा केंद्र
मो.9403345739

CAFÉ ROCKSTARZ
EAT . CHILL . REPEAT
11:11
ELEVEN ELEVEN
Where Dishes come true..!!
MULTI-CUISINE FAMILY RESTRO
AURANGABAD
Indian, Continental, Italian, Chinese, Chat, Pavbhaji, Shakes, Desserts
9665544629
GHAI TOWER, BESIDE RAJ CLOTH, CANNAUGHT GARDEN, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR

खळबळजनक
कॉम्प्युटर, लॅपटॉप, प्रिंटर, सीसीटीव्ही
Sales & Services
नवीन कॉम्प्युटर 9900/-
जुने कॉम्प्युटर 5900/-
जुने लॅपटॉप 6900/-
दोन कॅमेरा सेटअप 7900/-
चार कॅमेरा सेटअप 9900/-
9420405928


# गर्भाशय.. निसर्गाची अनमोल देण



मागील लेखामध्ये गर्भसंभव सामग्री मधील ऋतू, क्षेत्र, अंबू आणि बीज यामध्ये ऋतू म्हणजेच Ovulation काळ अर्थात ऋतुकाल याबद्दल गर्भसंस्काराच्या दृष्टीने आपण सविस्तर माहिती प्राप्त केली, या लेखात आपण क्षेत्र अर्थात गर्भाशय याबद्दल विशेष माहिती घेणार आहोत. स्त्रीच्या शरीरातील अत्यंत महत्त्वाचा अवयव म्हणजे गर्भाशय, उदरात बाळ वाढत असताना त्या बाळाचे घर आणि अंगण म्हणजे गर्भाशय, स्त्रीला मातृत्व प्राप्त करून स्त्रीत्व मिळवून देणारे गर्भाशय, स्त्रीमध्ये पुरुषापेक्षा जास्त काम करण्यासाठी ताकद देणारा अवयव म्हणजे गर्भाशय... असा हा अवयव स्त्रीसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे आणि गर्भसंस्कार करताना म्हणजे बाळ राहण्याच्या आधीपासून जेव्हा स्त्री स्वतःच्या शरीराबद्दल जागरूक होते तेव्हा या गर्भाशयाबद्दल सकारात्मक अशी विशेष माहिती प्राप्त करणे गरजेचे असते. गर्भाशयाबद्दल रचनात्मक आणि कार्यात्मक ज्ञान तुम्हाला सगळीकडे वाचायला मिळेल परंतु गर्भसंस्कार करताना गर्भाशयाबद्दल काही विशिष्ट सकारात्मक जाणीव, जी त्या बाळाला त्या तिथे रुजण्यासाठी महत्त्वपूर्ण असणारी माहिती म्हणजे गर्भसंस्कारामध्ये गर्वसंभव सामग्री होय.

स्त्रीच्या शरीरातील गर्भाशय हा एकमेव असा अवयव आहे ज्यातून नाळेसारख्या आणखी एका अवयवाची निर्मिती केली जाते. गर्भाशयातील स्नायू हे संपूर्ण शरीरातील इतर स्नायूंपेक्षा अतिशय मजबूत असतात. कारण गर्भाशयच ती जागा आहे ज्यात नऊ महिने बाळ वाढत असते. पेल्वीसच्या भागात मूत्राशय आणि गुद्द्वाराच्या दरम्यान गर्भाशय असते. गर्भाशयामध्ये नेमका काय बदल घडतो हे सर्वसामान्यपणे गरोदर स्त्रीला माहित असणे गरजेचे असते.

फेलोपीयन ट्यूब [ बीजवाहिनी ] मधून आलेले बीजांड गर्भाशयाच्या अस्तर वर [ इंदोमेट्रिम ] रुजवण्याचे म्हत्वाचे काम या गर्भाशयाकडे असते तसेच बाळाच्या विकासासाठी गर्भाशय प्लेसेंटाचे ( वर ) निर्माण करते. खास करून बाळाला पोषण देण्यासाठी रक्त वाहिन्यांचा विकास करते. डिलिव्हरीच्या वेळेस बाळाला बाहेर येण्यास मदत करण्यासाठी गर्भाशय




संकुचन निर्माण करते आणि प्रसूती पूर्ण झाल्यावर आपल्या पूर्व स्थितीमध्ये येते आणि पुढील मासिक पाळीसाठी तयार होते. गर्भाशयामधून स्त्रीबीजास रक्त प्रवाहात मदत होते. गर्भसंस्कार करताना हा गर्भाशय अवयव संपूर्ण विकसित झालेला असून माझ्या बाळाचे नऊ महिन्याचे पोषण करण्याची ताकद या गर्भाशयामध्ये आहे अशी सकारात्मकतेची सूचना आपण शरीरास देणे गरजेचे आहे, ज्यामुळे बाळ लवकर राहण्यासाठी मदत होते जेव्हा आपले मन हे स्वीकारते की माझ्या शरीराची वाढ परिपूर्ण झालेली आहे आणि माझे गर्भाशय रचनात्मक आणि कार्यात्मक उत्तमरीत्या विकसित आहे, तेव्हा तिथे स्त्रीबीज आणि पुरुष बीजाचे मिलन होऊन गर्भ निर्मितीस अनुकूल वातावरण तयार होते, आणि लवकर गर्भधारणा राहण्यासाठीही याचा फायदा होतो. अशा पद्धतीने आम्ही केवळ समुपदेशननानेही वंध्यत्व च्या जोडप्यामध्येही विशेष लाभ होताना पाहिले आहेत, गरज आहे जागरूकतेची आणि आयुर्वेदिक गर्भसंस्कार सामान्यांपर्यंत पोहचण्याची.. पुढील लेखात आपण अंबु अर्थात रस धातू...स्त्रीबीज उत्पत्तीस कारणीभूत आणि बाळाचे पोषण करणारा महत्वाचा घटक यावर सविस्तर माहिती घेऊ...




**डॉ. मंगल सुरेश ताठे**
**[ एम. डी . आयुर्वेद ]**
**मोबाईल - 9168101060**
**शारदा क्लिनिक संचलित शाश्वत आयुर्वेद व गर्भसंस्कार चिकित्सालय,**
**पिसादेवी, छत्रपती संभाजीनगर**
**फाउंडर - स्त्री वैद्या संचलित आयु पंख संघटना**


# सांधेदुखी आणि संधिवात



सांधेदुखी आणि संधिवात दोन्ही सांध्यांसंबंधी समस्या. संधिवात म्हणजे शरीराच्या सांध्यावर परिणाम करणारा एक आजार. आधुनिक औषध शास्त्रानुसार, संधिवाताचं कारण रक्तातील युरिक ॲसिडचं जास्त प्रमाण असू शकतं. जर हाडांच्या सांध्यामध्ये युरिक ॲसिड जमा होण्यास सुरुवात झाली तर ते संधिवाताचं रूप घेतं. संधिवातापासून मुक्त होण्यासाठी काही घरगुती उपचार देखील केले जाऊ शकतात. myupchar.com शी संबंधित डॉ. केएम नाधीरयांनी सांगितलं, सांधेदुखीसह सूज येणं, सांधे आखडणं, हालचाल करण्याची क्षमता कमी होणं हे त्रास उद्‌भवू लागतात. प्रभावित सांधे लाल होतात आणि सभोवतालची त्वचा गरम होते. काही विशिष्ट सावधगिरी बाळगल्यास कधीकधी संधिवातातील वेदनाटाळता येतात. यासाठी पौष्टिक पदार्थांचे सेवन, नियमित व्यायाम, शरीराचं संतुलन, योग्य बसण्याची स्थिती, वजन नियंत्रण इत्यादींचा समावेश आहे. तसंच सांध्यावर दाब पडेल आणि ताण येईल, अशा स्थितीत शरीर ठेवू नका. याशिवाय घरगुती उपचार म्हणायचे तर संधिवातात तुम्ही कडूनिंबाची मदत घेऊ शकता. कडूनिंबामुळे तुम्हाला या समस्येपासून बराच आराम मिळेल.

**डॉ. मनोज जोशी,**
**आयुर्वेद**

# किडनीचे आजार

1-डॉक्टर, मला वारंवार किडनी स्टोन होतात?
उत्तर-पाणी 5 लिटर कमीत कमी प्या नेहमी, पालक, टोमेटो, कोबी दोन्ही बंद करा, रोज 999 तेलाने पोटाची मालिश करा

प्रश्न 2-- 1वर्षा पूर्वी 22 mm खडा असल्या मुळे किडनी स्टोनचे ऑपरेशन झाले आहे सोनोग्राफी मध्ये किंवा एक्सरे मध्ये काहीच दिसत नाही तरी माझे पोट दुखते अजूनही मला स्टोन असतील का किंवा परत होऊ, शकतात का?




उत्तर- किडनी स्टोन वारंवार होऊ शकतात, कधी कधी काही स्टोन आकाराने लहान असल्यास सोनोग्राफी किंवा एक्सरे मधे दिसत नाहीत पाण्याचं प्रमाण वाढवा किंवा योग्य आयुर्वेद डिग्री असणाऱ्या डॉक्टर कडून उपचार घ्या.
गरोघर आयुर्वेद औषधीदेणारी फसवे वैदू खूप झाले आहेत आधा हकीम जान को खतरा हे लक्षात ठेवा.

प्रश्न 3-डॉ किडनी स्टोन मुळे किडनी खराब होऊ शकते का?
उत्तर- जास्त दिवसाचे, 13 mm पेक्षा मोठया आकाराच्या स्टोनमुळे असे घडू शकते तसेच वारंवार स्टोन होण्याच्या शरीराच्या स्वभावा मुळे काही वेळा किडनी खराब होऊ शकते याला उपाय म्हणजे वेळेवर आळस न करता ट्रीटमेंट घ्यावी.

प्रश्न 4- डॉ किडनी कोणत्या कोणत्या कारणाने फेल किंवा खराब होऊ शकते त्यावर आयुर्वेदीय उपचार आहेत का?
उत्तर- किडनी स्टोन, पॉलिसिस्टिक किडनी, अनियंत्रीत मधुमेह, बीपी, पेन किलर घेण्याची जास्त सवय, किंवा अलोपॅथीच्या काही मधुमेह व बीपी वरील काही प्रकारच्या औषधीनि ( सगळ्या औषधीनि नाही ) किडनी फेल किंवा खराब होऊ शकते. हो आयुर्वेदात किडनी स्टोन व किडनी फेल साठी उत्तम औषधी आहेत साधारण पणे 1 ते 2 महिन्यात उत्तम गुण दिसतो यासाठी आयुर्वेदात असे बरेच औषधी आहेत पण हो डॉक्टरी सल्ला घेऊनच ते घ्या.

प्रश्न- डॉ मला अलोपॅथी शुगर ची औषधी सोडायला भीती वाटते? उत्तर- आजपर्यंत कधीच ऐकल नाही किंवा पाहिलही नाही आयुर्वेदाने मधुमेह अलोपॅथी सारखाच कंट्रोल होतो
B,-- अलोपॅथीचे डॉक्टर भीती घालतात किडनीफेल होइल पण साईडइफेक्ट अलोपॅथी लाजास्त आहेत,
C-- आपलाच आपल्या आयुर्वेदावरचा अविश्वास, खरच आयुर्वेदाचा चमत्कार पहायचा असेल तर हे औषध घ्याच
D-- कोणत्याही अलोपॅथी गोळ्या न घेता 100% मधुमेह नियंत्रण करता येतो 3 दिवसात फरक दिसतो अगदी अलोपॅथी सारखाच परत शुगर एकदम डाऊन होत नाही.
E--खालील फायदे वाचा
1= सगळ्या वनस्पतीपासून निर्मित औषधी. 2=अलोपॅथी सारखेच शुगर कंट्रोल करते 3=अलोपॅथी गोळ्या व इन्सुलिन बंद करता येते. 4=किडनी स्टोनवर तसेच किडनीला टॉनिक म्हणून उपयोग होतो, किडनी फेल होऊ देत नाही. 5= शिलाजीत मुळे मधुमेह आणि वजन जास्त असणाऱ्यांची लैंगीक शिथिलता नाहीशी होते.
6-= रात्री लघवीला उठणे बंद होते.
7= पोटच्या दुखणे बंद करते.
8= या मधील गुळवेल आणि सप्तकपी कॅन्सर पासून रक्षण करते, प्रतिकारशक्ती वाढवते.
9=जखमा लवकर बऱ्या होतात.
10= मधुमेहात निर्माण होणाऱ्या न्यूरोलॉजिकल समस्या पण नाहीश्या होतात. उदा. पाय बधिर होणे, दृष्टी कमी होणे, पायाची आग होणे, स्पर्श न समजणे, पाय गार वाटणे किंवा पडणे.
11= पथ्य आवश्यक आहे साबुदाणा, साखर, गूळ, मध, बिट, बटाटा हे 1 नंबरचे शत्रू आहेत पोहे, मुरुमुरे, भात जास्त शुगर असणाऱ्यांना वर्ज, तसेच 1 तास पायी चालणे. चिंता करू नका, साखरेचा चहा पाजणाऱ्यास शत्रू समजा, दारू तंबाखू वाईटच आता हा शोध फार जुना आहे. पण चिकाटी आणि धेर्याने औषधी घेतली तर सुदृढ जगणे होईल, 100% गुणवान औषधी आहेत पण प्रत्येक रुग्णाचा डोस वेगळा असू शकतो कधीही संपर्क कराण्


डॉ. मनोज जोशी
9822341176


**डॉ. मनोज जोशी**
9822341176
औरंगाबाद ( औषधे कुरियर केली जातील )1200 ते 1500 महिना खर्च येऊ शकतो.


# आयुर्वेदाचा इतिहास

अध्यात्मविद्या, राजनीती, पुराणे इत्यादिकांचा इतिहास ब्रह्मदेवापासून सांगण्याची प्रथा प्राचीन भारतीयांमध्ये होती. त्याचप्रमाणे वैद्यक हे ब्रह्मदेवाने प्रथम सांगितले नंतर ते प्रजापति, अश्विदेव आणि इंद्र यांना प्राप्त झाले आणि या देवांकडून ते शास्त्र भरद्वाजादी ऋषींना प्राप्त झाले असे चरक व काश्यप संहितांमध्ये म्हटले आहे. भरद्वाज, आत्रेय, हारीत, काश्यप, अग्निवेश, भेड इ. ऋषी यांत प्रमुख होत. आत्रेय किंवा कृष्ण आत्रेय हा वैद्यक शास्त्राचा पहिला निर्माता म्हणून सांगितलेला असतो. प्राचीन वैद्यक ग्रंथांत आत्रेय, हारीत व काश्यप यांचा मूल प्रणेते म्हणून वारंवार उल्लेख येतो. आत्रेयसंहिता म्हणजेच चरकसंहिता होय. हारीतसंहिता, काश्यपसंहिता आणि भेंडसंहिता ह्याही अलीकडे उपलब्ध झाल्या आहेत. काश्यपसंहितेस वृद्धजीवकीय तंत्र म्हणूनही म्हणतात. बुद्धपूर्वकालीन जीवक हा वृद्धजीवक असावा. या आयुर्वेदज्ञाचा उल्लेख बौद्ध पाली साहित्यातही अनेक वेळा झालेला आहे. तक्षशिला येथील विद्यापीठात आत्रेय आचार्यांपासून त्याने वैद्यकाचे शिक्षण घेतले असे त्यात म्हटले आहे. शास्त्रचिकित्सा व अन्य चिकित्सा यांचा उल्लेख पाली वाङ्मयात मिळतो. बाष्पस्नान, रक्तसुति, शस्त्रक्रियेची साधने इत्यादीकांचा त्यात समावेश आहे. शस्त्रक्रिया विशारदाचे ‘मझ्झिमनिकाय’ ( १०१ व १०५ ) या पाली ग्रंथात जे वर्णन आलेले आहे त्यावरून भारतीय शस्त्रक्रिया बुद्धाच्या काळात पुष्कळ प्रगत झालेली होती असे अनुमान निघते. अशोकाच्या एका शिलालेखात मनुष्यचिकित्सा व पशुचिकित्सा आपल्या देशात सुरू केल्याचा उल्लेख आहे. प्रसिद्ध बौद्ध तत्त्वज्ञ नागार्जुन हा वैद्यक शास्त्राचा प्रणेता होता असेही अनेक ठिकाणी निर्देश आहेत. यानेच सुश्रुतसंहितेस उत्तर तंत्राची जोड दिली असे म्हणतात. चरकसंहिता, सुश्रुतसंहिता, अष्टांगसंग्रह व अष्टांगहृदय हे ग्रंथ आयुर्वेदाचे मुख्य अधारस्तंभ होत. या ग्रंथांचा मूळ गाभा सूत्रकाली म्हणजे इ. स. पू. ७ व्या शतकाच्या सुमारास बुद्धाच्या पूर्वी रचला गेला असावा असे चौथ्या शतकाच्या सुमारास झालेल्या बौद्ध साहित्यावरून अनुमान निघते. चरकसंहितेचा गाभा असलेले तंत्र पुनर्वसु आत्रेय याने रचले व त्याचा शिष्य अग्निवेश आचार्य याने त्याची नवी आवृत्ती तयार केली असावी. अग्निवेश हा आचार्य भेड याचा सहाध्यायी होय. हल्ली जी भेडसंहिता मिळते ती व चरकसंहिता यांच्यात बरेच साम्य आहे. चरकाने अग्निवेशकृत तंत्रावर पुन्हा संस्कार म्हणजे प्रतिसंस्कार केला. चिनी भाषेत भाषांतरित केलेल्या ( इ. स. ४७७ ) त्रिपिटकात म्हटले आहे की चरक हा कनिष्काचा वैद्य होता त्याने कनिष्काच्या राणीला अडलेल्या गर्भाचा पात करून मुक्त केले. कनिष्काचा काळ इसवी सनाचे पहिले शतक होय. चरकसंहितेवर इ. स. पाचव्या शतकाच्या सुमारास झालेल्या कपिलबलपुत्र दृढबलाने पुस्ती जोडली. परंतु चरकसंहितेचे चरकाने केलेले संस्करण कोणते व दृढबलाने दिलेली पुस्ती निश्चित कोणती हे सांगता येणे कठीण आहे. परंतु तसा प्रयत्न नेपालसंस्कृतग्रंथमालेत प्रकाशित झालेल्या काश्यपसंहितेच्या प्रस्तावनेत पं. हेमराज शर्मा यांनी केला आहे. चरक हे सामान्यनाम आहे व्यक्तिनाम नव्हे. कृष्ण यजुर्वेदाची चरक शाखा आहे. त्या शाखेच्या लोकांना चरक हे उपनाम लागते. चरकसंहितेत आठ स्थाने म्हणजे प्रकरणे आहेत. ( १ ) सूत्रस्थान यात रोगोपचाराचे सामान्य स्वरूप, आहार, वैद्याची कर्तव्ये इ. वैद्यकसंबंधी सामान्य विचार म्हणजे सूत्रे आहेत. ( २ ) निदानस्थान मुख्य अशा आठ रोगांवरील निदानांचा यात विचार आहे. ( ३ ) विमानस्थान रस, पथ्यापथ्य, सामान्य निदान व इतर वैद्यकीय आधारभूत सिद्धांत यात आहेत. ( ४ ) शारीरस्थान यात शरीररचना आणि गर्भविद्या आहे.

# महात्मा जोतीराव फुले



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी


**भारताचे थोर सुपुत्र, विचारवंत, समाजसुधारक, लेखक महात्मा जोतीराव फुले यांची आज जयंती. महात्मा जोतीराव फुले यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी झाला. जोतीरावांच्या वडिलांचे नाव गोविंदराव तर आईचे नाव चिमणाबाई असे होते. सातारा जिल्ह्यातील कटगुण हे त्यांचे मूळ गाव. त्यांचे आडनाव गोऱ्हे असे होते पण त्यांच्या वडिलांचा फुले विक्रीचा व्यवसाय होता त्यामुळे ते फुले म्हणूनच ते ओळखले जाऊ लागले पुढे फुले हेच आडनाव रूढ झाले. काही दिवसांनी कटगुणहुन त्यांचे कुटुंबीय पुरंदर तालुक्यातील खानवडी येथे आले. खानवडी येथे त्यांचे घर असून त्यांच्या नावे सात बाराचा उतारा देखील आहे. प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी भाजी विक्रीचा व्यवसाय केला. जोतीराव फुले यांना लहानपणापासून शिक्षणाची आवड होती.**

१८४२ साली त्यांनी पुण्याच्या स्कॉटिश मिशन हायस्कूलमध्ये माध्यमिक शिक्षण घेण्यासाठी प्रवेश घेतला. अतिशय तल्लख बुद्धीच्या जोतिरावांनी पाच सहा वर्षातच तो अभ्यासक्रम पूर्ण केला.

२३ सप्टेंबर १८७३ रोजी महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. तथाकथित सनातनी उच्चवर्णीय लोकांकडून सर्वसामान्य लोकांवर होणारा अन्याय अत्याचर दूर करणे तसेच गुलामगिरीतून शूद्रातिशूद्र समाजाची मुक्तता करणे व त्यांना त्यांच्या हक्काची जाणीव करुन देणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. 'सर्वसाक्षी जगतप्ती। त्याला नकोच मध्यस्ती।।' हे या समाजाचे घोषवाक्य होते. सत्यशोधक समाजाने गुलामगिरीविरुद्ध आवाज उठवला आणि समाज न्यायाची व सामाजिक पुनर्रचनेची मागणी केली. या समाजातर्फे पुरोहितांशीवाय लग्न लावण्यास सुरवात केली. मराठीत मंगलाष्टके रचली. समाजातील तळागाळातील लोकांपर्यंत शिक्षण पोहचवणे हे सत्यशोधक समाजाचे महत्वाचे ध्येय होते. महात्मा फुले यांनी एका कवितेत शिक्षणाचे महत्व पटवून देताना म्हटले आहे की

***विद्येविना मती गेली ।***
***मतिविना नीती गेली ।***
***नितीविना गती गेली ।***
***गतिविना वित्त गेले ।***
***वित्ताविना शूद्र खचले ।***
***इतके अनर्थ एका अविद्येने केले ।।***

एक महिला शिकली तर संपूर्ण कुटुंब शिकते. समाज शिक्षित करायचा असेल आणि बहुजन समाजात शिक्षण मुहूर्तमेढ रोवयची असेल तर महिलांना शिक्षित व्हायलाच हवे असे त्यांचे मत होणे म्हणूनच त्यांनी त्याची सुरवात स्वतःच्या घरापासून केली. जोतिरावांनी त्यांच्या पत्नी सावित्रीबाईंना शिक्षण देऊन शिक्षण कार्यास प्रवृत्त केले. महात्मा फुले यांनी १९४८ साली पुण्यातील भिडे वाड्यात मुलींची पहिली शाळा काढून तेथील शिक्षिकेची जबाबदारी सावित्रीबाईंवर सोपवली. पुढे सावित्रीबाई या शाळेच्या मुख्याध्यापिकापदी आरूढ झाल्या. शाळेच्या मुख्याध्यापकपदी आरूढ झालेली भारतातील पहिली महिला म्हणजे सावित्रीबाई फुले



त्याचप्रमाणे मुलींसाठी पहिली शाळा काढणारे पहिले भारतीय म्हणजे महात्मा जोतीराव फुले. महात्मा जोतीराव फुलेंनी देशात मुलींच्या शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. आज सर्वच क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत असे कोणतेच क्षेत्र नाही की ज्यात महिलांनी आपला झेंडा रोवला नाही. कला, क्रीडा, साहित्य, विज्ञान, तंत्रदान, शिक्षण, समाजकारण, राजकारण, अर्थकारण अशा सर्वच क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत त्या केवळ आणि केवळ फुले दाम्पत्यांमुळे. महिलांसाठी फुले दाम्पत्यांनी जे कार्य केले ते ३३ कोटी देवांनीही केले नाही. महात्मा फुले यांनी पुण्यातील वेताळ पेठेत १८५२ साली अस्पृश्यांसाठी शाळा स्थापन केली. त्यांच्या या शैक्षणिक कार्याला सनातन्यांनी खूप वविरोध केला. मुलींनी शिक्षणासाठी घराबाहेर पडणे म्हणजे धर्म बुडणे अशी आरोळी ठोकत सनातनी लोकांनी महात्मा फुले यांच्या या महान कार्यास विरोध केला. त्यांना मारण्यासाठी मारेकरी पाठवले पण महात्मा फुले डगमगले नाहीत. ते आपल्या भूमिकेवर ठाम राहिले. महात्मा जोतीराव फुले यांना वाचनाची खूप आवड होती. विवीध महापुरुषांचे जीवनचरित्र वाचणे व त्यातून प्रेरणा घेणे हा त्यांचा आवडीचा छंद. छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र व थॉमस पेन या विचारवंतांच्या राईट ऑफ थॉट्स या ग्रंथाचा त्यांच्यावर खूप प्रभाव पडला. बहुजन समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा आणि दारिद्य्र पाहून ते खूप अस्वस्थ होत. जातपात, अस्पृश्य-स्पृश्य भेदभाव पाहून त्यांना खूप राग येत. समाजातील अज्ञान अंधश्रद्धा दूर करून समाजातील जातीभेद नष्ट करण्याचा त्यांनी निश्चय केला. कोणताही धर्म ईश्वराने निर्माण केलेला नाही आणि चातुर्वर्ण्य व जातीभेद ही निर्मिती मानवाचीच आहे असे त्यांचे रोखठोक मत होते. सर्व मानव एकच आहेत म्हणून सर्वांनी गुण्यागोविंदाने राहावे असे त्यांचे मत होते. त्यांनी लिहिलेल्या शेतकऱ्यांचा आसूड या पुस्तकातून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची विदारक दुर्दशा आणि दारिद्र्याची वास्तवता विशद केली आहे.

या पुस्तकाद्वारे विशाल दृष्टिकोनाचे क्रांतिकारक म्हणून महात्मा फुलेंचे दर्शन होते. महात्मा फुले यांनी सार्वजनिक सत्यधर्म हा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ सत्यशोधक समाजाचा प्रमाण ग्रंथ मानला जातो. तुकारामांच्या अभंगाचा त्यांना गाढा अभ्यास होता. अभंगाच्या धर्तीवर त्यांनी अनेक अखंड रचले. त्यांना सामाजिक विषमतेचे जागतिक भान होते म्हणूनच आपला गुलामगिरी हा ग्रंथ त्यांनी अमेरिकेतील कृष्णवर्णीयांना समर्पित केला. अस्पृश्यांची कैफियत हा त्यांचा अप्रकाशित ग्रंथ आहे. २८ नोव्हेंबर १८९० रोजी महात्मा फुले यांचे निधन झाले. आज त्यांच्या जयंतीदिनी त्यांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे. महात्मा फुलेंना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# शाश्वतीची सौरऊर्जा शेती



मोहन दिवटे, लातूर
संपर्क क्र. 9860440900

आधुनिक केसरी

**"इतकी वर्ष शेतात राब राबलो. हाडं झिजली. रक्ताचं पाणी झालं. आशेनं सिंचनाची सोय करून जास्तीच्या आमदानीची स्वप्नं पाहायली. स्वप्नं स्वप्नच राहायली. जिरायतीसह बागायतीही केली. आधुनिक शेतीच्या नादात बरेच प्रयोग करून झाले. आधुनिक सिंचन पध्दती, महागडी खतं-बियाणं, किटक-नाशकं वापरली. प्रत्येक वेळा केवळ रानात बहरलेल्या हिरव्याकंच पाल्यानंच स्वप्नं रंगली पण कधी अवकाळी पावसानं तर कधी गारपीटीनं हाताशी आलेला घास हिरावून नेला.**

बऱ्याचदा रंगलेल्या स्वप्नांचा अक्षरक्षः चुराडा झाला. पण आता, द्राक्ष-ऊसाच्या शेतीनंही मारलं अन् सौरऊर्जेच्या शेतीनं तारलं म्हणायचं...!

आता सारी शेतजमीन महावितरणकडे सौरऊर्जा निर्मितीसाठी भाडेपट्यावर देऊन बसलोय निवांतपणी काहीही न करता मिळतायत दर सालाला ७५ हजार रुपये प्रतिहेक्टराला. आता माझ्या वावरात खर्चिक पीकांऐवजी सौरऊर्जेचं उत्पादन होतंय... सौरऊर्जा तंत्रज्ञान यापूर्वीच विकसित झालं असतं तर मी नसतं घालवलं आजवर माझं आयुष्य वाया! महावितरणमार्फत राबविण्यात येणाऱ्या शासनाच्या मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेनुसार सध्या राज्यात शासकीय आणि खाजगी क्षेत्रातील सुमारे ४५ हजार एकरांत सौरऊर्जेचं शाश्वत उत्पन्नाचं पीक घेतलं जातंय नेहमीच्या शेती उत्पन्नावर आपलं स्वप्न कधी पुरं झाल्याचं आठवत नाही बघा..! बघा, तुम्हीबी विचार करून..! आता अन्न-धान्य पिकविण्यासोबतच शेतात सौरऊर्जा उत्पादनाची चांगली संधी मिळत आहे शेतकऱ्यांना" एक वयस्क शेतकरी लातूरच्या मार्केट यार्डात लिंबाच्या झाडाला रेलून त्याच्या पाव्हुण्याशी मिशीला पीळ देवून बोलत होता. डोक्यावरच्या फेट्याच्या पदरानं घामाच्या निथळणाऱ्या धारा पुसत पुसत तो बोलत होता. एकीकडं मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी योजनेमुळं विनाकष्टाचे त्याला शाश्वत उत्पन्न मिळत असल्याने तो समाधानी दिसत होता तर दुसऱ्या बाजूला आजवर या ना त्या अनेक कारणांनी पारंपरिक शेतीत आलेल्या अपयशाला तो कोसत होता. देशभरातील कोळशाचे संपत जाणारे साठे आणि त्यातून भेडसावणारी कोळसा टंचाई, घटत जाणारी औष्णिक वीज निर्मिती, त्यातून निर्माण होणारा



विजेचा तुटवडा, अणु ऊर्जा प्रकल्पांनाही काही कारणाने होणारा विरोध, हायड्रो-पॉवरवरील मर्यादा या साऱ्यांचा परिणाम पारपंरिक ऊर्जा निर्मितीवर होताना दिसून आला. खरं तर या साऱ्या परिस्थितीत भविष्यात ऊर्जा क्षेत्रात आंधार दिसत असताना काळाची पावले ओळखून केंद्र सरकारने अपारपंरिक ऊर्जा स्त्रोत विकासाला बळ देण्याचे धोरण राबविले. केंद्रातील सरकारच्या धोरणाला प्रतिसाद देत राज्याचे उपमुख्यमंत्री व ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या मुख्यमंत्री पदाच्या कार्यकाळात राज्यात सौर ऊर्जेला चालना दिली. पारपंरिक वीज निर्मितीवरील मर्यादा विचारात घेत शेतीला दिवसाच्या कालावधीत वीज उपलब्ध करून देण्याच्या दिशेने वाटचाल सुरू झाली. त्यातून देवेंद्र फडणवीस यांनी शेतीत ऑनग्रीड सौर कृषीपंप ऊर्जीकरणासोबतच घराच्या छतावरील सौर ऊर्जा निर्मितीलाही मोठी चालना दिली. त्याशिवाय शेतकऱ्यांसाठी आर्थिक फायदयाची ठरणारी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना प्रभावीपणे



राबविली. ही योजना राज्यात महावितरणच्या माध्यमातून राबविण्यात येते. महावितरणचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक श्री. विजय सिंघल यांनीही या योजनेची प्रभावी अमलबजावणी केल्याने सबंध देशभरात महाराष्ट्राने सौर ऊर्जा निर्मिती क्षेत्रात सर्वाधिक चांगली कामगिरी केली. अलीकडच्या उपलब्ध तपशीलानुसार मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेंतर्गत राज्यात शासनाच्या मालकीच्या २१,७८०.८२ एकर जमिनीत सौरऊर्जा निर्मितीची प्रक्रिया सुरु आहे. त्यातून सुमारे २६३८ मेगावॅट वीजनिर्मिती अपेक्षित आहे.

तर राज्यातून सुमारे १७४५ शेतकऱ्यांनीही त्यांची २२,५२८.२६ एकर जमीन महावितरणला भाडेपटट्याने देऊ केली असून त्यातून सुमारे १८१६.८६ मेगावॅट सौरऊर्जेचं उत्पादन अपेक्षित आहे. सातत्याने या ना त्या अनेक कारणाने कायम दुष्काळी भाग असलेल्या मराठवाडा विभागातून सर्वाधिक ७२२ शेतकऱ्यांनी ९३३४.५६ एकर जमीन



सौरउर्जा निर्मितीसाठी महावितरणला देऊ केली आहे. सर्वाधिक दुष्काळी जिल्हा असलेल्या एकटया बीड जिल्हयातून या योजनेत आतापर्यंत ११४ शेतकरी सहभागी झाले आहेत. त्यांच्या १४५.६४ एकर जमीनीत १०२ मेगावॅट सौरऊर्जा निर्मिती अपेक्षित आहे. मराठवाडयासह राज्यातील इतर विभागातूनही कमी-अधिक प्रमाणात शेतकऱ्यांचा चांगला प्रतिसाद आहे. कोकण विभागातून ३३५ शेतकऱ्यांनी ३७.८८ एकर जमीन देऊ केली. त्यात २४७.३४ मेगावॅट सौरवीज तयार होईल. पुणे विभागातून २९८ शेतकऱ्यांची ३६८८.२४ एकर जमीन उपलब्ध झाली असून त्यातून २५५.५९ मेगावॅट वीज उत्पादन होईल. नागपूर विभागातून ४४० शेतकऱ्यांची ५७१६.०५ एकर जमीन उपलब्ध झाली असून त्यात ५३३.७९ मेगावॅट सौरवीज निर्मितीची प्रक्रिया सुरू आहे. अर्थात, अपारपंरिक क्षेत्रातील या सौर विजेमुळे राज्यात विजेची उपलब्धता वाढून सर्वांना पुरेशी आणि अखंडित विदयुत सेवा देता येईल. शिवाय, यातून शेतकऱ्यांना प्रतिहेक्टरी ७५ हजार रुपयाचं शाश्वत जमीन भाडं मिळणार असून त्यातून निर्माण होणाऱ्या रोजगारांच्या संधी वेगळया आहेत. अर्थात, ही योजना सर्वांसाठी अत्यंत महत्त्वाची ठरली आहे.

प्रस्तुत योजनेत स्वतः शेतकरी, शेतकऱ्यांचा गट, को-ऑपरेटिव्ह सोसायटी, पाणी वापर संस्था, साखर कारखाने, जल उपसा केंद्र, ग्रामपंचायती, उद्योग आणि इतर संस्था सहभागी होऊ शकतात. योजनेत सहभागी होण्यासाठी प्रत्येक अर्जदाराने महावितरणकडे नोंदणी करणे आवश्यक आहे. शिवाय, अर्जदाराला एका जागेसाठी एकच अर्ज करता येतो. किमान तीन एकर आणि कमाल ५० एकर जमीनीचे क्षेत्रफळ असणारे शेतकरी या योजनेत भाग घेऊ शकतात. महावितरणच्या ३३/११ केव्ही उपकेंद्रापासून पाच किलोमीटर आंतराच्या आत असलेल्या जमीनीला योजनेत प्राधान्य देण्यात येते.

# महात्मा

आधुनिक केसरी

**ज्योतिबा तुम्ही पेटविल्या**
**ज्ञानाच्या अखंड ज्योती**
**स्त्रीशिक्षणाचे कार्य**
**घेतले आपल्या हाती**
**धर्ममार्तंडांना न जुमानता**
**अस्पृशांना दिले पाणी**
**तोडूनी रूढीचे बंधपाश**
**समता रुजविली मनी**
**संकटाची वादळे जरी**
**आली पावलोपावली**
**शिक्षणाच्या रोपट्याने दिली**
**बहुजनास सावली**
**सर्व समाज एकत्र केला**
**जातीभेद नष्ट करण्यासाठी**
**अनाथांना दिला आधार**
**दीनदुबळ्यांची झालात काठी**
**पंख दिलेत शिक्षणाचे**
**उडण्या विशाल नभांगणी**
**तेज झळकले कार्याचे**
**इतिहासाच्या प्रत्येक पानी**
**अज्ञानाच्या अंधारात**
**क्रांतीचा सूर्य उदयास आला**
**दीनदुबळ्यांना जागे करुनी**
**तुम्ही महात्मा झाला**

**- रवींद्र व्ही. चालीकवार,**
**जि.यवतमाळ, मो.9011559106**



# तुम्ही होतात म्हणून ज्योतिबा...

आधुनिक केसरी

**तुम्ही होतात म्हणून**
**ज्योतिबा, स्त्री जन्मास**
**अर्थ आला...पुरुषप्रधान**
**समाजात या, नारी जन्मही**
**सार्थ झाला... तुम्ही होतात**
**म्हणून ज्योतिबा, घरा-घरात**
**शिकल्या मुली...**
**नाहीतर अजूनही फक्त**
**नि फक्त, पेटवत बसल्या**
**असत्या चुली... तुम्ही होतात**
**म्हणून ज्योतिबा,**
**बालहत्येस बसला आळा...**
**विधवांसह बालकांसाठीही,**
**तुम्हीच सुरू केल्या शाळा...**
**तुम्ही होतात म्हणून**
**ज्योतिबा, साऊला**
**ज्योतीसम जळता आलं...**
**अंधारातल्या नारी जातीचं,**
**भाग्य थोडं उजळतां आलं...**
**तुम्ही होतात म्हणून**
**ज्योतिबा,**
**विधवांनाही जगतां आलं...**
**फुललेल्या संसाराचं,**
**स्वप्नं पुन्हा बघतां आलं...**
**तुम्ही होतात म्हणून**
**ज्योतिबा, नारी जातीचे**
**पुसले आसूं... चार**
**-चौघींच्या का होईना,**
**ओठांवर फुलले हसू...**
**तुम्ही होतात म्हणून**
**ज्योतिबा,**
**अस्पृश्यांना मिळाले पाणी...**
**समाजाच्या सुधारणेसाठीच,**
**अवघी तुमची जिनगाणी...**
**अवघी तुमची जिनगाणी...**
**तुम्ही होतात म्हणून**
**ज्योतिबा...**

**सौ.शारदा श्रीकृष्ण**
**वानखेडे-चोपडे,**
**परभणी.९८२३०६६६६**

# बालमनाचं सकस भरण पोषण करणारा कवी नारायण खरात यांचा 'चंद्रावरची सहल' कविता संग्रह !

**संयमाचा परीघ**



चित्र : बाबूराव पाटील, भोकर



प्रा. डॉ.मुकुंद राजपंखे
संपर्क क्र. 9881294226

भाग : २३

**अशात मराठी बाल कवितांचे संग्रह निघंत आहेत आणि ही मोठी आनंदाची गोष्ट आहे. भरण पोषण करावयाच्या वयात मनाला भुरळ घालणारं, ओठांवर रुळणारं, अनुकरण करावं असं, ऐकावं ऐकवावं असं कांही नैतिक मूल्याबाबतचं लेखण येत रहाणं काळाची गरज आहे.प्रत्येकाला आपापला बालपणाचा काळ सुखाचा वाटतो त्याचं कारणंच त्या काळात मनावर कसला बोझा नसायचा आणि मन मोकळं वागता यायचं. आता बालपण कैद आहे एलकेजी, युकेजी, अंगणवाडी, बालवाडी, प्राथमिक वर्गांना आणि उद्या चाचपडंत रहावं लागेल म्हणून आजंच सगळं शिकून घेतलं पाहिजे या अघोरी पालकांच्या भितीने जन्माला घातलेल्या कोचिंग क्लासेसनी.**



आधुनिक केसरी

लेकरांनी मनानं कांही खेळावं, चित्रं काढावित, रंगसंगती शिकून घ्यावी, सरकाळ्याच्या गाड्या कराव्यात,वाळुवर खोपे करावेत, अंगावर पाऊस झेलावा, गारा वेचाव्यात, अंगत-पंगत करुन गोपाळकाला करावा, संगंमंगं आभ्यास करावा, एकमेकांना सांभाळून न्यावं, परस्परांवर माया करावी, शेजारधर्म पाळावा ही आणि अशा शेकडो गोष्टी सहज करता येण्यासारख्या आहे.सगळेच लेकरं सारख्याच कुवतीचे नसतात.त्यांच्या अंगी असणारे गुण हेरावेत आणि शक्य झालं तर खुलवावेत, वाढवावेत, बहरु द्यावेत. खंत ही आहे की शाळांमधून डॉक्टर घडवण्याच्या धेय्यानं झपाटलेल्या पालकांनी, त्यांच्या हां ला हां भरून लेकरांच्या शालेय आभ्यासक्रमात असूनही वेळापत्रकांमधून चित्रकला, हस्तकला, शारीरीक शिक्षण, कौशल्य विकास आदी बाबींना केराची टोपली दाखवली आहे आणि परीनामी या तासिकांनी गणित आणि विज्ञानाचा भडीमाककेला जातो. अशा सगळ्या प्रश्नांना संवेदनशील शिक्षक आणि संवेदनशील बालसाहित्यिकच ब-यापैकी न्याय देण्याचा प्रयत्न करतो.असा सुंदर प्रयत्न समकालीन महाराष्टाचे लाडके कवी एकनाथ आव्हाढ, दासू वैद्य, गोविंद पाटील, संतोष नारायणकर आणि नारायण खरात यांच्या हल्ली हल्ली प्रकाशीत झालेल्या बालकविता संग्रहांनी केला आहे आणि ही भूषणावह बाब आहे.या बाप लोकांनी बालकांसाठी अक्षरधण वेचलं आहे ही मोठी आनंददायी गोष्ट आहे. या निमित्ताने आजच्या मंगळवार दि.११ एप्रिल २०२३ च्या 'संयमाचा परीघ' या दै.अधुनिक केसरीच्या सदरात आपण कवी नारायण खरात यांच्या 'चंद्रावरची सहल' या कविता संग्रहाबद्दल चर्चा करणार आहोत.

'चंद्रावरची सहल' या बालकवितासंग्रहात एकुण ३० कविता आहेत.प्रत्येक कवितेला बोलकं करणारे चित्र आहेत.त्या सोबतंच प्रमोद दिवेकरांचं समर्पक मुखपृष्ठ आहे या कविता संग्रहाला. या छोटेखानी परंतू आषयंपन्न कविता संग्रहासाठी मलपृष्ठ मजकूर लिहिला आहे स्वामी रामानंद तिर्थ विद्यापिठ नांदेडच्या मराठी विभागाचे प्रमुख आणि बालसाहित्याचे आस्थेवाईक ठिकाण प्रा डॉ पृथ्वीराज तौर यांनी. डॉ. पृथ्वीराज तौर यांनी कवी आणि कवितेचं अंतरंग उलघडून दाखवलं आहे.इसाप प्रकाशनातर्फे दत्ता डांगे, नांदेड यांनी हे ४३२ वं पुस्तक छापलं आहे. या पुस्तकाचं मूल्य केवळ ४० रुपये असून या पुस्तकाची पृष्ठ संख्या बत्तीस. हाताळायला आणि वाचायलं प्रचंड आनंदानुभूती देणारी गोष्ट आहे.त्याहून आनंदीची गोष्ट ही की या कविता स्वतः कवी नारायण खरात महोदयांच्या तोंडून त्यांच्या अंगवळणी पडलेल्या ताला-सुरात ऐकण्याची अनुभूती प्रचंड आनंददायी आहे.आम्ही तो अनुभव त्यांचा कविसंमेलनातील सहभागात, फेसबुकावर, यू-टियुबवर अनेकदा घेतला आहे. तर बालकवितेचं असं आहे की इथं लहान मुलाच्या वयात जावून त्यांच्या भावविश्वाचा ठाव घेऊन त्यांना काय आवडतं, काय नाही याचा अंदाज घेऊन आणि अर्थातच त्यांना या वयात काय यायला पाहिजे अशा सगळ्यांचा आभ्यास लागतो, जो कविवर्य नारायण खरात यांनी सखोल केला आहे हे त्यांनी लिहिलेल्या कवितांवरुन सहज नजर जरी टाकली तरी लक्षात येतं.त्यामुळं हा कविता संग्रह मेहनतीनं समोर आला आहे.बालमानसशास्त्राचा छान आभ्यास यासाठी आवश्यक असतो कवी लेखकांचा की त्यांचा उद्धिष्टीत वाचक समुदाय कोण आहे.काय रुजवायचं आहे आणि काय नको याची जाण असणारे लिहिते लोक मग अशा छान कवितांची कथांची निर्मीती करतात.हे नारायण खरात महोदयांनी केलं आहे, याचा मोठा आनंद आहे.

नारायण खरात यांच्या चितनाचा विषय निसर्ग आणि माणुस आहे.माणसांची आणि निसर्गाची विविध रुपं या कविता संग्रहातील कवितांमधून भेटंत जातात. यातील दहा कविता माणसांबद्दल तर २० कविता निसर्गाबद्दल आहेत. माणसांइतकाच किंबहुना त्याहुन जास्त माया कवीची निसर्गावर असल्याचं हे प्रांजळ चित्र आहे. माणुस...मग तो राजा, मुळचा माणुस,आप्पलपोट्या माणुस,चेटकीन,परी, पप्पी, स्वप्न, फुगा असं सगळं आलं. आणि निसर्ग... ज्यात नदी, झाड, वृक्षदूत, कावळा, चिमणी, बगळा,पाखरांची शाळा, सुट्टी,सहल,आकाश, पाऊसाची सर, ढग,वीज,समुद्र,चंद्र,सूर्य हे सगळे आले. अशा सगळ्यांना घेऊन बालसुलभ भाषेत अर्थपुर्ण आषय ताला सुरात खरात सरांनी लिलया लिहीला आहे, हे अर्थातच अवघड काम परंतू महोदयांनी छान पेललं आहे. नारायण खरात महोदयांची या प्रत्येक कविता वाचकांना भुरळ पाडेल अशीच आहे. आवर्जून सांगाव्या अशा दोन कविता इथं नमूद करतो...

**झाड नका तोडू**
**झाड नका तोडू अरे झाड नका तोडू झाडालाही**
**येतं माणसासारखं रडू.**
**काय होईल झाड तोडून उजाड होईल धरणी,**
**धूप थांबेना, पाऊस पडेना, कशाची ही करणी.**
**झाडाला लागतं अन्नपाणी झाड घेतं श्वास**
**माणसाला झाडं त्यासाठी देत नाहीत त्रास.**
**कळंत नाही मग माणसं झाडं का तोडतात**
**ते मात्र मूकपणे मरण बघत रडतात.**
**स्वार्थामध्ये पुरता**
**बुडालेला माणूस**
**झाड आपला मित्र, शत्रू**
**नको मानूस.**
**कृपाकरुन प्रत्येकाने**
**वृक्षहत्या रोखा**
**नाही तर जगापुढे**
**अवर्षणाचा धोका.**
**माया देते माऊली, तसं झाड**
**देतं सावली**
**झाडाने तर धरणीची माया**
**खरी दावली.**


**हॅलो कोण ?**
**कावळ्याने चिमणीला**
**केला फोन...**
**चिमणी म्हणाली,**
**हॅलो कोण ?**
**कावळा : तुझा**
**कावळेभाऊ**
**चिमणी : अच्छा, तू काऊ**
**काय काम काढलं भाऊ ?**
**कावळा : पावसात घर**
**मोडलं**
**आजच्या रात्री तुझ्याकडे राहायचे होते.**
**चिमणी : त्यात काय एवढे**
**सरळ घरी यायचे होते.**
**कावळा : तू तुझ्या कामात**
**असतेस व्यस्त**
**मी पावसात भिजंत**
**बसेन नुसतं.**
**म्हणून म्हणालो**
**फोन करुन पाहू.**
**चिमणी : असं काय करतोस**
**ये ना घरी काऊ.**
**चिमणीच्या घरी**
**उडून गेला कावळा**
**फोनचे बिल द्यायचे**
**विसरला बावळा.**

या दोनही कवितांनी हाताळलेले विषय बालमनाला विचार करायला भाग पाडणारे आहेत. चिऊ काऊ ची आपल्या लहानपणच्या कवितेत किती महत्वाचं मूल्यवर्धण झालेलं आहे हे ही लक्षात घ्यावी अशीच गोष्ट आहे. आजची चिमनी पैल्या चिमनीसारखी " थांब माझ्या बाळाला न्हाऊ घालते आणि थांब माझ्या बाळाला खाऊ घालते " म्हणंत टाळाटाळ करंत नाही. मनःपुर्वक गरजवंत काऊला मदत करते. लेकरांमधे हा समजूतदारपणा रुजवणारी ही कविता सुंदरच आहे.

नारायण खरातांचं 'हे ही दिवस जातील' हे अजून एक देखणं कवितेचंच पुस्तक वाचकप्रिय झालं आहे.त्याबद्दल नंतर कधी तरी बोलूच आपण.तुर्तास 'चंद्रावरची सहल' या बालकविता संग्रहानं मन बहरुन टाकलं आहे, एवढं खरं.

कविवर्य खरात सरांना हार्दिक शुभेच्छा देताना मनस्वी आनंद होतो आहे.

**(लेखक मराठी भाषेचे साहित्यिक आणि इंग्रजी भाषा तथा साहित्याचे संशोधन मार्गदर्शक आहेत)**




# स्त्री शिक्षणाचे जनक समाज सुधारक महात्मा ज्योतिबा फुले



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**तत्कालिक समाज व्यवस्थेवर शब्दांचे असुड ओढत सामाजिक परिवर्तनाचा बीज मंत्र देत लोककल्याण व्हावं या उदात्त हेतूने प्रेरित होउन स्वतःच जीवन समर्पित करणारे स्त्री शिक्षणाचे जनक कृतीशील समाज सुधारक माहात्मा हि पदवी जनतेकडून प्राप्त ज्योतिबा फुले स्त्री शिक्षित असेल तर कुटुंब सुसंस्कृत होईल आणि म्हणून सामाजिक रूढी परंपरा, झुगारून देत स्त्री शिक्षणाचा पाया यशस्वी पणे रचताना संघर्षमय खडतर जीवन प्रवास हि त्यांच्या आयुष्यातील शौर्य यशोगाथा आहे. देश इंग्रजांच्या गुलामीत असताना एका बाजूला स्वतंत्र लढा आणि दुसर्यां बाजुला समाजव्यवस्था अगदी दयनीय अवस्थेत पोहचलेली असताना.**

आधुनिक केसरी

सामाजिक दरी मात्र पराकोटीची वाढतच चाललेली, त्यामध्ये आणखी भर म्हणजे अनेक लोक पिढ्या न पिढ्या मानसिक गुलामागिरीत जीवन जगण्याची सवय झाल्याने हि गुलामगिरी सोडायला तयार नसताना लोकांची मनस्थिती बदलण हे मोठं आव्हान असताना ह्या सगळ्या भायनक परस्थिती मधुन सामाजिक परिवर्तन घडविण्यासाठी स्वतःच आयुष्य, कुटुंब लोककल्याणासाठी समर्पित करण्याचा मनोदय म्हणजे अग्नी परिक्षाच पण हि दिव्य अग्नीपरिक्षा फुलें दाम्पत्यांनी यशस्वी करत अंखड आयुष्भर जन कल्याणासाठी स्वतः ला वाहुन घेतल. फक्त स्त्री शिक्षणाच नाही तर समाजसुधारक, साहित्यिक, क्रांतीकारक, म्हणजे प्रत्येक क्षेत्रात लोक हित डोळ्यासमोर ठेवून अनमोल असं योगदान दिलं. स्त्री शिक्षणाचा पाया रचताना याची सुरुवात हि स्वतःच्या पत्नी पासुन करणं उत्तम ठरेल हिच खुण गाठ मानशी बळगुण सामाजिक परिवर्तन घडविण्यासाठी शिक्षण महत्त्व जाणले. स्वतःच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांना प्रथम शिकवुन शिक्षिका करून महिलांची पहिली शाळा पुणे शनिवार वाडा येथे आरंभ केली. ही बाब त्या काळात सहज लोक मान्य होणारी नव्हती. अनुकुल परस्थितीमध्ये एखादा विचार घेऊन सामाजिक परिवर्तन करण सहज सोपं असतं पण जेव्हा परस्थिती प्रतिकुल असते. तेव्हा मात्र समोरच्या परस्थिती सोबत घोर संघर्ष करावा लागतो. असाच घोर संघर्ष अनंत नानाविध अडचणी डोंगरासारख्या उभ्या असताना देखिल अशक्य प्राय ते शक्य करून दाखविण्याची किमाया ज्योतीराव फुले यांनी यशस्वी पणे करून दाखवली . ज्या वेळी सामाजिक परिवर्तन हा विचार करणं सुद्धा कठिण होत तेच कठिण नेमकं याच बिकट खडतर काळात समजिक परिवर्तनाला कृतीची जोड देत सार्थक कार्य उभा केल म्हणून लोकांच्या कडुन त्यांना महात्मा ही पदवी बहाल झाली .समाज व्यवस्था परंपरा आणि सामाजिक परिवर्तन हि त्या त्या वेळीच त्या त्या काळच गणित असतं परंतु एकंदरीत पणे किमान भेद भाव, नसला पाहिजे एवढं तर सुचकपणे सामाजिक आचरण असल पाहिजे परंतु कधी कधी प्रथा, परंपरा रूढी , ह्या समाज व्यवस्थेवर आवश्यकतेपेक्षा जास्त प्रभाव निर्माण करतात आणि मग आपण जी सगळ्यांना माणूस म्हणून समान अधिकार वगैरे वगैरे हे फक्त फक्त वरकरणी बोलण्या पुरतच राहत आणि आशा वेळी सर्वांना समान न्याय , हक्क मिळाला पाहिजे, कोणाच्याही अधिकारांवर हक्कांवर गददा येता कामा नये . आणि मग या अधिकारांना हक्कांना न्याय मिळवून देण्यासाठी युगपुरुष जन्म घेत असतात . महाराष्ट्र हि तसं पाहिलं तर संत महंत आणि वेगवेगळ्या वीर पुरूषांच्या पावन स्पर्शाने पुणित झालेली भुमी आहे याच भुमीत महात्मा ज्योतिबा फुले यांचा जन्म अठराव्या शतकाच्या पूर्वार्धात झाला . वैचारिक परिवर्तन सामाजिक क्रांती घडवू शकत याच प्रेरणादायी मार्गदर्शक विचारातुन परिवर्तन झालं पाहिजे आणि सामाजिक परिवर्तन होण्यासाठी शिक्षण हे महत्वाचं आहे आणि शिक्षणाचा विस्तार जर करायचाय असेल तर ज्ञान गंगा घरोघरी पोहचवणे गरजेचे आहे. स्त्री शिक्षणाचा पाया रचला पाहिजे परंतु तात्कालिक समाज व्यवस्थेत मध्ये स्त्रीच् स्थान हे अगदी दुय्यम स्वरूपाचं होत. तात्कालिक समाज व्यवस्थेला आव्हान देवुन परिवर्तन घडवण प्रचंड कठिण , अनेक अडचणी समस्या, सामाजिक अवहेलना विविध समाज घटकाडुन वेळोवेळी मनस्ताप, तरी सुद्धा अनंत अडचणी वर करत महात्मा ज्योतिबा फुले यांनी आपल्या पत्नी सावित्रीबाई यांना प्रथम शिकवलं व स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली आणि शिक्षणाच दालन महिलांच्या साठी खुलं झालं . अनेक अवहेलना, अडचणी समस्या,यावर मात करत आपल्या विचारांना यशस्वी करण्यामध्ये महात्मा ज्योतिबा फुले अखेर यशस्वी झाले.त्यांचे क्रांतीकारी विचार अखेर लोक मान्य झाले . आणि आज आपण जी स्त्री पुरूष समानता पाहतोय याचा पाया ज्योतिबा फुले यांनी रचला होता . त्यांच्या पावन स्मृतींना जयंती निमित्त विनम्र अभिवादन.

# आजच्या शेतकऱ्याचा आसूड



अंजली औतकार
संपर्क क्र. 8208149689

आधुनिक केसरी

**मोठ्या मोठ्या उद्घोषणांमध्ये राजनैतिक भाषणांमध्ये जेव्हा आपण या मातीला शाहू- फुले -आंबेडकरांची भूमी म्हणतो त्यातील फुले बद्दल, नेमकं चिंतन करणे विसरतो. 'शेतकऱ्यांचा आसूड 'हे महात्मा ज्योतिबा फुलेंनी शेतकऱ्यांविषयीची तळमळ म्हणून, त्याकाळी उच्च समाज घटकांकडून त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाला ओळखून धनाने गरीब पण मनाने श्रीमंत असणाऱ्या बळीराजाची बाजू मांडण्यासाठी लिहिलेलं एक पुस्तक.इंटरनेटवर सर्च केल्यावर सहज सापडेल, पुस्तक देखील आणि पुस्तका विषयी माहिती देखील. पण आज विषय तो नाही आजच्या शेतकऱ्याचा आसूड म्हणजे नेमकं काय ? तर आज महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती.**



नेमक्या जयंती तर आपण प्रत्येकाच्या साजरा करतो.पण त्या भाषणांमध्ये जेव्हा आपण फुलेंचा उल्लेख करतो तेव्हा आपण हे स्वीकारतो की आम्ही फुलेंच्या विचारसरणीला धरून पुढे जात आहोत, मग हे खरं आहे का ? समाजात दुसरी बाजू मी , ही देखील पाहिली आहे की फुलेंच्या काही विचारांना एकतर अति आधुनिक म्हणून स्वीकारायला नकार दिलेला एक समाज आहे .तर दुसरीकडे त्यांनी हिंदू देवी देवतांविषयी सार्वजनिक सत्य धर्म या पुस्तकात जे लिहिलं, ते धर्माविरुद्ध आहे म्हणून त्यांना सहज नजरेआड केलं जातं.
असो आज प्रत्येकाला विचारस्वातंत्र्य आहे म्हणून माझा लेख कुणाच्याही विचारावर पडदा टाकण्याचं काम करणार नाही किंबहुना कोणीच करू नये.
ज्योतिबांनी देखील आयुष्यभर हेच केलं त्यांच्या सामाजिक कार्याबद्दल कराव तितकं कौतुक कमी.
असं म्हणतात लिखाणातून लेखक अमर होत असतात, पण ज्योतिबांची अमर होण्याची दोन कारण एक तर त्यांची लेखणी जी दगडालाही पाझर फोडेल आणि दुसरं म्हणजे त्यांचं कर्तुत्व एका बाजूने स्वतः एकटे उभे राहून, संपूर्ण सो कॉल्ड मोठ्या समजल्या जाणाऱ्या सर्व सोशक समाजाचा विरोध केला.
ज्योतिबांचा कार्य फक्त शेतकऱ्यांइतकं मर्यादित नव्हतं तर समाजातील तो प्रत्येक घटक ज्याला कमी समजलं जायचं, ज्याच्यावर अन्याय होत असे त्यांची बाजू होती. पण तरीही थोडक्यात सांगायचं झालं तर जिथे अन्याय होत असेल तिथे ज्योतिबा तो रोखण्यासाठी कायम हजर राहत. मग पुरषांइतकी सक्षम असली तरीही हीन समजल्या जाणारी विद्येपासून वंचित असलेल्या' स्त्री 'ची बाजू सुद्धा पहिल्यांदा ज्योतिबांनीच उचलली. तो काळ जरा फारच वाईट होता एकेकाळी युद्धांची गरज असे तेव्हा सामाजिक चळवळीची गरज होती. ज्योतिबांनी ती चळवळ केली म्हणून त्यांना त्याकाळचे योद्धे म्हणून घ्यायला मला जराही संकोच वाटत नाहीये.
बदलत्या काळानुसार काही दशकांमध्ये वेगवेगळ्या समस्या येत असतात आणि त्यांना ठामपणे उभे राहून तोंड द्यायला कुणीतरी महान व्यक्तित्व समोर येतात ज्यांची आपण मग पुढचे अनेक वर्ष देव म्हणून पूजा करतो. पण खरंच त्यांना देव म्हणण्याची किंवा त्यांची पूजा करण्याची काहीच गरज नाही .फक्त त्यांच्या विचारांना समजून घेतलं आणि समोर तसं वागलं तरी त्या चुकांची पुनरावृत्ती होणार नाही आणि त्या महामानवांना आदरांजलीही भेटेल. स्त्री शक्ती मिळवल्या जाणाऱ्या सावित्रीबाईंना ज्योतिबांनी घराबाहेर पाऊल ठेवण्याची संधी दिली , मी जाणूनच परवानगी दिली म्हणणार नाही कारण, एका स्त्रीला परवानगी द्यावी इतका सक्षम पुरुष असतो हे ज्योतिबांचे देखील विचार नाहीत.
असो ज्योतिबांविषयी वैचारिक वादळ नेहमी सुरू राहिलं आणि कदाचित राहणार आणि असावं कारण जिथे प्रश्न नसतात तिथे अंधश्रद्धा असते आणि जिथे प्रश्नांची उत्तरं असतात तिथे श्रद्धा आहे.
शेतकऱ्यांचा आसूड वाचल्यानंतर माझी ज्योतिबांवर श्रद्धा चढली आणि कदाचित आज त्यांच्या जयंतीला आवर्जून हा लेख लिहिणे त्याचीच प्रचिती आहे.
त्याकाळच्या शेतकऱ्यांवर अन्याय होत असे.शेतकरी बिचारा काम करून कष्ट करून शेतात राबून त्याच्याकडे एवढा शिल्लक वेळ मिळत नसेल की तो आपल्या पुरातन ग्रंथांना वाचेल किंवा त्यातून काही समजून घेईल आणि त्यामुळे तो अज्ञानाच्या ठाई गेला. सुशिक्षित वर्ग जे काही सांगेल आयुष्यात काही समस्या आल्या तर त्याकाळची ब्राह्मण जो काही तोडगा सांगतील व त्यासाठी कितीही जमिनी दान देणे असो की स्वतःच्या गोठ्यातील गुरडोर मागेपुढे पाहत नसे, म्हणून ज्या समाजात आपण राहतो तिथे शेतकऱ्याला शूद्र समजला गेलय तिथे त्यांना हात लावला तरी आपण भ्रष्ट होतो किंवा तेच समाजातील सगळ्यात खालच्या थराला बसतात असे बरेच गैरसमज होते पण ते खोडून काढण्याची इच्छा किंवा हिम्मत कोणातच नव्हती ज्योतिबांना ही समाजात होत चाललेली दुफळी भरून काढायची होती ते दलितांवर गरिबांवर होत असणारे आणि आहे सहन करू शकत नव्हते मग त्यांच्या चळवळींचा भाग त्यांचे लिखाणही झालं आणि आसूड लिहिला जाऊ लागलं त्याकाळी त्यांच्या लेखणीला बराच विरोध झाला पण थांबणार कुठे होते वृत्तपत्रांनी छापायला नकार दिल्यानंतर त्यांनी सभा भरून स्वतःचे विचार लोकांपर्यंत पोहोचवले आणि आज देखील ते विचार शाश्वत वाटतात !
हो मी म्हटलं ज्योतिबांची लढाई जरी त्याकाळची असली ज्योतिबांनी त्याकाळच्या समाज व्यवस्थेला आरसा दाखवला असला, ज्योतिबांनी त्याकाळचा स्वाभिमान जागृत केला असला तरी त्यात सर्वांची गरज आजही आहे मान्य आहे प्रत्येक काळात घडून गेलेले लिखाण त्या काळासाठी मर्यादित असतं त्यात समस्या पुन्हा उद्भवल्या की ते ज्वलंत होऊ लागतं. आज महाराष्ट्रात खरंतर भारतात जेव्हा शेतकऱ्यांची स्थिती पाहते तेव्हा ज्योतिबांचा लिखाण तितकाही जुना नाही असं वाटतं. मी लिहिण्याची हिंमत करत आहे कारण हे कोणी वाचणार असेल किंवा नसेल माहिती नाही पण ज्योतिबांकडून प्रेरणा मिळाली आहे की अन्यायाविरुद्ध बोललंच जावं..!



किंबहुना किमान बोललं तरी जावं ,कारण इथून फक्त एकाच्या डोक्यात हा विचार पुढे गेला तरी लेखणीला सार्थकता मिळेल. नुसता कधी काळी कांद्याचा भाव शंभर रुपये किलोवर गेला तर प्रत्येक मीडिया चॅनल वरतीच बातमी झळकली ब्रेकिंग न्यूज ! काय काय खेळ मांडला तो आपण सगळ्यांनी पाहिला.. अहो खरंही होतं नोकरदार मंडळींवर किती मोठा अन्याय तो ! ती माझी तक्रारीची बाजू नाही पण आज जेव्हा कांदा पाच रुपये किलो जातो तेव्हा तो नुसता शेतातून काढून आणण्याची किंमत तरी शेतकऱ्याला भेटते का ? हा प्रश्न मात्र कुठलाच मीडिया चॅनल किंवा कुठलाच वृत्तपत्र मोठा करून दाखवत नाही. ही परिस्थिती वर्षभर असते. अपवाद म्हणून एखाद वृत्तपत्र किंवा एखादी वाहिनी संपूर्ण शेतकरी आढावा घेत असेल तरच तिथे या विषयांवर बोललं जातं बाकी समाज ज्या घटकांवर विचार करतो जी बाजू पाहतो तिथे या गोष्टी सहज पडदा टाकल्या जातात. दुसरं म्हणजे कर्जमाफी भाषा थोडी परखड होईल पण आजकाल सत्ता स्थापन करणे इज इक्वल टू गरीब शेतकऱ्यांचा फायदा उचलण्याचा ट्रेंड फार सुरू झालंय. मला नेहमी वाटायचं योजना येतात कोणासाठी तर गरीब लोकांसाठी, पण मला सांगा शेतकरी अचानक गरीब कसा झाला? हल्लीच्या काही वर्षांपूर्वीची गोष्ट शेतकरी रुबाबात राहायचा उगीच काय ते बळीराजा नाव पडलं नाही स्वरूप शेतीचा इतका बदललं, जमीनीच्या भावांमध्येही फार वाढ झाली तरीसुद्धा शेतकरी काही श्रीमंत होईना आणि माझ्यासारख्या सामान्य मुलीला हे कोड काही उलगडेना. असो निवडणुका तोंडावर आल्या की शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफीचा आश्वासन दिलं जातं. जे की संविधानिक दृष्ट्या पूर्णपणे बेकायदेशीर आहे....
असो हे आश्वासन पूर्ण होत तरी का ?
आणि खरंच असले पोर खेळण्याची गरज आहे का.. नाही म्हणजे विशिष्ट वर्गातील शेतकरी कर्ज घेणार ते माफ होणार दुसऱ्या दिवशी तेच शेतकरी पुन्हा जाऊन कर्ज काढणार पुन्हा तोच कित्ता गिरवला जाणार अरे कर्जमाफी म्हणजे काय भिक देतो का आपण त्या शेतकऱ्यांना ! ह्या फक्त खुर्च्या बदलण्याच्या परंपरा झाल्या आहेत कुठल्याही योजना अंतर्गत फक्त पैसा पुरवणे म्हणजे एक मागासलेला विचार मला तरी वाटतो...
आज योजनांचा स्वरूप बदलण्याची नितांत गरज आहे. कुठले काय ते पैसे अकाउंट मध्ये पडणार म्हणून बँकेसमोर जेव्हा भल्या मोठ्या रांगा दिसतात तेव्हा आजही आजच्या शेतकऱ्यांच अज्ञान त्यातून झळकतं. ही भूमी महान आहे इथली माती विविधतेने संपन्न झालेली समृद्ध झालेली इथल्या मातीत जर प्रयत्नांची जोड मिळाली तर कृषीप्रधान म्हणवला जाणारा भारत संपूर्ण जगावर फक्त शेतीच्या भरवशावर अधिराज्य गाजवू शकतो.
पण मग तशा योजना आणायला सरकार स्वतःहून पुढाकार का घेत नाही हाच प्रश्न मला पडतो.
बोलत आहे तर थोडं तरी संशोधन केलेच असणार मी ही, योजना आहेत बऱ्याच योजना आहेत ज्यांच्यातून शेतकरी प्रगती करू शकतात माझा याला विरोध नाहीच. पण त्या सापडतात केव्हा जेव्हा इंटरनेटच्या जगात खोलवर शिरून कुणी फार दम काढून त्या शोधेल आणि माफ करा पण त्या काळच्या शेतकऱ्यांसारखच आजच्या सामान्य शेतकऱ्यालाही हे करायला वेळ नाही. दुसरी विदारक बाजू म्हणजे एखाद्या अधिकाऱ्याकडून एखाद्या गावाला कळलं तरी सुद्धा ते सगळं गाव त्याच योजनेच्या पाठी लागत ...काय तर काहीतरी अमाऊंट त्यांच्या खात्यात जमा होणार मग त्या कागदपत्रांमध्ये किती खर्च जातो कॅफे वाले झेरॉक्स वाले कागदपत्रे जमा करण्यासाठी कार्यालयां समोर किती किती रांगा लागतात हे सगळं सोडलं तरी सुद्धा योजनेपर्यंत पोहोचण्यासाठीचा मार्ग पैसे खाऊ एजंट नी इतका जाम केलेला असतो की तिथपर्यंत पोहोचल्यावर हाती लागतात ती चार नाणी. हे आणि असं बरंच काही आहे बोलण्यासारखं कदाचित हा संपूर्ण लेख याच प्रश्नांवर देखील आधारभूत राहिला असता पण मी आधी ज्योतिबा बद्दल बोलणं गरजेचं समजलं कारण आज त्यांची जयंती, आणि या विचारांना त्यांनीच वाचा फोडली.
तुम्हालाही सल्ला देईल त्यांचं लेखन वाचा किमान शेतकऱ्या संबंधित, नंतर आजच्या समाजात डोळे उघडून पहा आज पुन्हा शेतकरी त्याच वाटेला आहे आज पुन्हा समाज तीच दुफळी निर्माण करू पाहत आहे जिथे शेतकरी एक गरीब दलित आणि इतरांच्या सहानुभूतीचा भुकेला व्यक्ति म्हणून समोर येतो जे साफ खोटं आहे. बदलांची गरज आहे आणि त्याहीपेक्षा जास्त बोलण्याची कारण खरंच खिशात खाऊ रूपाने जो पैसा खोचला जात आहे तो शेतकऱ्यांच्या प्रगतीला फार फार खुंटवत आहे...
ज्ञान असूनही शेतकऱ्याला अज्ञानी बनवू नका कारण हे हळूहळू आमंत्रण असेल पुन्हा वैचारिक युद्धांसाठी कारण अज्ञान फार काळ टिकून राहत नसतं ज्योतिबा रुपी ज्ञानज्योत कुठे ना कुठे उदयाला येतच असते.

# महात्मा फुले : शैक्षणिक विचार व सद्यस्थिती



कल्पना घुगे
जालना

आधुनिक केसरी

**भारतीय समाजाच्या क्रांतीकारक परिवर्तनवादी पर्वाचे आपण सिंहावलोकन केले तर आपल्याला असे दिसून येते कि,काळाच्या पूर्वीच काळाचे पुढचे पाऊल उचलून सामाजिक क्रांतीसाठी प्रवाहाला छेद देऊन समस्त मानवजातीच्या कल्याणासाठी संघर्ष करणारे,सामाजीक न्याय आणि पूर्नबांधणीचा आयुष्यभर ध्यास घेणारे आद्य समाजसुधारक म्हणजे क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले होय.**

प्राचीन वैदिक काळाचा विचार केला तर शिक्षण ही एका विशिष्ट वर्गाची मक्तेदारी होती. ही मक्तेदारी मोडीत काढत सामाजीक परिवर्तन हे ध्येय साध्य करण्यासाठी 'शिक्षण' हे अत्यंत प्रभावी साधन आहे,हे सर्वप्रथम महात्मा फुले यांनी समाजाला पटवून दिले.सामाजीक समता प्रस्तापित करायची असेल तर समाजातील सर्व स्तरातील लोकांपर्यंत शिक्षण पोहचले पाहिजे हे लक्षात घेऊन त्यांनी शैक्षणिक क्रांतीसाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. क्रांतीसुर्य महात्मा जोतिबा फुले हे केवळ बोलके सुधारक नव्हते तर ते कर्ते सुधारक होते.महात्मा फुले यांना शिक्षणाच्या सार्वत्रीकरणाचे जनक म्हणुन संबोधले जाते.शिक्षणाची गंगा ही समाजीतील सर्व स्तरापर्यंत, घरोघरी पोहचली पाहिजे व समाजातील सर्वसामान्यांना तसेच स्त्रीयांना शिक्षणाचा अधिकार मिळवून देण्यासाठी महात्मा जोतिबा फुले यांना व्यवस्थेशी बंड पुकारून क्रांतीकारी पाऊल उचलले. महात्मा जोतिबा फुले यांच्या मते शिक्षणाचे सार्वत्रीकरण म्हणजे जात,धर्म, लिंग, शारिरीक अपंगता यांचा अडसर न ठेवता समाजातील सर्व घटकांना समातनेच्या तत्वावर शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे. शिक्षण हे विषमतेवर आधारित न ठेवता समतेवर आधारित असावे. शिक्षण हे सर्वसामान्यांच्या जीवनविषयक दैनंदिन गरजांशी निगडित असावे. प्राथमिक शिक्षण हे सक्तीचे व मोफत असावे. शिक्षणाला अडसर ठरणाऱ्या रूढी-परंपरा, अंधश्रध्दा या शिक्षणातून दूर कराव्यात. गुणवत्ता वाढीसाठी शाळांची तपासणी करण्यात यावी. शासकीय व खाजगी शाळा सांभाळण्याची जबाबदारी सरकारने घ्यावी. व्यवसायभिमुख,व्यवसाय करता येईल अशा शिक्षणावर भर द्यावा. प्राथमिक शाळेतील शिक्षक हा प्रशिक्षित असावा व त्याला पुरेसे वेतन देण्यात यावे. जनतेच्या गरजा लक्षात घेऊन अभ्यासक्रम निश्चित करावा. स्थानिक कर उत्पनाच्या ५०% रक्कम शिक्षणावर खर्च करण्यात यावी. अनुदान मंजूर करणे याचा संबंध निकालाशी जोडण्यात येऊ नये.उच्च शिक्षित पिढीने अशिक्षित लोकांची पिळवणूक करू नये.स्त्रीयांच्या शिक्षणाकरिता आधिकाधिक प्राथमिक शिक्षणाच्या सोयी शासनाने कराव्यात.

महात्मा फुले यांचे शिक्षणविषयक विचार व सद्यस्थिती यांचा आढावा घेतला तर असे लक्षात येते की, आजच्या काळात शैक्षणिक प्रगतीच्या आलेख हा पूर्वीपेक्षा नक्कीच उंचावला आहे यात शंका नाही. शिक्षणाच्या सुविधा, आधुनिक उपकरणे,विविध अभ्यासक्रम, दूरस्त शिक्षण, वस्तीगृह, शिष्यवृत्या इ.अनेक बाबी या आजच्या शैक्षणिक परिस्थितीतील अनुकुल ता दर्शवतात. पण सखोल विचार केला तर लक्षात येते महात्मा जोतिबा फुले यांना अभिप्रेत शैक्षणिक प्रगती होण्यासाठी बदल हे अपेक्षित आहेत. त्यात असे सांगता येईल की, शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण हे अद्याप पूर्ण झालेले नाही. वाडे-वस्त्या, तांडे या भागात शिक्षणापासून वंचित असणारे घटक अनाथ मुले,ऊसतोड कामगार, मजूर इ.शिक्षणप्रवाहात आणणे गरजचे आहे.तेव्हाच १००% साक्षरता हे उद्दिष्ट हे साध्य होईल. तसेच आजच्या काळात असंख्य तरूणांना भेडसावणारा प्रश्न म्हणजे बेरोजगारी होय. हा प्रश्न सोडावयाचा असेल तर शिक्षण जीवनाभिमुख दैनंदिन जीवनाशी निगडित असणे गरजेचे आहे. यासाठी अभ्यासक्रमाची चिकित्सा करणे महत्त्वपूर्ण ठरेल. शिक्षणाला जीवनभिमुख अभ्यासक्रमाची जोड



जर परिपूर्ण मिळाली तर सुशिक्षित बेरोजगारांचा असंख्य दिसणारा लोट आपणास दिसून येणार नाही. त्याचबरोबर सध्याच्या शिक्षण परिस्थितीत गुणांचा फुगवटा व गुणवत्तेचा अभाव ही एक दिसून येणारी वास्तविकता आहे.गुणांचा चढता आलेख गगनाला भिडला असताना मात्र गुणवत्ता खुंटलेली दिसते.वास्तविक जीवनात सत्य-असत्य ओळखण्या इतपत चिकित्सक व तार्किक दृष्टीकोन आजची शिक्षण व्यवस्था ही उद्याच्या भावी पिढीला देऊ शकत नाही.
महात्मा फुलेंच्या शाळेत शिक्षण घेणारी मुक्ता साळवे ही चिमुकली जर व्यवस्थेला प्रश्न विचारत असेल तर आजचा उच्च शिक्षित तरूणाला आपल्या अधिकारांविषयी, हक्कांविषयी व्यवस्थेला प्रश्न विचारावा असे का वाटत नसेल ? त्याचबरोबर महात्मा फुले यांनी मांडलेला शैक्षणिक संस्थांना अनुदान मंजूर करणे याचा संबंध निकालाशी जोडण्यात येऊ नये हा मुद्दा लक्षात घेण्यासारखा आहे. कारण अनुदानाचा संबंध निकालाशी जोडला तर साहजिकच शैक्षणिक संस्था गुणांची विक्री करणारी दुकाने बनतील. त्यामुळे गुणवत्ता, मूल्यशिक्षण, सुविधा.इ बाबी या मूल्याकांनात लक्षात घेणे गरजेचे आहे. शिक्षण घेऊन निर्माण होणाऱ्या पिढीत सामाजीक परिवर्तनाला साहाय्यभूत, सामाजीक बांधीलकी जोपासणारे विचार निर्माण होणे गरजेचे आहे. या सर्व बाबींचा विचार केला असता असे दिसून येते कि देशाची,समाजाची उंची ही प्रगतीपथावर नेण्यासाठी शैक्षणिक क्षेत्रात सद्य स्थितीतील काही अनुकुल बाबी वगळता शिक्षणाचे होणारे बाजारीकरण यावर वेळीच आळा घालून महात्मा फुलेंनी सांगितलेल्या शैक्षणिक विचारांचा अवलंब करणे हितकारक व महत्त्वपूर्ण ठरेल.

# क्रांतिसूर्य ज्योतिबा फुले




प्रा .सौ. शारदा वानखेडे
संपर्क क्र. 9823066606

आधुनिक केसरी

**विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली, नीतीविना गती गेली, गतीविना वित्त गेले, वित्ताविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले. या आपल्या काव्यपंक्तीतून अज्ञानरुपी अंधारात खितपत पडलेल्या बहुजन समाजाला ज्ञानाचा प्रकाश देणारे, स्त्री शिक्षणाची पहिली ज्योत पेटवणारे, हिंदू समाजातील शुद्रातिशूद्रांच्या व्यथा निशंकपणे बोलून दाखवणारे, कर्जबाजारीपणा पायी हैराण झालेल्या शेतकऱ्यांची गाऱ्हाणी वेशीवर टांगणारे, देशात सर्वप्रथम शिवजयंती सुरू करणारे, शिवरायांवर पहिला सर्वोत्तम पोवाडा लिहिणारे महान शिवशाहीर, विधवा पुनर्विवाहाचे पहिले पुरस्कर्ते, कष्टकऱ्यांचे अज्ञान व दारिद्र्य हे ईश्वर निर्मित नसून त्यांचे मूळ आपल्या समाज व्यवस्थेतच आहे हे नेमकेपणाने ओळखणारे, परंपरागत जीवन सरणीतील कनिष्ठ अन्यायकारक रूढींवर कोरडे ओढणारे, दलित -शोषित-कष्टकरी वर्गाचा कैवार घेऊन, त्यांना त्यांचे नैसर्गिक मानवी हक्क प्राप्त करून देण्यासाठी जन्मभर झगडणारे कृषी क्रांतीचे अग्रदूत म्हणजे क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले होत.**

म. ज्योतिबा फुले यांचा जन्म ११ एप्रिल१८२७ रोजी सातारा जिल्ह्यातील कटगून या गावी गोविंदराव व चिमणाबाई या दांपत्याच्या पोटी झाला. फुलांचा व्यवसाय करत करत मूळचे गोरे असणारे त्यांचे आडनाव फुले असे झाले. १८४० साली त्यांचा विवाह सावित्रीबाई यांच्याशी झाला. तत्कालीन परिस्थितीच्या तुलनेत त्यांचे विचार फारच आदर्श असे होते. खऱ्या अर्थानं फुले कर्ते सुधारक होते. सर्वप्रथम त्यांनी सावित्रीबाईंना शिक्षित करून १८४८ साली पुण्यातील भिडे वाड्यात मुलींसाठी पहिली शाळा काढली. व स्त्रियांच्या शिक्षणाचा प्रारंभ झाला. या कार्यात त्यांना खूप त्रास सहन करावा लागला. परंतु त्यांनी आपले कार्य सुरूच ठेवले. स्त्री शिक्षणाच्या कार्याबरोबरच ब्राह्मणी वर्चस्वा विरोधात आवाज उठवून त्यांनी समाजात परिवर्तन घडविण्याचेही कार्य केले. शेतकरी, अस्पृश्य, विधवा, सर्वांसाठीच त्यांनी केलेले कार्य खूप महान असे आहे. त्यांचे हे कार्य पाहूनच १८८८ साली मुंबईतील जनतेने त्यांना महात्मा ही पदवी बहाल केली. बहुजन समाजाचे अज्ञान, दारिद्र्य व जातीभेद पाहून शिक्षणच या समाजाला अडचणीतून सोडू शकते असा निष्कर्ष काढला. व एकापाठोपाठ एक अशा अनेक ठिकाणी शाळा सुरू केल्या. मनुष्य हा सर्व प्राण्यांपेक्षा श्रेष्ठ आहे व सर्व मानवांमध्ये स्त्री श्रेष्ठ आहे, असे त्यांचे विचार होते. त्यामुळे "जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाते उधारी"... या उक्ती प्रमाणे स्त्री शिक्षित झाली तर सर्व कुटुंब सुधारेल म्हणून सर्वप्रथम स्त्री शिकली पाहिजे. व त्यासाठीच त्यांनी प्रयत्न केले. या कार्यात त्यांना सावित्रीबाईंनी मोलाची साथ दिली. समाजात असलेला प्रचंड जातीभेद पाहून ज्योतिबा म्हणत,"धर्म तो आहे जो समाजाच्या हितासाठी आहे. समाजाच्या कल्याणासाठी आहे. जो समाज हितासाठी नाही तो धर्म नाही."कृषीप्रधान समजल्या जाणाऱ्या आपल्या भारत देशातील शेतकऱ्यांचे हाल पाहून त्यांनी ' शेतकऱ्यांचा आसूड 'हा ग्रंथ १८८३साली लिहिला. या ग्रंथात त्यांनी शेतकऱ्यांच्या अनेक प्रश्नांना वाचा फोडली. भारतीय शेतकऱ्यांचे गाऱ्हाणे प्रथमवेशीवर टांगणाऱ्या म. फुले यांना ' कृषी क्रांतीचा अग्रदूत'ही बिरूदावली डॉ.स.गं. मालशे यांनी बहाल केली. प्रस्तुतग्रंथात म. फुले यांनी शेती व शेतकरी यांची इंग्रजी राजवटीच्या काळातील परिस्थितचे वर्णन केले आहे. पेशवाई परवडली पण नवे इंग्रजांचे राज्य नको अशी म्हणण्यासारखी अवस्था १८७०मध्ये ग्रामीण भागात उत्पन्न झाली होती. १८७५ मध्येनगर, सोलापूर भागात झालेले शेतकऱ्यांनी सावकारांविरुद्ध केलेले दंगे, वासुदेव बळवंत फडके यांनी कोळी, भिल्ल, रामोशी यांना हाताशी धरून केलेले बंड, सावकारी लुबाड लूक व पिळवणुकीस पायबंद बसावा म्हणून १८७९ साली 'डेक्कन ऍग्रीकल्चरीस्ट्स रिलीफ  ऍक्ट'या नावाचा सरकारने केलेला कायदा, तसेच १८७७ साली महाराष्ट्रात पडलेला प्रचंड दुष्काळ अशा एक ना अनेक घटना 'शेतकऱ्यांचा आसूड' लिहिण्यास कारणीभूत ठरल्या. प्रस्तुत ग्रंथात म. फुले यांनी शेती व शेतकरी यांच्या दुःखाचे दर्शन व सुधारणेच्या उपायांचे दिग्दर्शन केले आहे. शेतकऱ्यांच्या परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी फुल्यांनी सरकारला काही सूचना केल्या आहेत. उदा. शेतकऱ्यांना छळणारे सावकार, लुटणारे व्यापारी, जुलमी पाटील, यांच्यावर कडक नजर ठेवण्याची सूचना त्यांनी सरकारला केली आहे.

शेतकऱ्यांची मुले तमासगिरांच्या नादी लागून नैतिकदृष्ट्या बिघडू नयेत म्हणून डिटेक्टिव्ह डॉक्टर नेमावे, बालविवाह व बहुपत्नीत्व यावर बंदी आणावी, शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षण सक्तीचे करावे, जोडधंदे आणि शेतकी यांचा मेळ घालावा. शाळांवर शेतकऱ्यांपैकीच शिक्षक नेमावेत. शेतकऱ्यांच्या मुलांसाठी देशी भाषेत शेतकी विषयक पुस्तके तयार करावीत, लोकल फंडाचा पैसा केवळ शेतकऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणार्थ खर्च व्हावा, अशा काही महत्त्वाच्या सूचना त्यांनी सरकारला केलेल्या आहेत यावरून त्यांचा दृष्टेपणा दिसून येतो. शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी आधुनिक पद्धतीने शेती केली जावी. त्यासाठी लागणारे खत व बी -बियाणे यांची योग्य माहिती शेतकऱ्यांना द्यावी. आधुनिक यंत्रसामग्री पुरवून पिकांची प्रदर्शने भरवावीत. उत्तम शेती करणाऱ्या शेतकऱ्यास पारितोषिक द्यावे. शेतकऱ्यांच्या होतकरू मुलांना शिष्यवृत्ती देऊन त्यांना परदेशी पाठवावे .अशा अनेक सूचना करतानाच त्यांनी असे केल्यामुळे शेतकरी कर पट्ट्या




भरण्यासाठी आपोआपच समर्थ होतील असे मजेशीर आमीषही सरकारला दिले आहे.

म. फुले यांनी सरकारला सूचना करण्याबरोबरच शेतकऱ्यांनाही काही महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत. शेतकऱ्यांनी अज्ञान, आळस, सुखानसीनता, धर्मभोळेपणा, व्यसना सक्ती व गताणूगतीकता इ. दोष टाकले पाहिजे याची जाणीव त्यांना करून दिली आहे. महात्मा फुले हे आधुनिक महाराष्ट्रातील मुलगामी समाज परिवर्तनाच्या चळवळीचे आद्य प्रवर्तक होते. आपल्या समाज व्यवस्थेतील धर्माधिष्ठिक बौद्धिक गुलामगिरी, सामाजिक अन्याय व आर्थिक शोषण यांकडे त्यांनी प्रथमच लोकांचे लक्ष वेधले. एकोणिसाव्या शतकात होऊन गेलेल्या अनेक विद्यावंत समाज सुधारकांपेक्षा ज्योतिबा फुले यांच्या कार्याची दिशा अगदी निराळी होती. समाजातील अनेक अनिष्ट व अन्यायकारक रूढींवर त्यांनी वारंवार कोरडे ओढले. त्याचबरोबर समाजातील नवशिक्षितांना त्यांनी आपल्या सामाजिक जबाबदारीची जाणीव करून दिली. स्वतःच्या विवेक बुद्धीला जे पटले ते करण्यासाठी फुले कधीच डगमगले नाहीत. समाजातील अगदी तळाच्या थरातील माणसांच्या सुखदुःखाची समरस झालेले महात्मा फुले हे बोल घेवड्या समाज सुधारकांपेक्षा कधीही श्रेष्ठच आहेत. ते खऱ्या अर्थाने कर्ते सुधारक होते. समाजात निर्माण झालेला विधवांचा प्रश्न हा बालविवाहा मुळे होतो.हे त्यांनी जाणले होते .त्यामुळे सर्वप्रथम बालविवाह थांबले पाहिजे . असा विचार त्यांनी समाजात रुजविला. परंतु त्या काळात फुलेंनी मांडलेला विचार अजूनही समाजामध्ये तेवढा रुजला नसेल का? अजूनही समाजात बालविवाह मोठ्या प्रमाणात होताना दिसतात. अजूनही बालविवाह रोखण्यासाठी महिला व बालविकास व अधिकाऱ्यांना कडक कायदे करावे लागतात. व बालविवाह होऊ नयेत म्हणून व्याख्यानांचे ही आयोजन करावे लागते. ही खरोखरच खूप खेदाची बाब आहे. ही समाजात चोरून लपून का होईना बालविवाह ही अत्यंत खेदाची बाब आहे. बालविवाहाच्या गंभीर परिणामांची जाणीव समाजाला आता तरी व्हायलाच हवी. महात्मा फुले यांचे शैक्षणिक, सामाजिक, साहित्यिक अशा सर्वच कार्यातील योगदान खरोखरच खूप मोलाचे आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सुद्धा म. फुले यांनाच आपले गुरु मानले होते. व त्यानंतरचे बाबासाहेबांचे कार्य आपल्या सर्वांच्या समोर आहेच. स्त्री शिक्षणाच्या या प्रणेत्यांनी २८नोहेंबर१८८० रोजी या जगाचा निरोप घेतला. स्त्रियांच्या मनात क्रांतीची ज्योत पेटवणाऱ्या या क्रांतीसुर्यांना माझे विनम्र अभिवादन.

# डीजेच्या आवाजामुळे 'हृदयाची धडधड' थांबते



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**ध्वनी प्रदूषणाचा मानवी आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याचे आपण अनेकदा ऐकलं असेल. पण ध्वनी प्रदुषणामुळे आता मृत्यू झाल्याच्या अनेक घटना समोर आल्या आहेत. अनेकांना लग्नसमारंभात, पार्टीत डीजेवरील मोठ्या आवाजातील गाण्यांवर नाचायला आवडते. मात्र यामुळे अनेकांना हृदयविकाराचा धोका वाढत असल्याचे धक्कादायक खुलासा एका रिसर्चमधून झाला आहे. बिहारच्या सीतामढीमध्ये ४ मार्च रोजी २२ वर्षीय सुरेंद्र कुमार यांचा लग्नसमारंभात वधूच्या गळ्यात वरमाळ घालताना हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला.**

लग्नसमारंभातील डीजेच्या मोठ्या आवाजामुळे अस्वस्थ वाटल्याने तो स्टेजवरून कोसळल्याचा दावा त्याच्या कुटुंबियांनी केला आहे. याचप्रकारे तेलंगणामध्ये आपल्या नातेवाईकाच्या लग्नात नाचताना एका १९ वर्षीय व्यक्तीचा खाली कोसळून मृत्यू झाला. तर दुसरीकडे गेल्या वर्षी २५ नोव्हेंबर रोजी वाराणसीच्या पिपलानी कटरा येथे लग्नासमारंभात नाचत असताना एका व्यक्तीचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला. गेल्या काही महिन्यांपासून भारतात अशाप्रकारे अनेक घटना घडल्या ज्यात डीजेचा मोठा आवाज सहन न झाल्याने कोसळून मृत्यूच्या घटना घडल्या. संशोधकांनी ५०० निरोगी व्यक्तींवर हा अभ्यास केला, यातील बहुतांश व्यक्ती गजबजलेल्या बाजार परिसरात काम करणारे आणि सतत मोठ्या आवाजाच्या संपर्कात असतात. पाच वर्षे केलेल्या या अभ्यासात दिसून आले की, हृदयविकाराची कोणतीही लक्षणे नसलेल्या व्यक्तींना हृदय आणि रक्तवाहिन्यांसंबंधीत रोगांचा सामना करावा लागला. हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी जोखीम ( वायू प्रदूषणासह ) मध्ये योगदान देणाऱ्या इतर घटकांचे समायोजन केल्यानंतर आढळले की, सरासरी २४ तासात आवाजाच्या पातळीतील प्रत्येकी ५ डेसिबलची वाढ ही हृदयविकाराचा झटका, स्ट्रोक आणि हृदयासंबंधीत इतर गंभीर आजारांचा धोका ३४ टक्क्यांनी वाढवतोय. याचा परिणाम ऑमिग्डाला ( मेंदूतील राखाडी पदार्थ ) वर देखील होतो जो निर्णय घेण्यात महत्त्वाची भूमिका बजावतो. तीव्र आवाजामुळे मेंदूतील हा भाग आकुंचन पावतो. यामुळे आक्रमकता आणि  मूड बदलणे यासारख्या समस्या निर्माण होतात. लग्न मिरवणुकीतील वाढते डिजेचे फॅड धोक्याचे व हृदयविकाराला कारणीभुत ठरत आहे. सध्या लग्नसराईत ब्रास बँड किंवा अन्य वाजंत्री ऐवजी डिजे लावला जातो. कोरोनानंतर कमकुवत झालेल्या हृदयाचे असे अनेक किस्से समोर आले आहेत, मात्र बँड सदस्यांचा कर्कश आवाज आणि डीजेच्या वेगवान बीटमुळे हृदयाची धडधड थांबल्यानंतरही लग्नसमारंभातील देखावे हा एक भयावह ट्रेंड बनत चालला आहे. विशेष म्हणजे डीजेच्या मोठ्या आवाजामुळे ध्वनिप्रदूषण होते आणि त्यासाठी न्यायालयाने आदेश देताना डीजेच्या आवाजाची मर्यादा १० डेसिबल निश्चित केली आहे. मात्र सध्या लग्न समारंभ असो की महापुरुषांची जयंती सर्वत्र १०० ते १५० डेसिबलचे डीजे वाजवले जात आहेत, त्यामुळे आजूबाजूचे मैदान तर हादरत असतेच मात्र शिवाय हृदयरुग्णांची अवस्था बिकट होत आहे. सध्या वायुप्रदूषण मोठ्यप्रमाणावर वाढले असून निर्मिती प्रकल्पामुळे वाहनांमुळे वायू प्रदूषणाच्या विळख्यात सापडलेल्या शहराला ध्वनी प्रदूषणानेही ग्रासले आहे. रेल्वे इंजिन व भोंग्याचे कर्णकर्कश आवाज, अवास्तव वाढलेल्या वाहनांमुळे झालेली रहदारी. यामुळे ध्वनीप्रदूषणाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला. ध्वनीची तीव्रता मोजण्यासाठी पोलिस प्रशासन, पर्यावरण



नियंत्रण बोर्ड किंवा कोणतीही यंत्रणा कार्यान्वित नाही. शहरवासियांसह ग्रामीण भागाला   ध्वनीप्रदूषणाच्या मोठया समस्येला तोंड द्यावे लागत आहे. मात्र याबाबत कोणीही खबरदारी घेत नाही. त्याला रोखण्यासाठी यंत्रणाही सक्षम नाही. त्यामुळे तीव्रतेची माहिती शास्त्रीय पद्धतीने न घेता केवळ अंदाज वर्तविला जातो. ध्वनीप्रदूषण कायद्यान्वये केवळ गणोशोत्सवातच कारवाई होते. या व्यतिरिक्तही कर्णबधीरपणाचा धोका निर्माण होऊ शकणाऱ्या ध्वनी प्रदूषणाबाबत मात्र कोणी गांभीर्याने दखल घेत नाही. शहरात पालिका दवाखाना, पालिकेची प्रशासकीय इमारत, शैक्षणिक संस्था, खासगी दवाखाने व न्यायालय परिसर सायलेंन्स झोनमध्येही आवाजाच्या मर्यादेचे सर्रास उल्लघन होत आहे. परंतु या संदर्भात प्रशासनातर्फे कोणतीही ठोस कारवाई होत नाही. औद्योगिक वसाहतीतही ध्वनी तीव्रतेच्या नियमांची पायमल्ली होत आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे केवळ नोटिसा बजावण्याव्यतिरिक्त काहीही कारवाई होत नसल्याचे चित्र आहे.

वाहतूक शाखाही उदासिन शहरात महाविद्यालयीन युवकांनी बाइक्सला कर्णकर्कश आवाज असणारे हॉर्न बसविले आहेत. शहरात वाहतुकीची कोंडी होण्याचे प्रमाण अधिक आहे. आधीच वाहतुकीच्या कोंडीत अडकलेल्या वाहनधारकांना कर्णकर्कश हॉर्नचा आवाजही ऐकावा लागतो. यासह विजेच्या भारनियमनात व्यापारी संकुलांत चार तास सतत चालणारे जनरेटरही ध्वनीप्रदूषणाच्या समस्येत भर घालत आहे. लग्नकार्यांत बॅंडऐवजी डिजेचा वापर वाढला गणेशोत्सव मिरवणुकीतच मागविले जाते मोजमाप यंत्र महाविद्यालयीन युवकांकडून कर्कश हॉर्नचा वापर वाढला मिरवणूक परवानगीला खो असे आहेत निकष आवाजाची तीव्रता चार विभागांत गणली जाते. औद्योगिक वसाहतीमध्ये दिवसा ७५ डेसीबल तर रात्री ७० डेसीबल, कर्मशिअल झोनमध्ये दिवसा ६५ व रात्री ५५ डेसीबल, रहिवासी क्षेत्रात ५५ व रात्री ४५ डेसीबल, सायलेन्स झोनमध्ये दिवसा ५० व रात्री ४० डेसीबलचे निकष आहेत. पोलिसांकडे यंत्रणा नाही शहरात ध्वनीप्रदूषणाची तीव्रता मोजण्यासाठी कणतीही स्वतंत्र यंत्रणा नाही. गणेशोत्सव व मोठया मिरवणुकीत जळगाव येथून ध्वनी मोजमाप यंत्रणा मागविली जाते. यामुळे ध्वनी प्रदूषण कायद्यान्वये कारवाई करता येत नाही.

# निरोगी जीवनासाठी संतुलित आहार आवश्यक : डॉ. हेमा माखणे

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** विद्यार्थ्यांचे शारीरिक स्वास्थ्य चांगले राहण्यासाठी दैनंदिन दिनचर्या व संतुलित आहार आवश्यक असल्याचे प्रतिपादन डॉ.हेमा माकणे यांनी केले. येथील ज्ञानोपासक महाविद्यालयात जागतिक आरोग्य दिनानिमित्त आरोग्य विभागाच्या वतीन आयोजित कार्यक्रमात  विद्यार्थी व त्यांचे आरोग्य आणि आहार या  विषयावर त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीधर भोंबे उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ. हेमा माकणे म्हणाल्या की, प्रत्येक विद्यार्थ्यांनी आपले व आपल्या घरचे सर्वांचे आरोग्य व त्यांना लागणारा योग्य आहार ज्या आहारापासून आपले जीवन निरोगी राहील याची काळजी घेतली पाहिजे. अध्यक्षीय समारोपात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.श्रीधर भोंबे म्हणाले की निरोगी जीवन जगण्यासाठी विद्यार्थ्यांनी संतुलित आहार घ्यावाच त्यासोबतच योगासने आणि प्राणायाम  नियमित करणे आवश्यक आहेत .कार्यक्रमाचे प्रस्ताविक महाविद्यालयातील आरोग्य विभागाचे समन्वयक प्रा. डॉ .बी.जी.ठाकरे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. आय. एम. शेख,व आभार प्रा.डॉ.माणिक खंदारे यांनी केले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील  विद्यार्थी, शिक्षक व  कर्मचारी उपस्थित होते.



# उड्डाणपूलाच्या कामात मूरमाऐवजी दगडाचा वापर

## भोकर बायपासवरील प्रकार : शिवसेनेची चौकशीची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** शहरात वाहतूकीस होणारा अडथळा दूर करण्यासाठी दोन ठिकाणी उड्डाणपूल उभारण्यात आले आहेत. एक वाहतुकीस खुला करण्यात आला आहे.दूसरा प्रगतीपथावर आहे. कामात मूरमाचा वापर करणे गरजेचे असताना चक्क दगडाचा भराव टाकून कामे उरकली जात असल्याने भविष्यात धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. संबधीत वरीष्ठानी त्वरीत चौकशी करून दोषींवर कठोर कार्यवाही करावी अशी मागणी शिवसेना ( ठाकरे गटाचे ) शहर प्रमुख पांडुरंग वर्षेवार यांनी केली आहे.

शहरातील मूख्य रस्ते दक्षिण भारताला जोडणारे असल्याने वाहनांची मोठी गर्दी होत, असे यांचा गांभीर्याने विचार करून शासनाने राष्ट्रीय महामार्ग रस्ता म्हणून घोषित केला आहे. रस्ते विकासासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर केला. त्यामूळे रस्ता रूंदिकरण, डांबरीकरण, पूलाची नव्याने दूरूस्ती, वळण रस्त्यांच्या जागी संरक्षण कठडे, सिमेंट रस्ता,नामफलक अशी विविध कामे करण्यात आली आहेत. शहरात होणारी वाहनांची गर्दी कमी करण्यासाठी बाह्यवळण रस्ता तयार करण्यात आला असून तो वाहतुकीसाठी खुला केला आहे तर दुसरा बाह्यवळण रस्ता सध्या प्रगतीपथावर आहे.शहरातील रेल्वे गेटवर उड्डाणपूल उभारण्यात आले आहे ते वाहतुकीसाठी खुला केला आहे.

भोकर नांदेड रस्त्यावर नव्याने दूसरा उड्डाणपूल उभारण्याचे काम सुरू आहे. या कामावर मूरूम टाकुनी रस्ता तयार करणे गरजेचे असताना संबंधित कंत्राटदार आणि अधिकाऱ्यांनी संगनमत करून मूरमाऐवजी चक्क दगडाचा भराव टाकून कामे घाईगडबडीत उरकण्यात येतं आहे. भविष्यात अशा कामामूळे धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. शहरात राष्ट्रीय महामार्ग विभागाचे कार्यालय असून सूध्दा अधिकारी या कामाकडे कधीच फीरकत नाहीत.परिणामी कंत्राटदारांना निकृष्ट काम करण्यास मूभा मिळत आहे.सबधीत कामाची उच्च स्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कार्यवाही करावी अन्यथा शिवसेनेचे वतीने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा पांडुरंग वर्षेवार यांनी दिला आहे.



# मोलखेडा येथे कधी धावणार लालपरी

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील मोलखेडा येथे कोरोनाच्या काळापासून लालपरी बंद आहे. महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये लालपरिचा वावर सुरु असतानाही ग्रामीण भागातील रस्त्यावर वावर होतांना दिसत नाही. ग्रामीण भागातील सामान्य नागरीक जेष्ठ नागरिक लालपरीची वाट पाहात आहेत. पण तिचा पत्ताच लागेना आधीच या महागाईच्या काळात ज्येष्ठांना पैशाची वणवण त्यात लालपरीची भेटच होईना.. मग खाजगी पऱ्याला जादा पैसे देऊन



प्रवास करावा लागत आहे. तरी सोयगाव आगार व्यवस्थापक यांनी ग्रामीण भागातील लालपरिला सुरू करावे जसे-सोयगांव मोलखेडा, पिंपळवाडी ते सोयगाव या मार्गावरुन एस टी बसची सेवा, लवकरच सुरु करावी अशे लेखी निवेदन सोयगाव आगार प्रमुख हिरालाल ठाकरे यांच्या कडे सरपंच मनिषाताई वारंगाणे यांनी बऱ्याच वेळा दिले असून आगार प्रमुख केराची टोपली समजत आहे. शिंदे-फडणवीस सरकारने २०२३ चा विधानसभेत राज्य सरकारने महिलांसाठी मोठी घोषणा केली आहे.की महिलांना आता एसटी प्रवासात आता ५० टक्के सूट मिळणार अशी योजना जाहीर केली आहे मात्र ग्रामीण भागातील जेष्ठ नागरिक व महिलांना याचा फायदा होताना दिसत नाही, अशी प्रतिक्रिया मोलखेडा येथील नागरिकांनी दिली.

# जिल्ह्यात होणार ग्रामसुरक्षा यंत्रणा कार्यान्वित

आधुनिक केसरी न्यूज

**दादासाहेब घोडके**

**पैठण :** जिल्हा पोलीस अधीक्षक मनीष कलवानिया , जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना यांच्या प्रयत्नातून , व सयुंक्त विद्यामाने ग्राम सुरक्षा यंत्रणा कार्यान्वित करण्याबाबत आज पैठण पोलीस स्टेशन येथे ग्राम सुरक्षा यंत्रणेचे 18002703600 प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आले. सदर कार्यक्रमास मा. श्री.डॉ.विशाल नेहुल साहेब, उप विभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग पैठण,शंकर लाड तहसीलदार पैठण,सहाय्यक पोलीस निरीक्षक लक्ष्मण केंद्रे, पोलीस उपनिरीक्षक दशरथ बुरुकुल,सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रल्हाद मुंडे,पैठण न्यायालय विधीतज्ञ सदाशिव जाधव,गणेश लोकरे ग्राम सुरक्षा यंत्रणा वरिष्ठ विभागीय अधिकारी, मकरंद कदम ग्राम सुरक्षा यंत्रणा विभागीय अधिकारी, गोपनीय पोलीस हवालदार संदीप जाधव व पोलीस अंमलदार मनोज वैद्य,पोलीस कॉन्स्टेबल संजय चव्हाण ,यांच्यासह पैठण पोलीस स्टेशन हद्दीतील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायतचे सर्व सदस्य, पोलीस पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष, पत्रकार बांधव, अशा सेविका, अंगणवाडी सेविका तसेच सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. पोलीस स्टेशन हद्दीत संकट काळात आपत्तीग्रस्त नागरिकाने ग्राम सुरक्षा यंत्रणेच्या टोलफ्री नंबर 18002703600 वर कॉल केल्यास संबंधित व्यक्तीचा आवाज गावातील सर्व नागरिकांना कॉल स्वरूपात तत्काळ ऐकवला जाणार असल्याने गुन्ह्यांना आळा घालणे शक्य होणार आहे. ग्राम सुरक्षा यंत्रणेचे संचालक श्री. डी. के. गोर्डे यांनी नागरिकांना यंत्रणेचे प्रात्यक्षिक दाखवले, पैठण पोलीस स्टेशन हद्दीतील गावातील नागरिकांनी यंत्रणेत पुढील 48 तासांत सहभागी होण्याचे आश्वासन दिले.सूत्रसंचालन विशाल नेहुल उप विभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग पैठण यांचे मार्गदर्शनात सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री.लक्ष्मण केंद्रे यांनी केले. ग्राम सुरक्षा यंत्रणा पोलीस स्टेशन हद्दीत कार्यान्वित करण्यासाठी 50 रुपये प्रति कुटुंब, प्रति वर्ष इतका खर्च येणार आहे. सदर खर्चाची 15 व्या वित्त आयोगाच्या निधीतून तरतूद करणेबाबत निर्देश जिल्हा परिषद कार्यालयाकडून ग्रामपंचायतींना देण्यात आलेले आहेत.




# तरुण-तरुणी एकत्र दिसल्याने चाकूचा धाक दाखवून लूटमार

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** मंगळवारी संध्याकाळी 6 वाजेच्या सुमारास गोंदूर शिवारातील निकम पॉलीटेक्नीकचे पुढे सपना पोल्ट्री फॉर्मचे बोर्डाजवळ तक्रारदार हे त्यांचे मैत्रिणीसह गप्पा मारत उभे असतांना मोटार सायकलवर आलेल्या अनोळखी दोन इसमांनी त्यांना चाकूचा धाक दाखवून तक्रारदार यांचे व त्यांची मैत्रिणीचे असे 12000 / -रुपये किमंतीचे दोन मोबाईल बळजोरीने हिसकावून पळून गेले होते . सदर बाबत तक्रारदार यांनी पश्चिम देवपूर पोलीस स्टेशन येथे तक्रार नोंदली. दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला होता . गुन्हयाचे तपासात मा . पोलिस अधिक्षक सो.धुळे श्री संजय बारकुंड सो व मा अप्पर पोलिस अधिक्षक श्री किशोर काळे सो , मा . पोलीस उप अधीक्षक ( गृह ) श्री.संभाजी पाटील सो यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शना प्रमाणे पश्चिम देवपूर पोलीस ठाण्याचे पथकाने आरोपीबाबत फिर्यादीने नमुद केलेल्या वर्णना वरुन तसेच गोपनीय माहितीच्या आधारे गुन्हयातील आरोपीचा शोध घेवून संशयीत म्हणून 1 ) देवेंद्र एकनाथ भिल वय 20 वर्ष राहणार आनंदखेडे ता.जि.धुळे 2 ) अजय रुपा सोनवणे वय 24 वर्ष रा . आर्वी ता.जि. धुळे यांना ताब्यात घेतले . आरोपीतांना विश्वासाने विचारपुस करुन त्याने गुन्हयाची कबुली देवून नमुद गुन्हा हा त्यांनी संगनमताने केल्याचे सांगितले . नमुद आरोपीकडून गुन्हयातील गेला माल 1 ) RED ME व 2 ) POCO कंपनी असे दोन मोबाईल 12000 / -रुपये किमतीचा मुद्देमाल त्याच प्रमाणे गुन्हात वापरलेली मोटार सायकल व चाकू हस्तगत करण्यात आला आहे . सदर गुन्हयाचा तपास पोलीस उपनिरीक्षक एम . एच . सय्यद करत आहेत . सदरची कार्यवाही ही मा . पोलिस अधिक्षक सो . धुळे श्री . संजय बारकुंड सो . व मा अप्पर पोलिस अधिक्षक श्री . किशोर काळे सो.मा.पोलीस उप अधीक्षक ( गृह ) श्री . संभाजी पाटील सो . यांचे मार्गदर्शना खाली पश्चिम देवपुर पोलिस ठाणे धुळे येथील मा . पोलीस निरीक्षक श्री . नितीन देशमुख , पोलीस उपनिरीक्षक एम . एच . सय्यद , प्रविण अमृतकर, किरण जगताप , पुरुषोत्तम सोनवणे , धर्मेंद्र मोहिते , सुनिल राठोड , निलेश हलोरे , चालक रविंद्र हिरे यांनी सदरची कार्यवाही केली आहे . धुळे जिल्हा पोलीस दलातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की , आपले एकटेपणाचा गैरफायदा घेवून समाजकंटक गैरकृत्य करण्याची शक्यता आहे . तरी नागरिकांनी निर्जन निर्मनुष्य ठिकाणी फिरायला जातांना दक्षता घ्यावी असे गैरप्रकार कुणासोबत घडल्यास तात्काळ 112 या क्रमांकावर किंवा स्थानिक पोलीसांशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले.




RAHUL S. ANCHALKAR
9850500629, 9325727798
R.R. Enterprises
घर तुमचे... इंटरीयर आमचे !
आपल्या घरातील आतील संपूर्ण सजावट आम्ही करू, वेल डेकोर फर्नीचर, किचन ट्रॉलीज, सोफा, बेड सर्वकाही तुमच्या स्वप्नाप्रमाणे
Add. : N-8, Behind Onkar Gas, CIDCO, Aurangabad-431 003
E-mail : anchalkarrahul@gmail.com
Web:rrenterprises.com

# वेरूळ लेणीत पर्यटकांवर मधमाशांचा हल्ला

## 15 ते 20 पर्यटक या मधमाशांच्या हल्ल्यात जखमी

आधुनिक केसरी न्यूज

खुलताबाद : वेरूळ येथील लेणी क्रमांक 16 या जगप्रसिद्ध कैलास लेणीच्या वरील भागास शनिवारी दुपारी सव्वा बाराच्या सुमारास पर्यटकांवर आग्यामोहळाच्या मधमाशांनी हल्ला करून व पंधरा ते वीस पर्यटकांना जखमी केले. सर्व जखमी पर्यटकांना वेरूळ येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात तात्काळ स्थानिकांच्या मदतीने दाखल करून त्यांना वैद्यकीय उपचार करण्यात आले. यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्र वेरूळचे वैद्यकीय अधिकारी श्रेयस वाघमारे यांनी सर्व जखमी पर्यटकांच्या चेहऱ्यावरील, हातावरील, पाठीवर, मानेवर, मधमाशांनी चावा घेतलेले काटे काढले व आईस पॅक लावून औषधोपचार केले. याबाबत अधिक माहिती अशी की वेरूळ लेणीच्या वरील भागास काही पर्यटक हे लेणी बघण्यासाठी गेले होते व दुपारी सव्वा बाराच्या सुमारास एकाएकी आगे मोहोळ उठले आणि काही कळण्याच्या आत पर्यटकांवर हल्ला केला. या जखमी पर्यटकात रघुनंदन कडापा, कार्तिका कडापा, स्पंदना कडापा, सहाना कडापा, पलानीस्वामी, रेखा कुमारी, यांच्यासह 15 ते 20 पर्यटक या मधमाशांच्या हल्ल्यात जखमी झाले आहेत. या जखमी पर्यटकांना घेऊन वेरूळ येथील स्थानिक शेख आसिफ, संजय बनकर, भास्कर घाडगे, मनोज मडकर यांनी तात्काळ दवाखान्यात दाखल करून त्यांच्या वैद्यकीय उपचार मिळवण्यासाठी मदत केली. यावेळी अतिरिक्त जिल्हाआरोग्य अधिकारी जी.एम कुंडलीवार यांनीही येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात जखमी झालेल्या पर्यटकांची भेट घेऊन पाहणी केली व पर्यटकांना किमान दोन तास निरीक्षणाखाली ठेवण्याचे सांगितले.

**प्रथमोपचार पेटी व साईन बोर्ड लावण्याची आवश्यकता :** वेरूळ या ठिकाणी देश–विदेशातील पर्यटक भेट देत असतात या ठिकाणी ज्याप्रमाणे इतर साइन बोर्ड लावलेले आहेत . त्याप्रमाणे मधमाशा, साप, विंचू, कीटक, जंगली प्राणी याबाबतचे साइन बोर्ड लावणे गरजेचे आहे . तसेच या ठिकाणी अशा घटना यापूर्वीही घडल्या आहेत त्यासाठी वेरूळ लेणी या ठिकाणी प्रथमोपचार पेटीची नितांत आवश्यकता आहे . तरी भारतीय पुरातत्त्व विभागाने या घटनेची खबरदारी घेऊन आवश्यक त्या उपाययोजना कराव्या नसता एखादा पर्यटक वरून खाली पडला असता तर मोठी दुर्घटना घडली असती .

**– सतीश देवेंद्र लोखंडे वेरूळकर,**
**( सचिव एलोरा हेरिटेज फाउंडेशन)**





# प्रा.डॉ.विठ्ठल जायभाये यांना उत्कृष्ट स्तंभलेखक पुरस्कार प्रदान!

आधुनिक केसरी न्यूज

**सोनपेठ :** येथील कै. रमेश वरपूडकर महाविद्यालयात कार्यरत इंग्रजी विषयाचे प्राध्यापक तथा महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध लेखक, कवी, प्रबोधनकार, योगप्राणायाम प्रशिक्षक, स्तंभलेखक प्रा. डॉ.विठ्ठल खंडूजी जायभाये यांना आज दिनांक ७ एप्रिल २०२३ रोजी महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री मा.नामदार अतुलजी सावे साहेब यांच्या हस्ते हॉटेल वर्षा इन, छत्रपती संभाजी नगर येथे एका भव्य-दिव्य कार्यक्रमात पत्रमहर्षी स्व.मोहनलाल बियाणी उत्कृष्ट स्तंभलेखक पुरस्कार प्रदान करण्यात आला. याप्रसंगी व्यासपीठावर मंत्रालय विधिमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष मा. प्रमोदजी डोईफोडे, महाराष्ट्र पत्रकार संघाचे अध्यक्ष मा.वसंतजी मुंडे, दै.मराठवाडा साथीचे संपादक मा.श्री चंदूलालजी बियाणी, मा.जगदीशजी बियाणी, महाराष्ट्र पत्रकार संघ छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्ष डॉ.प्रभूजी गोरे, दै.सकाळचे संपादक मा. दयानंदजी माने आदी मान्यवरांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला.

या सन्मानाबद्दल सोनपेठ येथील ह.शि.प्र.मंडळाचे अध्यक्ष मा. परमेश्वर कदम, कै. रमेश वरपूडकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.वसंत सातपुते, सोनपेठ येथील सर्व पत्रकार बांधव आणि संपूर्ण मित्रपरिवार यांच्याकडून पुरस्कार मिळाल्याबद्दल प्रा.डॉ.विठ्ठल जायभाये यांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे!

# सामाजिक बांधिलकी जपणारे साहित्य असावे : प्रतिमा काळे

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** सामाजिक बांधिलकी जपणारे आपले साहित्य असावे, त्यातून विचारांना चालना मिळावी असे वक्तव्य, अव्दैत क्रिडा केंद्र,पुणे आणि "नाट्य -चित्र" कला अकादमी,पुणे आयोजित खुले काव्य संमेलनांच्या अध्यक्षा सौ.प्रतिमा काळे यांनी केले. अद्वैत क्रिडा केंद्र,पुणे व नाट्य चित्र कला अकादमी, पुणे आयोजित गुरुवार दिनांक ६ एप्रिल २०२३ रोजी आयोजित जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून कलाकारांचा सन्मान,कार्यालयाचा उद्घाटन समारंभ सोहळा व भव्य खुले काव्य संमेलन आयोजित करण्यात आले होते.नाट्य चित्र कला अकादमी,पुणे येथील कार्यालयाच्या नूतनीकरण उद्घाटन समारंभाचे अध्यक्ष,जेष्ठ साहित्यिक,विचारवंत व ८९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष मा.डॉ.श्रीपाल सबनिस सर,माजी उपमहापौर श्री. दीपक मानकर सर,नाट्य चित्र कला अकादमीचे अध्यक्ष सूर्यकांतजी तिवडे यांचे सह.अद्वैत कला क्रीडा मंचचे अध्यक्ष माननीय श्री. मदन कोठुळे सर यांच्यासह इतर मान्यवर,कलाकार,साहित्यिक या सोहळ्यास मोठ्या उत्साहाने उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्राचे म्हणजेच काव्य संमेलनाच्या अध्यक्षा, सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या शिक्षिका, लेखिका, कवयित्री, मा.सौ. प्रतिमा काळे या लाभल्या. प्रमुख पाहुणे मा.ह.भ.प. पुरुषोत्तम हिंगणकर सर, देवेंद्र गावंडे सर ,बहारदार सुत्र संचलन,मा.सीताराम नरके सर व मा.रुपालीताई अवचारे यांनी केले. संमेलन मध्ये महाराष्ट्र राज्यातून जवळ-जवळ ५० कवी,कवयित्री उपस्थित होत्या.संमेलनात वेगवेगळ्या विषयांवर कविता सादर करण्यात आल्या. अध्यक्षीय भाषणात मा.सौ.प्रतिमा काळे यांनी साहित्य कसे असावे तर ते विचारांना चालना देणारे,सामाजिक बांधिलकी जपणारे असावे.आपल्या साहित्यातून संदेश देता आला पाहिजे,मनातील भावनांशी एकजीव होता आले पाहिजे. आभाराचा भार, आयोजक मा.चंद्रकांत जोगदंड सर यांनी सांभाळला.






गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका

(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

# वसुंधरा प्रतिष्ठानने स्वच्छ केल्या भिंती

## तुम्ही थुंका.... आम्ही साफ करतो : सुपारी खाऊन सार्वजनिक ठिकाणी न थुंकण्याचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**लातूर :** शहरात मनपाने मोठ्या प्रमाणावर खर्च करून भिंतीचे सुशोभीकरण केले आहे. मात्र अनेकजण सुपाऱ्या खाऊन थुंकत असल्याने या भिंतींचे विद्रुपीकरण होत आहे. वसुंधरा प्रतिष्ठानच्या वतीने रविवारी सकाळी स्वच्छता अभियान राबवून स्वतः या भिंती स्वच्छ केल्या. छत्रपती शिवाजी महाराज चौकात हा उपक्रम राबवून पदाधिकारी यांनी अक्षरशः सुपारी खाऊन थुंकलेल्या अस्वच्छ भिंती पाण्याने धुऊन स्वच्छ केल्या. लातूर स्वच्छ ठेवण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घ्यावा असे आवाहनही या माध्यमातून वसुंधरा प्रतिष्ठानने केले आहे. आपले लातूर स्वच्छ अन सुंदर दिसण्यासाठी लातूर मनपाच्या वतीने मोठ्या प्रमाणावर खर्च करून भिंतींचे सुशोभिकरण केले आहे. अनेक भिंती विविध रंगानी रंगवून बोलक्या केल्या. मात्र, अनेकजण सुपाऱ्या खाऊन थुंकत असल्याने या भिंती लालबुंद झाल्या आहेत. भिंतींचे होणारे विद्रुपीकरण थांबावे यासाठी वसुंधरा प्रतिष्ठानने या भिंती स्वच्छ केल्या आहेत. शिवाय, स्वच्छ लातूरकरिता सर्वांनी पुढाकार घ्यावा असे आवाहन केले आहे. नागरिक मनपाकडे कर भरणा करतात या भरलेल्या कर रकमेतून शहर स्वच्छ आणि सुंदर दिसावे यासाठी भिंतींचे सुशोभीकरण मनपाने केले आहे. मात्र, या भिंतीवर थुंकल्याने याचे विद्रुपीकरण होत असल्याचे निदर्शनास आल्याने वसुंधरा प्रतिष्ठानच्या पदाधिकारी यांनी या रंगविलेल्या भिंती स्वच्छ केल्या आहेत. या उपक्रमात वसुंधरा प्रतिष्ठानचे प्रा.योगेश शर्मा, डॉ.अजित चिखलीकर, अमोलआप्पा स्वामी, हुसेन शेख, संजय माकुडे आदींनी सहभाग घेत स्वतः या भिंती स्वच्छ केल्या.

**लातूरची स्वच्छता ही प्रत्येकाची जबाबदारी ...!**
आपले लातूर शहर स्वच्छ आणि सुंदर ठेवणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे . त्यामुळे सार्वजनिक ठिकाणी कोणीही थुंकू नये, असे आवाहन वसुंधरा प्रतिष्ठान तर्फे करण्यात आले आहे . सुपाऱ्या खाऊन थुंकणाऱ्याना 'बहाद्दर' अशी उपाधी देण्यात आली आहे . शहरात स्वच्छता असणे आवश्यक आहे . छत्रपती शिवाजी महाराज चौकातील उड्डाणपुलाखाली उघड्यावर नागरिक लघुशंका करीत असल्याने या भागात दुर्गंधी पसरली आहे . नागरिकांनी लघुशंकेसाठी मनपाच्या सार्वजनिक शौचालयाचा वापर करणे आवश्यक आहे . आपले लातूर सुंदर आणि स्वच्छ ठेवण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घ्यावा, असे आवाहन वसुंधरा प्रतिष्ठानने केले आहे .










# जनसंपर्क अधिकारी संजय अंबादास पाटील यांना 'स्व. मोहनलालजी बियाणी कार्यगौरव' पुरस्कार प्रदान

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई आणि दैनिक 'मराठवाडासाथी' च्या संयुक्त विद्यमाने मागील तीन वर्षापासून देण्यात येणाऱ्या पत्रमहर्षी स्वर्गीय मोहनलालजी बियाणी राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार- २०२३ दि. ७ एप्रिल २०२३ रोजी महाराष्ट्र राज्याचे सहकारमंत्री नामदार अतुल सावे यांच्या शुभहस्ते हॉटेल वर्षा इन, छत्रपती संभाजीनगर येथे एका भव्य-दिव्य कार्यक्रमात पत्रमहर्षी स्व.मोहनलाल बियाणी 'कार्यगौरव' पुरस्कार कांचनवाडी येथील छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेचे जनसंपर्क अधिकारी संजय अंबादास पाटील यांना पत्नी सौ. ज्योती आणि आई सौ. रुक्मिणी यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला. याप्रसंगी व्यासपीठावर मंत्रालय विधिमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष प्रमोद डोईफोडे, महाराष्ट्र पत्रकार संघाचे अध्यक्ष श्री.वसंत मुंडे, दैनिक मराठवाडा साथीचे संपादक चंदूलाल बियाणी, जगदीश बियाणी, महाराष्ट्र पत्रकार संघ छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्ष डॉ. प्रभू गोरे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत हा भव्य-दिव्य कार्यक्रम संपन्न झाला. यंदा राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कारासोबतच 'पत्रकारिता जीवनगौरव' पुरस्कार व जनसंपर्कात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकाऱ्यांना 'कार्यगौरव' पुरस्कार देण्यात आला. या सन्मानाबद्दल छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था अध्यक्ष रणजितभैय्या मुळे, सचिव पद्माकरकाका मुळे, विश्वस्त समीरभैय्या मुळे, प्रशासकीय अधिकारी डॉ. श्रीकांत देशमुख, अंबादास वाळूंज पाटील, श्री. संजय घुले पाटील, श्री. पांडुरंग बडग, संजय नाना जाधव, संदीप वाळुंज पाटील, श्री. प्रणव पाटील यांनी पुरस्कार मिळाल्याबद्दल अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्यात.






# विवाहासारखे शुभकार्य हे समस्या होत आहे : चारूदत्त आफळे

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** ब्रह्मसखी ब्राह्मण महिला वधुवर मंडळ छत्रपती संभाजीनगर तर्फे वाकड (पिंपरी चिंचवड) येथे 2 एप्रिलला फक्त मुलामुलींचे गेटटूगेदरचा कार्यक्रम घेण्यात आला व यामध्ये महाराष्ट्रातील विवाहेत्सूक मुलामुलींनी भाग घेत एकमेकांना जाणून घेतले.

कार्यक्रमाची सुरूवात गणेशवंदनेने झाली. उपस्थित मुलामधून एकाने उत्स्फुर्तपणे गणेशवंदना सादर केली.

कार्यक्रमासाठी उपस्थित अभुतपूर्व 225 च्या वर असलेली फक्त मुलामुलींची संख्या, पालकांचा ब्रह्मसखी वर असलेला विश्वास दाखवून देत होती. या कार्यक्रमात संपूर्ण महाराष्ट्रभरातून मुलामुलींनी हजेरी लावलेली होती.

सुरूवातीला या कार्यक्रमासाठी आलेले मार्गदर्शक अतुल खेरडे यांनी ब्रह्मसखीच्या संचालिका नंदिनी ओपलकर, गीता सराफ, ज्योती कानोले, तृप्ती कुलकर्णी यांच्यासह दिपप्रज्वलन केले.



ब्रह्मसखीचे प्रास्ताविक गीता सराफ यांनी केले. ब्रह्मसखीच्या वाटचालीचा आराखडा वाचताना संचालिकांचे डोळे पाणावलेले दिसले यावरून त्या किती एकरूप आहेत हे लक्षात येते.

श्री अतुल सरांनी मुलामुलींना मार्गदर्शन करताना करियरसोबत वास्तविकतेकडे पाहून काही स्लाईडशोद्वारे उदाहरण देत आयुष्याकडे पहाण्याचा दृष्टीकोन कसा असायला हवा ? याबद्दल सांगितले.

माननीय चारदत्त आफळे यांनी गणेशपुजन करून कार्यक्रमाची रंगत वाढवली.

मुलामुलींना मार्गदर्शन करताना भविष्याकडे वळताना वास्तविकतेचा अभ्यास करून त्यासाठी अध्यात्माचा आणि आपल्या संस्कृतीचा त्यासाठी कसा फायदा होतो ? आणि ते कशासाठी आवश्यक आहे ? याबद्दलची उदाहरणासह विस्तृत माहिती सांगातली. मुलामुलींचे नशीब म्हणायला हरकत नाही, कारण मान्यवर कार्यक्रमास येण्यास पटकन तयार झाले. चारूदत्त आफळे म्हणाले, "समाजाच्या स्थैर्यासाठी या विषयावर मला बोलायला आवडेल." आयुष्यातील स्थैर्य फार महत्वाचे आहे.विवाहासारखे शुभकार्य हे समस्या होत आहे.असे होऊ नये म्हणून सर्वांनी प्रयत्न करायला हवेत असे ते म्हणाले. दोन वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवरांचे जे मार्गदर्शन होते त्यामुळे या मुलामुलींच्या मतामधे निश्चित फरक पडेल असे वाटल्यामुळे हे मार्गदर्शन ठेवण्यासाठी आम्ही प्रयत्नशील होतो आणि आमच्या प्रयत्नास फळ मिळाल्याचा आनंद समाधान होत आहे




# आनंदाचा शिधा वाटपाला सुरुवात

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** गुढीपाडवा, रमजान व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती इत्यादी सण-उत्सवांचे औचित्य साधून राज्य सरकारने जाहीर केलेला आनंदाचा शिधा वाटपाला शहरातील भीमनगरातून सुरुवात झाली. शहरातील साक्री रोडवरील भीमनगरात स्वस्त धान्य दुकान क्रमांक 58 येथे रेशनकार्डधारकांना रविवार दि, 9 एप्रिल रोजी आनंदाचा शिधा' असलेले किट्सचे वाटप करण्यात आले. धुळे शहरात सणउत्सवांच्या पार्श्वभूमीवर शासनाने जाहीर केलेला आनंदाचा शिधा वाटपासाठी दुकान क्र. 58 चे चालक राजेश ओहाळ यांनी यशस्वी पाठपुरावा केला. त्यातून आनंदाचा शिधा सरकारकडून प्राप्त झाला. त्याचे रेशनकार्डधारकांना समारंभपूर्वक वाटप करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात महाकारोणिक तथागत भगवान गौतम बुध्द, स्वराज्यनिर्माते छत्रपती शिवाजी महाराज, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूर्तींना माल्यार्पण करुन मान्यवरांच्य हस्ते पूजन करण्यात आले. याप्रसंगी रेशन दुकानदारांचे नेते सुभाष कोटेचा, स्वस्त धान्य दुकानदार चालक-मालक संघटनेचे सरचिटणीस संतोष जैन, धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष तथा आघाडीचे सांजदैनिक खान्देश मैदानचे मुख्य संपादक मनोज गर्दे, पुरवठा



अधिकारी भामरे, नगरसेवक बन्सी जाधव, निनाद पाटील, दुकान क्र. 58 चे चालक राजेश ओहाळ, सोनिया ओहाळ, अमर ओहाळ, वंदना बागुल, रत्नशील सोनवणे आदी मान्यवरांसह परिसरातील रेशनकार्डधारक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना मनोज गर्दे म्हणाले की, रेशन दुकान चालक हा एक जनसेवा करणारा समाजघटक आहे. तो शासनाकडून अन्नधान्य मागवून ते जनतेपर्यंत पोहचवितो. त्याच्यामुळे गोरगरीब जनतेच्या घरी चुली पेटतात. हे खरे पुण्यकर्म आहे, समाजसेवा आहे. त्यांच्यामुळे आपले सणउत्सश गोड होतात. त्यांच्या कामातून समाजाची अन्नाची मूलभूत गरज पूर्ण होते. सुभाष कोटेचा यांनी सूत्रसंचालनादरम्यान सांगितले की, कोरोनाच्या कठीण काळातही शासन आदेशानुसार रेशन चालकांनी नियमांचे पालन करीत जनतेला धान्य वितरित केले. हे काम करताना काही रेशन चालकांना दुर्दैवाने प्राणास मुकावे लागले. परंतु आम्ही या जनसेवेच्या कामात खंड पडू दिला नाही. यात जनतेचे चांगले सहकार्य लाभले असेही कोटेचा यांनी नमूद केले. कार्यक्रमात मान्यवरांचा बुके देवून यथोचित सन्मान करण्यात आला.

# जातेगाव येथे विविध विकासकामांचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील जातेगाव मध्ये माजी विधानसभा अध्यक्ष तथा आ.हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते जल जीवन मिशन अंतर्गत विविध विकास कामाचे उध्दघाटन करण्यात आले. यावेळी जातेगाव येथे एक लक्ष लिटर पाण्याची नवीन टाकी ,नवीन विहीर, नवीन पाईपलाईन करुन गावात नळ कनेक्शन इत्यादीसाठी एक कोटी 17 लाख खर्च करण्यात येणार आहे . तसेच स्मशानभूमी सुशोभीकरण, प्राथमिक आरोग्य केंद्रास स्पेशल वीज पुरवठा, विठ्ठल रुक्मिणी मंदिरासमोरील सभागृह, तरुणांसाठी व्यायाम शाळा, ग्रामपंचायत साठी भव्य इमारत तसेच तलाठी कार्यालय सुद्धा



देण्याचे आश्वासन यावेळी आ.हरिभाऊ बांगडे नाना यांनी दिले या कार्यक्रमासाठी अनुराधाताई चव्हाण, भाजपाचे तालुकाध्यक्ष सुहास भाऊ शिरसाट, माजी जिल्हा परिषद सदस्य शिवाजी पाथ्रीकर, भाजपा तालुका उपाध्यक्ष अप्पासाहेब काकडे ,माजी पंचायत समिती सदस्य ऐश्वर्या गाडेकर, नाथा आप्पा काकडे अभिषेक गाडेकर, सरपंच कांताबाई दानवे, उपसरपंच जनार्दन मानकापे, ग्रामसेवक डी.जी. वेताळ ग्रामपंचायत सद्स्य आदी उपस्थित होते.

# वाढीव कुटुंबांच्या स्वेच्छा पुनर्वसनास मंजुरी

## ५८ कोटी मंजूर : आ. डॉ. राठोड

आधुनिक केसरी न्यूज

**मुखेड :** तालुक्यातील मागील 38



वर्षापासून प्रलंबित असलेल्या लेंडी धरणाच्या बाधित क्षेत्रातील बारा गावातील वाढीव कुटुंबांना स्वेच्छा पुनर्वसनाच्या मागणीला मंजुरी मिळाली आहे, अशी माहिती मुखेड- कंधार विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ. तुषार राठोड यांनी दिली. महाराष्ट्र व तेलंगाना राज्याच्या सीमावरती भागातील लेंडी या आंतरराष्ट्रीय प्रकल्पाच्या कामास सुरुवात होऊन 38 वर्षापेक्षा अधिक कालावधी झाला आहे. पण धरणाचे काम अजूनही पूर्ण झाले नाही. धरणाच्या बाधित क्षेत्रातील बारा गावांच्या पुनर्वसनाचे व नागरी सुविधांचे प्रश्न अजूनही प्रलंबित आहेत. नागरी सुविधांच्या व पुनर्वसनाच्या प्रश्नांच्या अभावी या बारा गावातील नागरिक हालाखीचे जीवन जगत आहेत. या धरणाच्या कामास गती मिळाली पाहिजे व बारा गावांच्या पुनर्वसनाचे व नागरी सुविधांचे प्रश्न मार्गी लागले पाहिजेत यासाठी आमदार डॉ. तुषार राठोड हे सतत प्रयत्नशील आहेत.

मागील शासनाच्या काळात आमदार डॉ. तुषार राठोड यांनी या कामाला गती देण्यासाठी 300 कोटी रुपये पेक्षा अधिक निधी मंजूर केला. बाधित क्षेत्रातील मुक्रामाबाद या सर्वात मोठ्या गावाच्या पुनर्वसनासाठी जमिनीची उपलब्धता होत नसल्यामुळे या गावाच्या स्वेच्छा पुनर्वसनास महाराष्ट्र शासन व पुनर्वसन प्राधिकरणाकडून विशेष बाब म्हणून मंजुरी मिळवण्यात आमदार डॉ. तुषार राठोड यांना यश आले.

2015 साली मुक्रामाबाद या गावातील घरांच्या मावेजांचा निवाडा होऊन सुद्धा याची रक्कम नागरिकांना अदा करण्यात आली नव्हती. मुक्रामाबाद या गावाच्या स्वेच्छा पुनर्वसनास विशेष बाब म्हणून मंजुरी मिळाल्यानंतर 93 कोटी रुपयांचा निधी मंजूर करून या गावातील प्रकल्प बाधितांना त्यांच्या घरांच्या निवाड्याची रक्कम अदा करण्यात आली.

1984-85 साली या धरणाचे काम सुरू झाले होते. मागील 38 वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या धरणाच्या बाधित क्षेत्रातील बारा गावातील कुटुंबांची संख्या सुद्धा वाढली आहे. ज्या गावांचे पुनर्वसन शासनाने केले आहे अशा गावांच्या गावठाणात वाढीव कुटुंबांना जागा उपलब्ध नाही. धरणाचे काम पूर्ण करण्यापूर्वी या वाढीव कुटुंबांचे सुद्धा पुनर्वसन करणे गरजेचे आहे.

बाधित क्षेत्रातील बारा गावातील वाढीव कुटुंबांचे सर्वेक्षण करा व या सर्व कुटुंबीयांना मुक्रामाबाद या गावाच्या धरतीवर स्वेच्छा पुनर्वसनाचा लाभ द्या अशी मागणी आमदार डॉ. तुषार राठोड यांनी मागील काही कालावधीपासून लावून धरली होती. आमदार डॉ. तुषार राठोड यांच्या मागणीमुळे या बारा गावातील वाढीव कुटुंबांचे सर्वेक्षण संबंधित विभागातर्फे पूर्ण करण्यात आले व ३११२ कुटुंब संख्या निश्चित करण्यात आली.

मुक्रामाबाद या गावाच्या स्वेच्छा पुनर्वसनाच्या धरतीवर तीन लक्ष 70 हजार रुपये प्रति कुटुंब लाभ निश्चित करून 130 कोटी रुपयांची मागणी जलसंपदा विभाग महाराष्ट्र राज्य यांच्याकडे करण्यात आली होती. आमदार डॉ. तुषार राठोड यांच्या प्रयत्नाने आता लेंडी धरणाच्या बाधित क्षेत्रातील बारा गावातील या वाढीव कुटुंबांच्या स्वेच्छा पुनर्वसनाच्या मागणीला शासनाने मंजुरी दिली आहे.

वाढीव कुटुंबांना दिला जाणाऱ्या लाभाच्या रकमेपोटी शासनाने 58 कोटी रुपये संबंधित विभागाकडे वर्ग केले आहेत. तात्काळ हा निधी महसूल विभागाकडे वर्ग करण्यात येईल व लाभार्थ्यांना अदा करण्यात येईल. अशी माहिती आमदार डॉ तुषार राठोड यांनी दिली.

# वर्धेत सार्वजनिक ठिकाणी जुगार

आधुनिक केसरी न्यूज

**वर्धा :** टाईम पास म्हणून खेडोपाडी झाडाखाली बसून



तीन पत्तीचा जुगार खेळणे सार्वत्रिक चित्र म्हणावे. पण अशा जुगारामुळे युवा पिढी आयुष्य उद्ध्वस्त करीत आहे तर त्यांचे कुटुंब पुढील पिढीबाबत चिंतित आहे. हे ओळखून पोलीस अधीक्षक नुरूल हसन यांनी ग्रामीण भागातील ठाणेदार व पोलीस चौकी असलेल्या गावात जुगारबंदीबाबत खबरदार केले. अवघ्या दोनच दिवसात धडाधड छापे पडले. खरांगणा रवी वानखेडे, तळेगाव अशोक सोमनाथ, आष्टी सूरज खरे, दुर्गवाडा शैलेश पाटील, पुलगाव सतीश डंभारे, सिंदी मोरेश्वर धाले, देवळी विशाल डोने तर सावंगी येथे राजकुमार बावरीसह सहा जणांवर गुन्हे दाखल झाले. सट्टापट्टीचे आकडे असलेला कागद व पत्त्यांचे जोड तसेच रोख जप्त करण्यात आली. यामुळे टाईम पास नसती उठाठेव ठरल्याची भावना या युवकांमध्ये पसरली आहे. जुगारात सापडलेली रक्कम अगदी किरकोळ ठरावी. एकाही ठिकाणी हजार रुपयावर पैसे मिळाले नाही. मात्र व्यसन पसरत चालल्याचे स्पष्ट झाले.



# सोसायटीवर शेतकरी एकता ग्रामविकास पॅनलचे वर्चस्व

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील देवळाना बु येथील विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्थेच्या संचालक मंडळाची पंचवार्षिक निवडणूक झाली या निवडणुकीत शेतकरी एकता ग्रामीण विकास पॅनलचे प्रमुख माजी उपसरपंच दिलीप मालोदे माजी सरपंच रियाज पठाण यांनी एक हाती सत्ता काबीज केली विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्थेचा देवळाना बु 350 मतदारापैकी 307 मतदारांनी 12 जागा करिता मतदान केले सर्वसाधारण मतदारसंघात 8 महिला मतदार संघास 2 इतर मागासवर्ग 1 अनुसूचित जाती प्रवर्ग 1 जागा भटके विमुक्त जागा रिक्त राहिली असून याप्रमाणे दोन पॅनलचे 24 उमेदवार रिंगणात होते त्यात शेतकरी एकता ग्राम विकास पॅनलचे मुसा पठाण 150 मते मिळवून विजयी झाले सलीम मिया खा पठाण 157 एकनाथ लक्ष्मण मालोदे 152 पुंडलिक तात्याराव साळुंखे 148 शेख अनिल पटेल 145 वसीम राऊफ पटेल 146 मते हे सर्वसाधारण मधून निवडून आले तर महिला मतदार संघातील नरसिंन रियाज पठाण 162 तर लंकाबाई आप्पाराव लगड 160 मते घेऊन विजयी झाले या निवडीबद्दल ग्रामपंचायत माजी सरपंच रियाज पठाण माजी उपसरपंच दिलीप मारुती पांडुरंग मालोदे संजय शिंदे कलीम पठाण कय्युम पठाण इसाक पठाण रामहरी मालोदे यांनी अभिनंदन केले या निवडणुकी त सहाय्यक निबंध कार्यालया तर्फे निवडणूक अधिकारी सुषमा साबळे यांच्या मार्गदर्शनात पीपी कदम योगेश दांडेकर व्ही व्ही सुरडकर एस पवार योगेश दांडेकर विलास सुरडकर यांनी काम पाहिले खुलताबाद पोलीस ठाण्याचे कर्मचारी वारे दांडगे पोलीस पाटील रवींद्र शिंदे यांनी चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# बाजारसावंगी कार्यालयाचा विजबिल वसुलीचा उच्चांक

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** ता. खुलताबाद येथील महाराष्ट्र वीज वितरण कंपनी बाजार सावंगी शाखा कार्यालय असून जिल्हा छत्रपती संभाजीनगर अंतर्गत ग्रामीण संभाजीनगर विभाग क्रमांक दोन देवकांची रीतसर वसुली व वीज चोरीला आळा बसणे वीज पुरवठा सुरळीत ठेवणे, अशा कामगिरीत विभागातून तसेच उपविभागातून प्रथम क्रमांकाचा मानकरी घोषित झाले आहे. त्यांच्या यशाचे अनेकांनी अभिनंदन केले आहे. बाजार सावंगी कार्यालय मार्च 2023 मध्ये 134% वसुलीचा उच्चांक गाठला आहे . ग्रामीण क्रमांक 2 विभागातून प्रथम क्रमांक मिळवला तसेच वर्ष 2022 व 23 या वर्षांमध्ये सुद्धा या केंद्राने 96% वार्षिक देयक वसुलीचे धोरण यशस्वीपणे राबवल्याने प्रथम क्रमांक मिळवला आहे. तालुक्यातील उपविभाग खुलताबाद अंतर्गत देखील प्रथम क्रमांकावर हे कार्यालय घोषित झाले आहे थकबाकी अभावी विज कपात धोरण नाही या केंद्राच्या अंतर्गत 18 गावांचा समावेश असून 8 कर्मचारी तसेच 4 बाह्य कंत्राटी कर्मचारी कार्यरत आहे सहाय्यक अभियंता म्हणून प्रदीप काळे यांच्या कार्यशील पणा व तत्परतेने बाजार सावंगी कार्यालयाला बहुमान मिळाल्याचे बोलले जाते. उच्चांक वसुली बद्दल वीज ग्राहकांनी कर्मचारी यांचे अभिनंदन केले . कोरोना काळात येथील येथील कर्मचारी खूप व्यवस्थितरित्या सेवा दिलेली आहे. यामुळे बाजार सावंगी ग्राम पंचायत कार्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला होता.

